शनिवार । १० मार्च १९७९
७५ पैसे

# माणूस

## ‘आनंदी-गोपाळ ’कर्ते श्री. ज. जोशी यांना म. सा. परिषदेबाहेर ढकलण्याचे कारस्थान यशस्वी झाले. हे कसे घडले ?

एक निवेदन.

मुखपृष्ठ २

## सप्रेम नमस्कार....

▫ माणूसच्या ३ मार्च १९७९ च्या अंकात ‘संध्याकाळचे पुणे’ या सदरात श्री. दि. बा. मोकाशी यांनी फेब्रुवारी महिन्यात मराठी विज्ञान परिषद पुणे विभागाने आयोजित केलेल्या ‘रत्ने, उपरत्ने’ या विषयावरील चर्चेवर एक टिप्पणी लिहिली आहे म. वि. प. च्या कार्यक्रमासंबंधी सविस्तर टिपणी लिहिल्याबद्दल प्रथमतः श्री. मोकाशींचे आभार मानले पाहिजेत. त्यांनी चर्चेचा वृत्तांत बराच सविस्तर आणि बराचसा बरोबर दिला आहे. मात्र त्यांनी माझ्या तोंडी एक विधान टाकले आहे, त्यासंबंधी वाचकांचा गैरसमज होण्याची भीती असल्यामुळे त्याची वेळीच दुरुस्ती होणे आवश्यक वाटले, म्हणून हे पत्र. श्री. मोकाशी यांनी असे लिहिले आहे की, ‘सोहोनी यांनी सांगितले की माणिक व नील ही खरी रत्ने होत; पण हिरा हा रत्नात जमा नाही’

वस्तुतः मी असे सांगितले होते की ‘हिरा हा साऱ्या रत्नांचा राजा आहे. पौर्वात्य तसेच पाश्चिमात्य अशा सर्वच देशांत हिऱ्याचे रत्नराज हे स्थान निर्विवाद आहे; पण आपल्याकडे नवरत्नात ज्यांची गणना केली आहे असे गोमेद, (गार्नेट), लसण्या (कॅटस् आय, बेरीलचा एक प्रकार), मोती, प्रवाळ इत्यादींना पाश्चिमात्य देशात दुय्यम म्हणजे उपरत्नांचे स्थान आहे. मोती व प्रवाळ ही खरी रत्ने (खनिजे) नसून ती जैवज आहेत. इ. ‘हिरा हा रत्नात जमा नाही’ असे विधान निदान माझ्याकडून अनवधानानेसुद्धा होणार नाही !

सुवर्णाचे बाबतीत भारत जगात अग्रेसर होता की नाही, याविषयी श्री. मोकाशी यांचेशी वाद घालण्याचे कारण दिसत नाही. त्यांनी सोन्याविषयीची आपली माहिती तपासून पहायला हवी कोलारच्या सोन्याच्या खाणी प्रागैतिहासिक काळाच्याही आधीपासून जगप्रसिद्ध आहेत. त्यांची प्राचीनता (हिऱ्यांप्रमाणेच) महाभारतकालापर्यंत नेऊन भिडवता येते. सध्या उत्पादनाखाली असणाऱ्या जागतिक महत्त्वाच्या सुवर्णाच्या खाणी गेल्या शंभर-दोनशे वर्षांतच शोधण्यात आल्या आहेत. सोन्याच्या उत्पादनात आजचा क्रम दक्षिण आफ्रिका, रशिया, कॅनडा, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ऑस्ट्रेलिया, घाना, द. ऱ्होडेशिया, फिलिपाइन्स, कोलंबिया, कांगो (झैरे), मेक्सिको, जपान, निकाराग्वा, भारत, पेरू असा आहे. इजिप्शियन संस्कृतीत आणि नंतर ग्रीक-रोमन काळात सोन्याचा वापर भरपूर होत होता; पण हे सोने कुठून येत होते हे श्री. मोकाशी यांनी पाहिले तर त्यांची शंका दूर होईल.

‘शास्त्रीय आणि अशास्त्रीय विचार’ यासंबंधी खरे तर बरेच सविस्तर लिहावयास हवे. मराठी विज्ञान परिषदेचा खरा उद्देश शास्त्रज्ञानाचा नुसता प्रसार करणे हा नसून ‘वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे’ हा आहे. त्यामुळे लोकभ्रम हे भ्रम आहेत अशी खात्री पटवण्यासाठी जे जे करणे शक्य असेल ते करावयास हवे श्री. मोकाशी हे अशा भ्रामक समजुतींच्या विरुद्धच आहेत हे त्यांच्या टिप्पणीवरून दिसते; पण नकळत त्यांनी ‘चंद्रावर पोचताच चांद्रवीरांच्या मनात अशास्त्रीय विचार आले’ असे लिहून या अशास्त्रीय विचारांची तरफदारी केली आहे की काय असे वाटून जाते. परमेश्वर (म्हणजे बुद्धीच्या पलीकडे असलेले काही तरी) आठवणे आणि दुबळ्या मानसिक वृत्तीचे निदर्शक असे अशास्त्रीय तोडगे—हे दोन्ही समानार्थी नाहीत असे मला वाटते. चंद्र साध्य झाल्यावर शास्त्र संपत नाही. नैतिक–सामाजिक विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हे परस्परविरोधी असण्याचे कारण नसते. त्यामुळे भ्रामक समजुतीतील भ्रामकपणा हा ठामपणे लोकांना सांगत राहाणे, त्यांच्या मनाला पटेल यासाठी मनोभूमी तयार करीत राहाणे हे एक अत्यावश्यक कार्य आहे.

—प्रा. प्रभाकर सोवनी, पुणे

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक एकेचाळीसावा

१० मार्च १९७९

मूल्य ७५ पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९


महाराष्ट्र साहित्य परिषदेची निवडणूक, १९७९

# मी उभा का नाही ?

वि. ग. कानिटकर

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुका मार्च ७९ मध्ये होत आहेत. ७९–८२ या कालासाठी नवी कार्यकारिणी आता निवडली जाईल.

एप्रिल ७६ मध्ये झालेल्या निवडणुकीत मी कार्यकारी मंडळासाठी उभे राहण्यास संमती दिली. पत्रक काढले नाही, काहीही खर्च केला नाही आणि तरीही 'का पडलो नाही' याची सुरस हकीकत मी 'माणूस'च्या वाचकांना सांगितली होती. या वेळीही माझे नाव सुचवले गेले मी संमती दिली; परंतु अखेर मी माघार घेतली व उभे न राहता आडवे होण्याचे ठरविले. असे मी का केले याची ही गोष्ट.

साहित्य परिषदेची घटना ही एक चमत्कारिक त्रैवार्षिक योजना आहे. अध्यक्ष व त्यांचे तीन उपाध्यक्ष यांना परिषदेच्या कारभारात कोणतेही बरे-वाईट काम करण्याची सोय घटनेत नाही. त्यांनी काहीही काम करू नये अशीच अपेक्षा असते, असे म्हणतात आणि जो काहीही करीत नाही तो मोठा माणूस; म्हणून या स्थानांना मानाची स्थाने असे म्हणण्याचा प्रघात आहे.

कार्याध्यक्ष ही एक जागा आहे. ही जागा फार महत्त्वाची. कारभाराची सर्व जबाबदारी त्याची, असे असूनही कार्याध्यक्षाने अधूनमधून काय चालले आहे याची चौकशी करावी. परिषदेत होणाऱ्या सभांना अध्यक्ष म्हणून बसावे, इतपतच अपेक्षा कार्याध्यक्षाकडून असे. परिषदेचा कारभार हा पुण्यातील 'दोन कार्यवाह' चालवीत असत. कार्यकारिणीचे इतर सभासद, कार्यकारिणीच्या सभेला वर्षातून तीन-चार वेळा हजर राहणे व महत्त्वाची कुणी व्यक्ती परिषदेत आल्यास, त्यांच्याबरोबर चहापानासाठी येणे या जबाबदाऱ्या पार पाडीत. हां, एक पत्रिकेचा संपादक असतो. महाराष्ट्र परिषद जे त्रैमासिक चालवते त्याची जबाबदारी या संपादकावर असते व सल्लागार मंडळ म्हणून अनेकांची नावे पत्रिकेत असली तरी ती केवळ ताटापुढची रांगोळी असते. संपादकाला लेख जमविणे, प्रुफे पाहणे, अंक वेळेवर छापणे वगैरे कामे करावी लागतात.

१९७६ साली श्री. ज. जोशी कार्याध्यक्ष, मो. रा. वाळंबे कोषाध्यक्ष, मी व म. श्री. दीक्षित कार्यवाह व प्रा. हेमंत इनामदार पत्रिकेचे संपादक झाले. आम्ही चौघे सतत तीन वर्षे जवळजवळ रोज सकाळी अथवा सायंकाळी तास दीडतास परिषदेत येत होतो. यात जवळजवळ एकही दिवस न चुकता श्री. ज. जोशी व म. श्री. दीक्षित यांनी विशेष परिश्रम केले.

रोज येऊन केले काय, हा पुढचा प्रश्न. ७६ साली परिषदेची सभासदसंख्या १५०० देखील नव्हती. यात वर्षाला रु. १०।– देणारे साधारण सभासद अधिक. या सर्वांना परिषदेच्या पत्रिकेचे चार अंक देण्यातच प्रत्येकावर सुमारे रु. २०।– खर्च होत होते. यामुळे परिषदेची आर्थिक स्थिती कठीण झालेली होती. रु. २००।– एकरकमी देणारे तहहयात सभासद वाढवले तरच ही कोंडी फुटणार होती. रोजच्या आमच्या बोलण्यांतून नवीन नवीन तहहयात सभासद मिळविण्याचे काम आपोआप मार्गी लागले. सर्वांनी यासाठी हातभार लावला असला तरी असंख्य जणांना व्यक्तिशः भेटून त्यांना आजीव सभासद होण्यासाठी विनंती करण्याचे काम श्री. ज. जोशी यांनी केले. श्री. ज. जोशी हे स्वतःला उगाच लहान समजणारे मोठे लेखक आहेत असे त्यांचे यथायोग्य वर्णन एकदा प्रा. गंगाधर गाडगिळांनी केले होते. श्री. जं. चे हे अतिशय मार्मिक वर्णन आहे. कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी जी पायपीट केली—पत्रव्यवहार केला—

घडपड केली त्याचा फायदा परिषदेला झाला. किमान रु. २०,०००।– चा कायम निधी हा त्यांनी एकट्याने परिषदेला मिळवून दिलेला आहे. एकंदर जवळजवळ लाखाचा कायम निधी परिषदेला उपलब्ध झाला आहे व सभासदसंख्या २५०० च्या घरात पोचली आहे.

परिषदेची आर्थिक स्थिती सुधारताच, असंख्य व्याख्यानांचे उपक्रम, 'अभिप्राय' सारखे पुस्तकांच्या परिचयाचे कार्यक्रम, संस्थेला आवश्यक अशा अनेक स्थावर वस्तूंची खरेदी, इमारतदुरुस्ती वगैरे गोष्टी करणे आम्हाला शक्य झाले. परिषदेच्या वास्तूची वाढ व परिषदेच्या दिवाळी अंकाची योजना या पूर्णपणे आखल्या गेल्या होत्या व पुढील तीन वर्षांत यातले काही साध्य व्हावे म्हणून श्री. ज. जोशी, मो. रा. वाळंबे, मी आणि म. श्री. दीक्षित हे पुन्हा निरनिराळ्या पदांसाठी निवडणुकीला उभे राहण्यास तयार झालो होतो. जुन्या कार्यकारिणीपैकी आम्ही चौघे धरून फक्त सात जण पुन्हा काम करू इच्छीत होतो. एकंदर कार्यकारिणी १९ जणांची असते.

दि. २६-२-७९ ही नावे परत घेण्याची शेवटची तारीख होती. या दिवशी श्री. ज. जोशी, मो. रा. वाळंबे व मी यांनी आपआपली नावे मागे घेतली. हे का झाले ? फक्त माझ्यापुरता खुलासा मी करणार आहे.

त्याचे असे झाले, 'सोबत'चे संपादक ग. वा. बेहेरे यांनी आपले नाव कार्याध्यक्षपदासाठी दाखल केले. नाटककार वसंत कानेटकर यांचे नाव अध्यक्षपदासाठी आले. श्री. ज. जोशी यांनी आपले नाव अध्यक्षपदासाठी व डॉ. वि. रा. करंदीकर यांचे नाव प्रकाशक दा. दि. कुलकर्णी यांच्या खटपटीने कार्याध्यक्षपदासाठी दाखल झाले. या नावांव्यतिरिक्त कार्याध्यक्षपदासाठी वासू देशपांडे व अध्यक्षपदासाठी पां. र. अंबिके यांचीही नावे आली.

जर सर्वांनी लोकशाही निर्णय मानायचा एवढेच ठरवून काहीही गडबड केली नसती तर अध्यक्ष म्हणून वसंत कानेटकर किंवा श्री. ज. जोशी आणि कार्याध्यक्ष म्हणून डॉ. वि. रा. करंदीकर हे निवडून आले असते. डॉ. वि. रा. करंदीकर यांचेविरुद्ध ग. वा. बेहेरे हे निवडून येण्याची सुतराम शक्यता नव्हती. कारण डॉ. वि रा. करंदीकर यांचेविरुद्ध 'लिहिण्यासारखे' काहीही उपलब्ध नव्हते.

परंतु प्रकाशक दा. दि. कुलकर्णी व म. श्री. दीक्षित यांनी एकाएकी डॉ. वि. रा. करंदीकर यांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी धावपळ सुरू केली. डॉक्टरांचे यश निश्चित होते; परंतु लढत ग. वा. बेहेरे यांचेशी होती. उगाच भानगड नको म्हणून शक्यतो ग. वा. बेहेरे यांना नाव मागे घ्यायला लावायची खटपट आरंभिली. 'कटुता नको–कटुता नको' हा एकच घोष दोघांनी सुरू केला !

श्री. ग. वा. बेहेरे हे तसे सरळ. त्यांना काहीही करून श्री. ज. जोशी हे परिषदेत नको होते. कदाचित ते कार्याध्यक्ष होतील म्हणून त्यांनी नाव दाखल केलेले. नाव मागे घेण्यात आता त्यांचे काहीच जात नव्हते. एक तर ते निवडून येणारच नव्हते आणि दुसरी गोष्ट श्री. ज. हे परिषदेत येणे न येणे हे आता त्यांच्या आवाक्याबाहेर होते. कारण श्री. ज. हे अध्यक्षपदासाठी उभे होते व वसंत कानेटकरांबरोबर ते नक्की पडतीलच किंवा पडणारच नाहीत याबाबतीत कुणीच काही सांगू शकणार नव्हते. तेव्हा 'डॉ. वि. रा. करंदीकर बिनविरोध निवडून येण्यासाठी मी नाव मागे घेतो !' असे ग. वा. बेहेरे यांनी कबूल केले; पण त्यांची अट होती. अट काय, तर श्री. ज. जोशी यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून नाव मागे घ्यावे.

म. श्री. दीक्षित आणि दा. दि. कुलकर्णी हुरळले. डॉ. वि. रा. करंदीकरांना बिनविरोध निवडून आणण्याचे श्रेय त्यांना हवे होते आणि परस्पर श्री. जं. चा बळी द्यायला त्यांची हरकत नव्हती !

मला हे सर्व पसंत नव्हते. ज्या श्री. जं.नी तीन वर्षे परिषदे।ाठी बरेच काही केले, त्यांना नाव मागे घ्यायला सांगणे आणि ते ग. वा. बेहेरे यांच्या आग्रहाखातर, हा सर्व बनाव श्री. जं. वर अन्याय करणारा व काहीसा चांगल्या कामाची बूज न राखणारा म्हणून संस्थेला हानिकारक होता.

डॉ. वि. रा. करंदीकर हे गेली तीन वर्षे परिषदेचे उपाध्यक्ष होतेच. त्यांना श्री. जं. चे काम माहीत होते. ते स्वतःच श्री. जं. ना 'नाव मागे घ्या' अशी विनंती करतील, अशी माझी अपेक्षा नव्हती. ग. वा. बेहेरे यांना खूष करण्यासाठी उत्सुक असलेले म. श्री. दीक्षित, अथवा 'कटुता नको' म्हणून दिशाहीन धावपळ करणारे दा. दि. कुळकर्णी यांच्या सांगण्यावरून अखेर डॉ. वि. रा. करंदीकर यांनीच जेव्हा श्री. जं. ना नाव मागे घेण्याची विनंती केली तेव्हा माझा भ्रमनिरास झाला. नाव मागे घेण्याची वेळ सायंकाळी सहापर्यंत होती. सायंकाळी ४ ते ५ च्या दरम्यान हा बनाव झाला व श्री. ज. यांनी अध्यक्षपदाच्या लढतीतून नाव मागे घेतले. वसंत कानेटकरांसाठी नाही, तर ग. वा. बेहेरे यांनी नाव मागे घ्यावे व डॉ. वि. रा. करंदीकर बिनविरोध निवडून यावेत म्हणून !

श्री. ग. वा. बेहेरे यांचा तूर्त विजय झाला आहे. श्री. जं. ना परिषदेबाहेर ढकलण्याचे काम त्यांनी केले. यामागे जे घडले त्यामुळे श्री. जं. वर अन्याय झाला आहे, असे मला वाटले व परिषदेचे नुकसान झाले आहे याची खंत वाटली. या मनःस्थितीमुळे परिषदेच्या निवडणुकीतून दि. २६–२–७९ ला सायंकाळी ५।। वाजता मी नाव मागे घेतले.

वृत्तपत्रांत एखाद्याची निवड 'बिनविरोध' झाली एवढेच छापून येते. त्यामागे काय चालते, हे कळले तर 'लोकशाहीच्या ज्ञाना'तही भर पडेल असा या निवेदनामागचा हेतू आहे.

□


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# पुन्हा लुंबिनीच्या वनात

लुंबिनीच्या वनात जन्म घेतलेला गौतम बुद्ध मला फार आवडतो. वेदांतील ऋचांनंतर धर्मसंस्थापकांत, धर्मतत्त्वांबरोबर निसर्गाचे सौंदर्य वर्णन करणारा एकमेव गौतम बुद्धच होऊन गेला. माणसाच्या दु खाचा शेवट कसा होईल, याचा उपाय शोधता शोधता त्याला भोवतालच्या चांदण्याचे, घरट्यांत चुळबुळणाऱ्या पक्ष्यांचे, वाऱ्याने हालणाऱ्या झाडांच्या शेंड्यांचे, चांदण्याचे आणि रानातील ओरडणाऱ्या पशूंचे भान होते. आपल्या तपासाठी त्याने नैरंजना नदीकाठचा उरुवेला गाव निवडला तो तेथील रमणीयतेसाठी. तेथे नदीकाठच्या वनाची शोभा सुंदर होती. नदी मंदमंद वाहात होती. इथेच त्याने तप केले. इथेच त्याने तपाचा मार्ग सोडला. त्याचे शिष्य इथेच त्याला सोडून गेले आणि इथेच त्याला मध्यम मार्गाचे ज्ञान झाले ती मनोहारी पौर्णिमा होती. गंमत ही की, बुद्धाच्या आयुष्यातल्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी पौर्णिमेस घडल्या आहेत. त्याचा जन्म पौर्णिमेला. त्याने घर सोडले ते पौर्णिमेला. त्याला पौर्णिमेला ज्ञान झाले. त्याला पहिला शिष्य पौर्णिमेला मिळाला आणि त्याचे निर्वाणही पौर्णिमेस झाले ! या पौर्णिमांच्या उल्हसित चांदण्याचा आनंद त्यामुळेच त्याच्या तत्त्वज्ञानावर–धर्मावर पसरला असावा. जगातील आजच्या बुद्धधर्मीय देशात हिंडून आलेल्या एका लेखकाचे मत असे आहे की, सर्व जगात बुद्धधर्मीयांइतके आनंदी लोक नाहीत !

अशा या धर्माची हजार वर्षांपूर्वी भारतातून पूर्ण पीछेहाट झाली. बुद्धधर्म पूर्ण विसरला गेला असता अचानक डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी यांनी तो धर्म स्वीकारून त्याला भारतात पुनर्जन्म दिला. त्याबरोबरच अनेक नवे प्रश्न उभे केले. त्यांच्या धर्मांतराने हिंदूंपुढेच नव्हे तर मुसलमान व ख्रिश्चन समाजापुढेही प्रश्न उत्पन्न केले. दरिद्री असलेले अस्पृश्य या धर्मांना कोवळा घास होता. तो गेला. मात्र या धर्मांतराने लाखो अस्पृश्यांच्या जीवनाला नवा हेतु व नवा आवेश मिळाला.

या आवेशाचा प्रत्यय, येथील नाना पेठेतील 'अहिल्याश्रमा'च्या पटांगणात बौद्ध मित्र या संस्थेतर्फे, भदंत महास्थविर संघरक्षित (इंग्लंड) यांचे 'बुद्ध मानव की परमेश्वर?' या विषयावर प्रवचन होते, त्या प्रवचनाचे वेळी आला. या प्रवचनातील पहिली नवल गोष्ट म्हणजे प्रवचनकार ब्रिटिश होते. आम्ही व्याख्यानाचे जागी गेलो तेव्हा तिथे वीस वर्षे वयाच्या आसपासचे बुद्ध झालेले पाच–सहा गोरे ब्रिटिश तरुण दिसले. एकाच्या गळयात कॅमेरा होता. ते व्यासपीठाच्या उजव्या हाताला खाली खुर्च्यांवर बसले होते. डाव्या बाजूला खाली तशाच ठेवलेल्या खुर्च्यांवर थायलंडचे भदंत विदुरा व आपल्याकडील एक भदंत प्रेमघर्मा हे बसले होते. तरुण बुद्ध तरुणांची नावे वीरभद्र, परिव्रज, पक्षपाती, युवराज, प्रियानंद अशी होती.

नंतर, व्याख्यानारंभी एका कार्यकर्त्याने पाहुण्यांचा परिचय करून देताना त्यांची ही माहिती सांगितली. त्याने सांगितले की, इंग्लंडमध्ये सध्या बुद्धधर्म स्वीकारलेले एकशेतीस ब्रिटिश आहेत. तेथील परिस्थितीला व ख्रिश्चन धर्माला कंटाळून ते बौद्ध झाले. सभेत 'बुद्धयान' या नव्याने निघालेल्या त्रैमासिकाचा अंक विकत होते. त्या अंकात भदंत संघरक्षित यांची माहिती दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धधर्म घ्यावयाचा ठरविला तेव्हा त्यांच्यापुढे बुद्धधर्म स्वीकारावयाचा म्हणजे काय करावयाचे ? आणि अशा समारंभाचे संस्कारविधी कोण करणार ? हे प्रश्न होते. तेव्हा भदंत संघरक्षितांनी प्रचलित संस्कारविधीची माहिती दिली. कोणत्याही भिक्षूकडून त्रिशरण व पंचशील करून धर्मांतर करून घेता येते, असे भन्तेंनी सांगितले. तेव्हा बाबासाहेबांनी भन्तेंना तुम्हीच हे कार्य हाती घ्या, असे म्हटले; पण भारतातील सर्वांत वयोवृद्ध भिक्षु पू. महास्थवीर चंद्रमणी यांच्या हातून तो विधी होण्यात औचित्य आहे, असे त्यांनी समजावले.

दि. १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी नागपूर येथे बाबासाहेबांनी सर्वप्रथम बुद्धधर्माची दीक्षा घेतली. दीक्षा घेतल्यावर तेथे आलेल्या लाखो लोकांना ते म्हणाले, 'मी बुद्धधर्माची दीक्षा घेतली, आता तुम्हाला दीक्षा देऊ इच्छितो. तेव्हा तुमच्यापैकी ज्यांना बुद्धधर्माचा स्वीकार करावयाचा असेल त्यांनीच मी म्हणतो तसे माझ्यानंतर म्हणावे.' त्या वेळी तेथे आलेल्या सात लाख लोकांनी स्वेच्छेने बाबासाहेबांच्या पाठोपाठ त्रिशरण, पंचशील आणि बावीस प्रतिज्ञा ग्रहण करून बुद्धधर्म स्वीकाला.

या ठिकाणी मला गौतम बुद्धाच्या चरित्रातील एक भाग आठवला. ज्ञान झाल्यावर आपल्याला सोडून बनारसला गेलेल्या आपल्या शिष्यांना ते सांगावे म्हणून गौतम बुद्ध बनारसकडे निघाला. वाटेत त्याला एक साधु भेटला. त्याला आपला धर्म सांगण्याचा गौतमाने यत्न केला.

बुद्धाच्या तोंडावरची प्रसन्नता व तेज पाहून साधूने विचारले, 'गौतमा ! तुझा गुरु कोण ?'

गौतम म्हणाला, 'माझा मीच गुरु आहे. सर्व वासना सुटून मी निर्वाणपद प्राप्त केले आहे !'

साधू म्हणाला, 'म्हणजे तू अनंताचाच भेद केला आहेस म्हण की !'

गौतम म्हणाला, 'वासना जिंकणारा मी जेता आहे.'

साधू म्हणाला, 'असशील– असशील. तसेही असेल !'

असे म्हणून तो साधू तुच्छतेने पुढे निघून गेला. बुद्धाने ज्याला पहिल्यांदा आपणास ज्ञान झाल्याचे सांगितले ते त्याला असे पटले नाही. बनारसच्या वाटेवर गौतम साशंक होऊन आपले काय चुकले याचा विचार करू लागला. त्याच्या लक्षात आले, आपला मध्यम मार्ग आपण सांगायला हवा. मग बनारसमध्ये आल्यावर आपल्या पाच शिष्यांना तो मार्ग सांगितल्यावर प्रथम त्याच्या कौडिण्य नावाच्या शिष्याने व नंतर इतर चौघांनी त्याचा धर्म स्वीकारला.

बुद्धापुढे व बाबासाहेबांपुढे जे प्रश्न होते, ते अगदी वेगवेगळे होते. बुद्धाजवळ धर्म होता, पण अनुयायी नव्हते. बाबासाहेबांजवळ अनुयायी होते, पण धर्म समजावयाचा होता. बाबासाहेब सांगतील तो धर्म त्यांनी स्वीकारला असता अशी अनुयायांची मनःस्थिती होती. त्यांना अस्पृश्यतेच्या शापातून सुटावयाचे होते. माणसाने माणसाला अस्पृश्य मानणे कसे थांबविता येईल हा प्रश्न होता. त्याला एकच उत्तर होते. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांस, अस्पृश्यता मानणाऱ्या समाजातून बाहेर काढून जेथे अशी अस्पृश्यता नाही अशा समाजात नेऊन ठेवावयाचे. खुद्द बाबासाहेबांचे हिंदु धर्मावर अपार प्रेम होते व त्यांच्या अनुयायांचीही हिंदु देवतांवर विलक्षण श्रद्धा होती. केवळ अन्यायमूलक परिस्थितीतून सुटण्यासाठी हे धर्मांतर होते. बाबासाहेबांनी मुसलमानी किंवा ख्रिश्चन धर्म न स्वीकारता बुद्ध धर्म स्वीकारला यामागे त्यांना आपल्या अस्पृश्य बांधवांची अस्मिता जागृत रहावी ही इच्छा असावी. आधीच संघटित असलेला धर्म स्वीकारला असता, तर आपल्या अनुयायांचे हित करण्याचे कुणाच्या हाती राहिले नसते आणि कदाचित पूर्वीपेक्षाही आपल्या बांधवांची स्थिती वाईट झाली असती, अशी भीती बाबासाहेबांना वाटली असावी. त्यापेक्षा आपण आपल्याच पायावर हिंमतीने उभे रहावे असे ठरवून ज्याचा फारसा नामनिर्देशही भारतात राहिलेला नाही तो बुद्धधर्म त्यांनी घेतला.

सभेला आता दीड दोन हजार समुदाय झाला होता. समुदाय खूपच शांत व शिस्तीत होता. आपल्याकडे आधी जी गडबड चालते ती नव्हती—म्हणजे लाउड स्पीकरवरून गडबड न करण्याच्या, जागेवर बसण्याच्या सूचना द्याव्या लागत नव्हत्या. जमिनीवर जाजमे वगैरे हंथरली होती व श्रोते त्यावर बसले होते. भदंत धर्मरक्षित व त्यांचे सहकारी भदंत लोकमित्र दोघे सभेत आले. भदंत लोकमित्र हेही ब्रिटिश होते. यांनी वर्षापूर्वी येवले येथे ध्यानधारणा शिबिर घेतले होते हे दोघे भदंत येण्यापूर्वी व्यासपीठावर एक पेटी ठेवण्यात आली होती व येणारा त्यात पैसे टाकून जात होता. रुपया ही सर्वसाधारण देणगी दिसली. देणगी देणाऱ्याचे नाव लगेच स्पीकरवर येत होते. जास्तीत जास्त एकदाच एकावन्न रुपयांची देणगी ऐकली. एकूण गरिबीतला कारभार होता. दोन्हीही भदंतांना पडलेले हार अगदी साधे होते. पुष्कळदा फूलच असे. व्यासपीठावर येताच भदंत धर्मरक्षितांनी बुद्धाच्या पुतळ्यास व डॉ. आंबेडकरांच्या फोटोला हार घालून नमस्कार केला. त्यांचे वय पन्नाशीच्या आसपास असावे. भदंत लोकमित्र वयाने थोडे लहान वाटले. भदंत धर्मरक्षित हसतमुख तर भदंत लोकमित्र जरा गंभीर वाटले. एका वयस्क गृहस्थांनी भदंत धर्मरक्षितांची श्रोत्यांना ओळख करून दिली. बाबासाहेब अचानक गेल्यावर भदंतांनी समाज कसा सावरला, धीर देत ते सर्वत्र कसे हिंडले ते सांगितले. तसे भदंत सर्वांना माहितीचे होते.

त्रिशरणाने आरंभ झाला. 'इमिना सत्कारेण त बुद्धं अभिपूजयामि' इत्यादि एक गृहस्थ म्हणू लागले व त्यांच्यामागोमाग सर्व सभा म्हणू लागली. एक प्रार्थना भदंत संघरक्षितांनी म्हटली.

त्यानंतर भदंत संघरक्षितांनी, प्रवचनास आरंभ केला. व्यासपीठावर दोन मायक्रोफोन शेजारी शेजारी ठेवले होते. भदंत संघरक्षित उभे राहून एका माइकमधे इंग्रजीतून बोलत होते. शेजारच्या माइकपुढे श्री. दीपक महेशकर नावाचे गृहस्थ उभे राहून भदंतांचे वाक्य संपताक्षणीच त्याचे मराठी करून सांगत होते. त्यांचे भाषांतर अतिशय छान होते. भन्तेचे भाषण व त्याचे भाषांतर दोन्ही इतक्या लयीत चालले होते की, भाषांतर होत आहे असे वाटत नव्हते. जर श्री. महेशकर बुशकोट व पँटमधे नसते तर देखावा अगदी बुद्धकालीन वाटला असता. दोघाही भन्तेंची वस्त्रे नारिंगी होती. भदंत संघरक्षितांनी नारिंगी रंगातली मोठी शाल उत्तरीय म्हणून घेतली होती. आपल्या साधूसंन्याशांची वस्त्रेही पूर्वकालापासून चालत आली तशीच आहेत; पण ही नारिंगी वस्त्रे अशी केव्हा तरी दृष्टीस पडत असल्यानं मागच्या काळात नेत होती एवढेच.

भदंत धर्मरक्षितांनी आरंभ केला,

'माझ्या प्रियधर्मातील बंधू-भगिनींनो !'

भाषणात त्यांनी सांगितले की, पंचवीसशे वर्षापूर्वी जगात थोर थोर लोक होऊन गेले. भारतातही थोर लोक झाले. त्या सर्वांत गौतम बुद्धाचे स्थान उच्च होते. इथेच जन्म घेऊन त्याने इथेच धर्म शिकविला. बोधिसत्त्व झाल्यावर ते ज्ञान त्याने स्वतःशी ठेवले नाही. तो ज्ञान देत हिंडत राहिला. तेव्हा आगगाड्या नव्हत्या. विमाने नव्हती. मीच पहा, ५००० मैल अंतर विमानाने साडेनऊ तासांत कापले. बुद्ध पायी चालला. तो वेग ताशी दोन-तीन मैल असेल. त्याचे वय ऐंशी झाले तरी तो पायीच चाले. तेव्हा पुस्तके नव्हती. त्याने तोंडीच धर्म शिकविला. याचसाठी बुद्धाचे शिष्यांना श्रावक म्हणतात. म्हणजे जे ऐकतात ते. ऐकून लक्षात रहावे अशा तऱ्हेने धर्माचे शिक्षण बसविले.

भदंत संघरक्षितांनी त्या पद्धतीची काही उदाहरणे सांगितली. त्यांचे भाषण लहान सोप्या सोप्या वाक्यांत चालले होते. बुद्धधर्मातील मुख्य मुख्य अंगे सांगून त्यांनी हिंदु धर्मातील जातिभेदावर ताशेरे मारले. बुद्ध धर्मातील देवाच्या स्थानाबद्दल त्यांनी सांगितले—इतर धर्मांत देव हा सर्व काही असतो. बुद्ध धर्मात तुम्ही देवासारखे होऊ शकता. बुद्ध हा मानव होता. तो देव होऊच शकत नाही, असे बुद्ध धर्म सांगतो. बुद्धाची सुरुवात सर्वसामान्य माणसांतून झाली. प्रयत्नाने त्याने बोधिसत्त्वाचे पद प्राप्त करून घेतले.

समोर दोन गोरे ब्रिटिश भदंत बसले होते व ते भारतातील एका शहरात भारतीयांना बुद्धाचा धर्म सांगत होते, हा देखावा उलटा झाला होता. ज्या देशात बुद्धाचा धर्म निघाला त्याच देशात येऊन ते बुद्ध धर्म केवळ शिकवीतच नव्हते, तर त्या धर्माची दीक्षा कशी घ्यावयाची तेसुद्धा त्यांनीच शिकवले होते.

जसा पूर्वी बुद्ध पायी हिंडला किंवा आता हे दोन भदंत हिंडत होते तसेच हिंडून बुद्धधर्माचा प्रसार होईल, हे बाबासाहेबांनी जाणले होते. साठ शिष्य तयार होताच बुद्ध शिष्यांना म्हणाला होता, 'भिक्षूंहो ! आता तुम्ही माझ्याप्रमाणे सर्व तृष्णेतून मुक्त झाला आहात ! तेव्हा लोकांच्या सुखासाठी, लोकांच्या हितासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, लोकांचे कल्याण करण्यासाठी हा धर्म सांगण्यास बाहेर पडा ! एका मार्गाने दोघे जाऊ नका !'

तेव्हा ते साठ शिष्य साठ मार्गांनी गेले. त्यांनी एकास दोन सोबत असते, असे म्हटले नाही. या साठांनी बुद्ध धर्म जगभर

पसरविला. सर्व धर्मांच्या प्रसारात मला बुद्ध धर्माच्या प्रसाराचे नवल वाटते. बुद्धाने पंचेचाळीस वर्षे पायी चालत धर्म सांगितला; पण बनारसपासून राजगृहापर्यंतच्या शंभर मैलांच्या पट्ट्याबाहेर तो कधी गेला नाही. काही पंडितांशी त्याने वाद घेतला व त्यांना जिंकताच त्या वेळच्या रीतीप्रमाणे तो पंडित शिष्यांसह बुद्धाचा शिष्य झाला. बाहेर गेलेल्या बुद्ध भिक्षूंनी आपले काम कसे केले असेल हे संपूर्ण कधीच कळणार नाही.

त्या काळात चातुर्वर्ण आजच्या इतका निबर झालेला नसावा. ज्या सहजतेने ब्राह्मणांनी बुद्ध धर्म स्वीकारला त्याच सहजतेने मांगही बुद्धधर्मीय झाला व ते दोघे बुद्धाच्या छत्राखाली प्रेमाने बसले. हिंदूमधील सर्व जातींनी त्या वेळी बुद्ध धर्मात प्रवेश घेतला. कदाचित त्या वेळी आर्य व अनार्य या दोनच जाती धरल्या जात असतील.

आज हिंदुधर्मीयात बुद्ध धर्माचा प्रसार होणे दुरापास्त वाटते. आज आलेला बुद्ध धर्महो अस्पृश्यांनी आणला व तो अस्पृश्यांपुरताच राहण्याचा संभव फार. परदेशातील काही लोकांनी तेथील परिस्थितीमुळे व ख्रिश्चन धर्माने समाधान होण्याचे थांबल्याने बुद्ध धर्म स्वीकारला असेल; पण हिंदु माणूस मात्र तो घेणार नाही. कारण बुद्ध धर्म हा हिंदुधर्माच्या पोटात सामावलेला आहे, असेच तो मानतो.

ज्याच्या भिक्षूंचे देशोदेशी, जाताक्षणीच स्वागत होत गेले, ज्याचा धर्म ऐकताच राजाने व प्रजेने स्वीकारला तोच धर्म आज अस्पृश्य स्वीकारीत असताना परिस्थिती बदललेली आहे. जगात धर्माचा प्रभावच कमी होत आहे. तेव्हा कालांतराने हे धर्मांतर जगात धर्माचे खरोखर काय स्थान राहिले आहे हे दाखवून देईल. कारण आधुनिक कालातील हे सर्वांत मोठे धर्मांतर आहे.

तोपर्यंत अस्पृश्यांनी बुद्ध धर्म स्वीकारला याचा आपणास आलेला राग आपण टाकून देऊ. या धर्मापासून आपण खूप घेतले–खूप शिकलो. तो आपणास सर्वांत जवळचा धर्म आहे आपण बुद्धाला दशावतारात गोवण्याइतका. आजचा भक्तिमार्ग हा बुद्धधर्मातून निघाला असेलही. तसेच जगातील प्रमुख धर्मांचे मूळ बुद्ध धर्मात असू शकेल. अस्पृश्यता आपण केव्हाच टाकायला हवी होती. चूक आपली आहे.

पू. भदंत संघरक्षित यांनी एक गोष्ट सांगून आपल्या प्रवचनाचा शेवट केला. 'कारण', ते म्हणाले 'गोष्ट लक्षात राहते. बाकीचे विसरले जाते.' गोष्ट मेंढयांच्या कळपात राहिलेल्या वाघाच्या पिलाची होती. दुसरा वाघ आल्यावर त्याला आपले वाघपण कळले. भदंत म्हणाले, 'तसे तुमच्यात असलेले 'वाघपण' ओळखा. तुमच्यापैकी प्रत्येकजण प्रयत्नाने बुद्धापर्यंत पोहोचू शकतो. बें बें करावयाचे सोडून वाघासारखी गर्जना करून उठा! मात्र हा वाघ शाकाहारी आहे हे विसरू नका!'

नंतर वंदना होऊन सभा संपली.

नवबौद्धांचे पुढे काय होईल? काल हा मोठा आहे चमत्कार घडविणारा आहे. तो पुढे काय घडवील कुणी सांगावे? एक शक्यता अशी आहे–बुद्ध धर्म आपण का घेतला याची सामाजिक, आर्थिक कारणे पुढच्या पिढया विसरून जातील. या धर्मांतराच्या वेळी आलेले तणाव विरलेले असतील. मग या बुद्धानुयायांत बुद्ध धर्माचा अध्यात्मिक दृष्टीने अभ्यास करणारे निघू लागतील. त्या दृष्टीने आज त्रिरत्न ग्रंथमालेने काढलेल्या बुद्धयान या त्रैमासिकातील कु. शांता साळवी यांचा 'धम्मशिबिर–एक अनुभव' हा लेख मला महत्त्वाचा वाटतो. या लेखात लेखिका अस्पृश्यांच्या धर्मांतराचे कारण–धर्माचे प्रसार वगैरे विसरून केवळ अध्यात्मिक भावनेतून अनुभव टिपत आहे. कोणत्याही धर्मातील अध्यात्मिक प्रवृत्तीच्या माणसाला हा लेख आवडेल. धर्म हे अध्यात्मिक अनुभवाच्या पातळीवरच एकमेकांजवळ येऊ शकतात. □

---

मुंबई वार्ता

विनया खडपेकर

## □ धूम्रपानविरोधी दिन

इंडियन मर्चंटस चेंबरच्या वालचंद हिराचंद सभागृहात १ मार्च १९७९ या दिवशी धूम्रपान विरोध दिनानिमित्त (Anti-Smoking Day) एक सभा झाली. 'दि असोसिएशन ऑफ फिजिशिअन्स ऑफ इंडिया'ने ही सभा आयोजित केली होती. या सभेचे स्वरूप चर्चात्मक होते. चर्चेचा विषय होता 'धूम्रपानाचे धोके' (Hazards of smoking.)

या चर्चेत डॉ. देसाई (कॅन्सर स्पेशॅलिस्ट), डॉ. कोठारी (स्पेशॅलिस्ट ऑफ चेस्ट डिसीझ), डॉ. दाते (कार्डिऑलॉजिस्ट), डॉ. गोएल (स्पेशॅलिस्ट–कार्डिऑलॉजी), डॉ. आनंद (स्पेशॅलिस्ट कार्डिऑलॉजी) आणि मुंबईचे शेरीफ श्री. राम बात्रा यांनी भाग घेतला होता. असोसिएशनचे सेक्रेटरी डॉ. आनंद प्रश्न वाचून दाखवीत होते. त्यांची उत्तरे त्या त्या विषयातील तज्ज्ञ डॉक्टर देत होते. ही चर्चा इंग्लिशमध्ये झाली. सुमारे पंचाहत्तर ते शंभर श्रोत्यांची कार्यक्रमाला उपस्थिती होती.

लोक धूम्रपानास का प्रवृत्त होतात, धूम्रपान कोणत्या शरीरविकारांना कारणीभूत होते, जडलेले व्यसन सुटू शकते का, व्यसन सोडल्यावर बिघडलेल्या शरीरात सुधारणा होऊ शकते का, धूम्रपान कमी करण्यासाठी कोणते प्रयत्न केले पाहिजेत इत्यादि प्रश्नांचा या चर्चेत ऊहापोह झाला.

प्रथम फॅशन म्हणून धूम्रपानास सुरुवात होते. नंतर तंबाखूमधील निकोटीन द्रव्याची पकड बसते आणि व्यसन जडते. सुरुवातीला सकाळी थोडा खोकला येतो. तो वाढत जातो. पुढे ब्रॉंकायटिस, हृदयविकार, कॅन्सर हे आजार होण्याची दाट शक्यता असते. धूम्रपान हे या आजारांचे एकमेव कारण नसले तरी ते प्रमुख कारण असू शकते हे निरनिराळ्या प्रयोगांनी, आकडेवारीनिशी सिद्ध झाले आहे. पाश्चात्य देशांत प्रयोगशाळेत सिगरेटचा धूर करून त्याचे

मलपृष्ठ १ वर

मुक्काम पुणे । अरविंद गजेंद्रगडकर

# तीन सुरेल रात्री !

दरवर्षी नेमेचि साजरा होणारा पुण्याचा सवाई गंधर्वांच्या पुण्यतिथीचा संगीत-महोत्सव यंदा होणार की नाही, अशी शंका रसिकांच्या मनात आलेली असतानाच महोत्सवाच्या तारखा जाहीर झाल्या. डिसेंबरच्याऐवजी फेब्रुवारीच्या बावीस, तेवीस आणि चोवीसला हा महोत्सव होणार हे जाहीर झाले. भाग घेणाऱ्या कलावंतांची नावेही जाहीर झाली आणि या महोत्सवाची गेली पंचवीस वर्षे चटक लागलेल्या रसिकांची मने प्रफुल्लित झाली.

गुरुवार, बावीस तारीख. रात्री आठ वाजल्यापासूनच मुलींच्या भावे स्कूलकडे लोकांची रीघ लागलेली. भव्य आणि प्रशस्त मंडप. उत्सुकतेने आलेले श्रोते. रंगीबेरंगी कपड्यांनी नटलेले हौशी तरुण आणि तरुणी. नऊच्या सुमाराला शामराव लोणकरांच्या सनईचे स्वर आसमंतात घुमू लागले. गर्दी वाढतच होती. लोणकरांचे सनईवादन संपले तेव्हा मंडप चांगलाच भरला होता. पुढच्या कार्यक्रमाची घोषणा झाली.

स्वप्नसुंदरी यांचे नृत्य ! लोकांनी टाळ्या वाजवल्या. वाद्यवृंदाचा ताफा रंगमंचावर येऊन बसला. भरतनाटचम् आणि कुचिपुडी या शैलीतली नृत्ये ही नर्तिका सादर करणार होती. हे दाक्षिणात्य नृत्य आपल्याला काय कळणार ? काही श्रोत्यांची प्रतिक्रिया. इतक्यात नर्तिका रंगमंचावर पदार्पण करते. सर्वांना नमून वंदन करते. दाक्षिणात्य मंदिरातले एखादे सुंदर शिल्प सजीव होऊन यावे असे मनोहर दर्शन. माईकवर मंजुळ स्वरात ती मुलायम हिंदीत बोलते आणि 'गणेश-वंदना' हे नृत्य सुरू करते. गायिका संस्कृत श्लोक सुरेल आवाजात गात असते आणि त्याचे भाव ही नर्तिका साकार करीत असते. कळणारे, न कळणारे, सारे कसे मंत्रमुग्ध होऊन पहात रहातात. नर्तिकेच्या भावविश्वाशी समरस होऊन जातात.

दोन-अडीच तासांच्या या नृत्यात स्वप्नसुंदरीनें अनेक नृत्यप्रकार सादर केले. प्रेक्षकांना नृत्याचे रसग्रहण सुलभतेने करता यावें यासाठी तिने आपल्या नृत्यमुद्रांचे आधी विवरण केले. नृत्यातून आपल्याला काय सांगायचे आहे, हे विशद करून सांगितले. त्यामुळे नृत्याचा आस्वाद घ्यायला निश्चितच मदत झाली आणि प्रेक्षक तन्मय झाले.

कुचिपुडी हा नृत्यप्रकार मूलतः नृत्य-नाटचाचा प्रकार आहे. नृत्यातून एखादी कथा उलगडत जाणे हा या नृत्याचा उद्देश. त्यामुळे त्या नृत्याला साजेशी अशी कथा—नृत्यकथा—सादर करणे हे क्रमप्राप्तच होते. मंदोदरी आणि रावण यांच्या प्रेमविवाहाचा, आपल्याला जरासा अपरिचित असणारा विषय नर्तिकेने निवडून, अत्यंत नेटकेपणाने तो सादर केला. रावण आणि मंदोदरी यांच्या व्यक्तिरेखा अत्यंत कुशलतेने प्रेक्षकांच्या समोर उभ्या केल्या.

केवळ दाक्षिणात्य भाषेतल्या काव्यावरच विसंबून न रहाता, या प्रयोगशील कलावतीने काही हिंदी काव्यावरही भावप्रदर्शन केले. 'नाचत शंकर बाजत डमरू' या धमार तालातल्या काव्यावर सादर केलेले शिवतांडव आणि सूरदासाच्या काव्यावर सादर केलेले वात्सल्यपूर्ण भावदर्शन प्रेक्षकांना खूपच आवडले. सूरदासाची पंचशती देशभर साजरी होत असताना त्यांचे काव्य नृत्यासाठी निवडण्यात समर्पकता होती. नेहमीच्या पठडीतला राधा-कृष्णाचा शृंगार न दाखविता, सत्यभामा आणि कृष्ण यांच्या प्रेमाचे नाजुक धागे नृत्यातून प्रकट करण्यात नाविन्य आणि प्रयोगशीलता पण होती. तरंगम् हा नृत्य-प्रकार, ज्यात पदलालित्याचा भरपूर विन्यास असतो, तो सादर करून स्वप्नसुंदरीने आपले नृत्य संपविले तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला ! 'श्रीरंगा, झोंबू नको रे अंगा' हे मराठी पद अत्यंत निर्दोषपणे गाऊन त्यावर तिने केलेला भावाविष्कार तर प्रेक्षक कधीच विसरणार नाहीत !

या नृत्यानंतर, ज्येष्ठ संगीतकार, राजाभाऊ देव आणि यशवंतराव मराठे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर दिल्लीचे गायक नसीद अहमद यांनी रागेश्री, चंद्रकंस आणि त्यानंतर एक दादरा सादर केला. अलीकडे या गायकाचा दर्जा जरी घसरलेला असला तरी त्याने त्या रात्री श्रोत्यांना खूष केले.

रात्रीचे सव्वा दोन वाजले होते. परवीन सुलताना यांच्या नावाची घोषणा झाली आणि श्रोत्यांनी खूष होऊन टाळ्यांचा कडकडाट केला. श्रोत्यांना आवडणारे गायन देऊन त्यांना खूष करणारी सध्याची अत्यंत लोकप्रिय गायिका म्हणजे परवीन ! हवा तसा फिरणारा कर्णमधुर आवाज, मैफलीचा अचूक अंदाज आणि देखणे दर्शन यामुळे या गायिकेची प्रत्येक मैफल हमखास यशस्वी होते. त्या रात्री तिने मालकंस आणि पहाडी सादर केली. लोकांना आवडली. पहाटे चार वाजता इंद्रनील भट्टाचार्य याने सतारीवर 'बसंत मुखारी' राग आळवायला सुरुवात केली. लतीफ अहमद या तडफदार तबलावादकाच्या साथीमुळे हा कार्यक्रम रंगला. लोकाग्रहास्तव एक धुन पण वाजवून त्याने आपले सतारवादन संपविले.

पहाटे सव्वा पाचला वसंतराव देशपांडे रंगमंचावर आले तेव्हा मंडप शिगोशीग भरला होता. वसंतराव हल्ली विलक्षण फॉर्मात आहेत, याचे प्रत्यंतर त्यांनी सादर केलेल्या शिवयत भैरवात क्षणोक्षणी येत होते. सुरेलपणा, दर्जेदार स्वर आणि लयीशी झोंबाझोंबी न करता सहजपणे केलेली क्रीडा, यामुळे वसंतरावांचे गाणे, बुद्धी आणि भावना यांना रंजवणारा एक कलात्मक स्वरानुभव ठरते. शिवयत भैरवानंतर झीलप म्हणजे आता प्रचारातला शोभावरी आणि त्यानंतर लोकाग्रहास्तव 'तेजोनिधी लोहगोल' हे लोकांचे आवडते नाटचगीत सादर करून त्यांनी पहिल्या रात्रीच्या मैफलीची सांगता केली तेव्हा पूर्वेला तांबडे फुटले होते.

शुक्रवारी रात्री वसंतराव देवळणकर आणि त्यांचे सहकारी सनईवर बागेश्री आळवीत असताना हळूहळू मंडप भरत

होता – निवृत्तिबुवा सरनाईक यांनी बागेश्री, कानडा आणि मालवी हे अप्रचलित राग सादर केले. विविध अंगांच्या बोलतानांनी नटलेले त्यांचे रंगदार गायन लोकांना आवडले. त्यांच्या गाण्यानंतर ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. नारायणराव व्यास यांचा सत्कार झाला. सत्कारानंतर त्यांनी मालगुंडीचा ख्याल आणि त्यानंतर त्यांचे एके काळी गाजलेले भजन – राधेकृष्ण बोल मुखसे – मोठ्या सुरेलपणे आळवले. या वयात त्यांच्या आवाजाचा खणखणीतपणा वाखाणण्यासारखा आहे.

यानंतर रंगमंचावर आले उगवते सतारवादक शाहेद परवेज या बिचाऱ्याच्या नावाचा घोटाळा सगळे करतात. त्याला बरेच जण शाहीद – म्हणजे हुतात्मा करून टाकतात. निवेदकासकट सर्वांनी हा घोटाळा केला आहे. स्मरणिकेत आणि जाहिरातीतसुद्धा या उगवत्या कलाकाराला हौतात्म्य देण्यात आले आहे. असो.

जाकीर हुसेन या तबलावादकाचेही नाव झकीर, झाकीर वगैरे अनेक प्रकारे चुकीने उच्चारले जाते. निवेदकाने तरी निर्दोष उच्चारांकडे लक्ष देणे जरूर आहे. निष्काळजीपणे उच्चार करायला हा काही रेडिओचा कार्यक्रम नव्हे ! असो.

माझ्या मते तिन्ही रात्रीतला अत्यंत रंगतदार कार्यक्रम म्हणजे हा सतारवादनाचा कार्यक्रम. दोन तडफदार प्रतिभावंत तरुण अशा नेटकेपणाने कार्यक्रम सादर करीत होते की, वाटावे गंधर्वलोकच भूतलावर अवतरला आहे ! शाहेद परवेजने सतारीवर मालकंसचे गंभीर आणि कल्पक आलाप घेऊन जोड आणि द्रुताला वाजवला. तयारी आणि सौंदर्य यांचा अतिसुंदर संगम या सतारवादनात दिसून आला. गत सुरू झाली आणि जाकीर हुसेनने एक ढंगदार मुखडा घेऊन अशा काही डौलात सम पकडली की, वाहवाच्या जल्लोषाने सारा मंडप दणाणून गेला सतारीच्या प्रत्येक सवालाला बिनतोड जवाब देऊन या देखण्या आणि प्रतिभावंत तबलावादकाने सर्वांचीच मने जिंकून घेतली. तबला इतका सुंदर वाजू शकतो याची कल्पना जाकीरचा तबला ऐकल्याशिवाय येऊच शकत नाही. मालकंस रागानंतर एक धून वाजवून शाहेदने सतारवादन संपवले; पण लोक जाकीरला जाऊ द्यायला तयार नव्हते. लोकांच्या विनंतीला मान देऊन जाकीरने थोडा वेळच तबलावादन केले आणि आपल्या अद्भुत कौशल्याने लोकांना चकित केले. त्याचा तबला ऐकून वाटते, कलावंत जन्मावा लागतो हेच खरं !

बनारसच्या नामवंत गायिका गिरिजादेवी यांनी कौंसीकानडा एक टप्पा आणि त्यानंतर एक ठुमरी सादर केली. मधुर आवाजाच्या या गायिकेचं गायन लोकांना आवडलं.

यानंतर रंगमंचावर आलेल्या यामिनी राजूरकरांचे गायन मात्र त्या रात्री नेहमीप्रमाणे रंगले नाही. त्यांचा आवाज त्रास देत होता. त्यांनी राग परज आणि त्यानंतर टप्पा सादर केला.

मैफलीची सांगता पं. जसराज यांनी केली. प्रसन्न मुद्रा, भावपूर्ण गायन आणि मधुर गाजेदार आवाज यामुळे त्यांचे तासभरच झालेले गायन अविस्मरणीय झाले.ललत रागातला ख्याल आणि भैरवीतले भजन त्यांनी सादर केले. पंडितजींच्या गायनातली उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यांनी अगदी कमी घेतलेली सरगम. पूर्वी त्यांच्या गायनात या सरगमचा अतिरेक असायचा; पण त्यांनी हल्ली आपले गाणे कसे नीटनेटके केले आहे.

शनिवारची रात्र ! अफाट गर्दी ! सूर्यकांत खळदकरांनी सनईवर कलावती आणि धून वाजवली. सदाशिव जाधवांनी पूरियाचा ख्याल आळवला. त्यानंतर किराणा घराण्याचा नवा अंकुर आणि भीमसेन जोशी यांचा शिष्य आणि हो, सवाई गंधर्वांचा नातू, श्रीकांत देशपांडे रंगमंचावर आला. उमदे व्यक्तिमत्त्व असलेल्या या तरुण गायकाने आपल्या भरदार आवाजात पूर्वाकल्याण आळवला. सुरेलपणा आणि उत्तम दमसास यामुळे त्याचे गायन आकर्षक झाले. श्रोत्यांवर त्याची छापही चांगली पडली; पण गुरूची सहीसही नक्कल न करता त्याने आपले स्वतंत्र गायन करावे, अशी सूचना करावीशी वाटते. परंपरा म्हणजे नक्कल नव्हे. असो. 'पंढरी निवासा' हा अभंगही त्याने चांगला म्हटला.

आप्पा जळगावकरांचे पेटीवादन हल्ली लोकांना परिचितच आहे. त्यांनी वाजवलेला जोगकंस आणि त्यानंतरची पहाडी धून लोकांना खूपच आवडली. पहाडीमध्ये अनेक चमत्कार आणि कल्पक जागा होत्या.

कार्तिककुमार हे पं. रविशंकर यांचे शिष्य. त्यांनी मालकंस चांगला आळवला. त्यांना जर तबल्याची चांगली साथ मिळाली असती तर त्यांचा कार्यक्रम आणखी रंगला असता. जाकीर हुसेन त्यांची साथ करणार होते; पण ते न येऊ शकल्यामुळे दुर्दैवाने त्यांच्याबरोबर चंद्रकांत कामत बसले. मालकंसानंतर एक धून वाजवून कार्तिककुमारांनी आपले सतारवादन संपवले.

यानंतर सौ. सरस्वती राणे यांचा सत्कार झाला.

सत्कारानंतर किराणा घराण्याच्या श्रेष्ठ गायिका गंगूबाई हनगल यांनी कलावती आणि राग बसंत सादर केला. गायनाची साथ कृष्णा हनगलने फार सुंदर केली. पातळ, हलका पण टोकदार आवाज असलेल्या कृष्णाचे गाणे ऐकणे हा एक अति सुखद अनुभव असतो. शेषगिरी हनगलने तबल्याची साथही छान केली.

वाय. डी. जोशी यांच्या अहिरभैरवानंतर फिरोझ दस्तूर रंगमंचावर आले. त्यांनी बैरागी भैरव सुरेख आळवला. परंपरा सांभाळून नाविन्य आणण्याची, नवीनतेचा शोध घेण्याची त्यांची वृत्ती अलीकडे त्यांच्या गायनात दिसते. बैरागीनंतर भीमसेनजींच्या फरमाइशीवरून त्यांनी लोकांना आवडणारी चीज ' गोपाला मोरी करुणा क्यूं नही आये ' अत्यंत रसाळपणे आळवली. त्यानंत जोगिया रागातली ' पियाके मिलन की आस ' ही ठुमरी अत्यंत रसपूर्णतेने आळवून त्यांनी आपले गायन संपवले.

पहाट झाली होती. मंडप माणसांनी ओसंडून चालला होता. श्रोते अधीरतेने आपल्या लाडक्या गायकाची वाट पहात होते. भीमसेनजी रंगमंचावर आले आणि टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने त्यांचे स्वागत झाले. तंबोरे जुळले. वाटले होते की, दरवर्षीप्रमाणे पंडितजी तोडीच ऐकवणार; पण नाही. शुद्ध गांधार झाला आणि ललत रागाचा परिमल दरवळू लागला.

भीमसेनजींनी या नेहमीच्याच परिचित रागिणीत अशा काही चमत्कृतिपूर्ण जागा घेतल्या की, फिरोझ दस्तूरसारखा गायकदेखील चमकून वाहवा म्हणाला ! भीमसेनजींच्या गायकीचे वर्णन किती वेळा आणि कसे करायचे ? एखादा स्वरांचा प्रचंड प्रपात यावा आणि त्याने श्रोत्यांना आपल्याबरोबर नादसागरात ओढून न्यावें तसे त्यांचे गाणे झाले. ललतनंतर ' जमुनाके तीर ' ही भैरवी गाऊन त्यांनी आपले गायन संपवले. त्यानंतर सवाई गंधर्वांची भैरवीची ध्वनिमुद्रिका लावली गेली तेव्हा दहा हजार लोक चुपचाप उभे होते. लहान मुलेसुद्धा हू का चू करीत नव्हती. वय, गरीब-श्रीमंत सारेसारे विसरून गानसमाधीत एकरूप झालेला तो प्रचंड जनसमुदाय पाहून वाटले, आपल्या समाजाला एकत्र आणणारी आणि एकत्रच ठेवणारी एकमात्र शक्ती म्हणजे आपले अमोल संगीत ! त्या नादशक्तीला विनम्र अभिवादन करूनच बाहेर पडलो. सूर्याचे कोवळे किरण पसरले होते. यंदा डिसेंबरात पुन्हा हा सोहळा ऐकायला मिळणार होता. तोवर स्वरांची ही शिदोरी पुरणार होती. □

# जमीनसुधारणा

## काँग्रेसच्या पुढे पाऊल नाही

वा. दा. रानडे

जनता पक्ष लोकशाहीवादी आहे, आणीबाणीच्या काळातील लोकशाहीची गळचेपी करणारे निर्बंध रद्द करून लोकशाहीची त्याने पुन्हा प्रस्थापना केली ही त्याची सर्वात महत्त्वाची कामगिरी; पण लोकांचे एवढयाने समाधान होणारे नाही. समाजपरिवर्तन घडवून आणणाऱ्या आर्थिक व सामाजिक कार्यक्रमाची कितपत परिणामकारक अंमलबजावणी तो करीत आहे, याबाबतीत काँग्रेसच्या चार पावले पुढे तो जात आहे की नाही, हा जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. जनता पक्ष प्रतिगामी आहे, भांडवलदारांच्या आणि बडया शेतकऱ्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारा आहे, अशी टीका इंदिरा गांधी त्यांच्यावर नेहमी करीत असतात. जनता पक्षाच्या कार्यक्रमात समाजवाद शब्द कोठेही नाही असे सांगितले जाते; पण इंदिरा गांधींसारखी समाजवादाची फसवी भाषा वापरून जनतेची फसवणूक जनता पक्षाने केलेली नाही हे खरे. इंदिरा गांधींच्या राजवटीत बडया उद्योगपतींजवळची संपत्ती वाढत गेली, हे अधिकृत सरकारी अहवालातील आकडेवारीनेच सिद्ध केलेले आहे. काँग्रेस पक्षाला तीस वर्षांत जे साधले नाही ते जनता पक्षाने दोन वर्षांत साधावे अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे; पण समाजपरिवर्तनाच्या मार्गावर ठाम पावले तो टाकीत आहे, याची खूण पटविणारे काही निर्णय, काही कृती दाखविता येतील का? आर्थिक-सामाजिक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा या दृष्टीने वस्तुनिष्ठ आढावा अंतर्मुख होऊन घ्यावयास हवा.

समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने जमीनसुधारणांचा कार्यक्रम महत्त्वाचा व अग्रक्रमाचा आहे; पण या बाबतीत जनता पक्षाची कामगिरी निराशाजनक आहे. या क्षेत्रात काँग्रेसपेक्षा अधिक प्रगती तो करू शकलेला नाही. भूमिहीनांना जमीनवाटप करण्याचे काम फार मंदगतीने चालू आहे. जमीनदार कोर्टात गेल्याने अंमलबजावणीला वेग येत नाही, हे एक कारण सांगण्यात येते व ते खरे आहे. कमाल जमीनधारणा कायद्याबाबतचे सत्तावीस हजारांपेक्षा अधिक दावे निरनिराळया राज्यांतील हायकोर्टांत अजून अनिर्णित आहेत. त्यांचा निकाल लागणार केव्हा आणि भूमिहीनांना जमीन मिळणार केव्हा? हा विलंब टाळण्यासाठी हे कायदे घटनेच्या नवव्या परिशिष्टात समाविष्ट करण्याचा निर्णय केंद्र सरकारने नुकताच घेतला. या परिशिष्टात समाविष्ट केलेल्या कायद्याविरुद्ध कोर्टात जाता येत नाही. इंदिरा गांधींनी आणीबाणीत या परिशिष्टाचा मोठया प्रमाणावर दुरुपयोग केला होता हे खरे; पण जमीनसुधारणांच्या अंमलबजावणीसाठी त्याचा उपयोग करायला काहीच हरकत नाही. नवव्या परिशिष्टात समाविष्ट करावयाचे कायदे जमीनसुधारणेपुरतेच मर्यादित असावेत, असे मत सुप्रीम कोर्टाने नुकतेच एका निकालात व्यक्त केले आहे. जनता सरकारने हा मार्ग वास्तविक यापूर्वीच अवलंबावयास हवा होता.

न्यायालयात अडकून पडलेले दावे बाजूला ठेवू या. जेथे न्यायालयांचा काही संबंध येत नाही त्या बाबतीत काय? कायद्याने ज्यादा ठरलेली जी जमीन सरकारने ताब्यात घेतली आहे तिचे वाटप लौकर पूर्ण करण्यास सरकारचे हात कोणी बांधले होते? पण सरकारच्या ताब्यात असलेल्या जमिनीपैकी फक्त एकतृतीयांश जमिनीचे वाटप आतापर्यंत झाले आहे. वाटपाचे काम पूर्ण करण्यासाठी राज्यांना केंद्र सरकारने तीन वेळा मुदत वाढवून दिली; पण तीन राज्यांतील जनता सरकारांनी या बाबतीत काहीही केलेले नाही. बाकी राज्यांतील प्रगतीही समाधानकारक नाही. दोन राज्यांनी तर जमीनमालकांना अनुकूल अशा दुरुस्त्या करण्याची परवानगी केंद्राकडे मागितली आणि त्यांना ती देण्यात आली. असे घडत असेल तर जनता पक्षाला आणि जनता सरकारला भूमिहीन शेतमजुरांचे व छोटया शेतकऱ्यांचे कैवारी कशाच्या आधारावर म्हणावयाचे?

महाराष्ट्रातही जमीनसुधारणा यशस्वी झालेल्या नाहीत. श्री. गौतम एस्. जो. व्होरा यांनी 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या २३ फेब्रुवारी १९७९ च्या अंकातील लेखात या अपयशाकडे लक्ष वेधले आहे; पण त्याचा विचार करण्यापूर्वी संबंध देशपातळीवर अपेक्षित काय होते आणि प्रत्यक्षात जे साधले ते किती कमी आहे, यासंबंधी त्यांनी दिलेले काही आकडे बोलके आहेत. कमाल जमीन धारणा कायदे अंमलात आल्यानंतर २ कोटी ८० लाख हेक्टर जादा जमीन भूमिहीनांना वाटण्यासाठी उपलब्ध होईल असा मूळचा अंदाज होता; पण प्रत्यक्षात फक्त ४५ लाख हेक्टर जमीन उपलब्ध असल्याचे जाहीर करण्यात आले आणि ही सर्व जमीनसुद्धा राज्यसरकारे ताब्यात घेऊ शकली नाहीत, याचे कारण जमीनमालकांनी कोर्टात जाऊन मनाई मिळविली.

महाराष्ट्रात कमाल जमीन धारणा कायदा १९६२ साली अंमलात आल्यावर सव्वा लाख हेक्टर जादा जमीन सरकारने ताब्यात घेतली. त्यापैकी फक्त २५० हेक्टर जमीन बागायती होती ओसाड, नापीक जमीन भू-दान करून टाकायाची असा अनुभव भू-दानात कार्यकर्त्यांना आला. कमाल जमीन धारणा कायद्याखाली जी जादा जमीन भूमिहीनांना वाटण्यासाठी द्यावयाची त्याबाबतीत असाच अनुभव बहुतेक सर्वत्र येत आहे. उपलब्ध ज्यादा जमिनीपैकी ५०% जमीन महाराष्ट्र सरकारने भूमिहीनांना दिली; पण केवळ जमीन देण्याने सरकारचे कर्तव्य संपत नाही. या जमिनीतून चांगले पीक काढण्यासाठी शेतीची अवजारे, बियाणे, जंतुनाशके खरेदी करण्याकरिता भूमिहीनांना कर्ज मिळण्याची सोयही सरकारने करायला हवी. सहकारी संस्थांमार्फत कर्जवाटप केले जाते; पण या संस्थांवर जमीनमालकांचेच वर्चस्व असल्याने ८० ते ९० टक्के कर्ज त्यांनाच मिळते आणि भूमिहीनांच्या वाटयास फार थोडी रक्कम येते.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर शिक्षणाबाबत सर्वत्र एक योजना अंमलात आणली; पण कूळकायद्याच्या बाबतीत एकसूत्रीकरण झाले नाही. 'कसेल त्याची जमीन' हे या कायद्यामागील तत्त्व. त्यानुसार २५ लाख कुळे ते कसत असलेल्या जमिनीची मालक बनायला

पृष्ठ १९ वर

# गॉर्की कॉलनी

: लेखक :

## ए. एस. मकरेन्को

: अनुवाद :

## मीनाक्षी कोल्हटकर

कथासूत्र : कॉलनीच्या आसपासच्या दारूच्या भट्ट्यांचा कॉलनीतल्या मुलांवरही परिणाम झालाच. एक दिवस मुलांनी डॉरमिटरीत दारू पिऊन धिंगाणाही केला. शेवटी कॉलनीच्या आसपासच्या भागातल्या साऱ्या चोरट्या भट्ट्या उखडून टाकायचं आन्तोननं ठरवलं. धाडी घातल्या गेल्या आणि एक उपद्रव बंद झाला; पण लवकरच कॉलनीत पैसे लावून जुगार खेळणं सुरू झालं. काही चोऱ्या देखील झाल्या. त्यामध्ये मिट्यागीन पकडला गेल्यावर आन्तोननं एका खुल्या चर्चेत मुलांकडून 'पुन्हा जुगार खेळणार नाही' असं वचन घेतलं आणि सगळे पत्ते तलावात फेकून द्यायला लावले.

हळूहळू पुन्हा कॉलनीतलं जीवन स्थिरावयाला लागलं. जवळच्या शहरातले लोक आम्हाला 'गॉर्काइट' म्हणून ओळखायला लागले. गोन्चारोवका गावातल्या सधन शेतकऱ्यांशी झगडा करूनच तिथली आमची साठ एकर जमीन आम्हाला नांगरायला मिळाली. त्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये आठ बिघे जमीन हिरव्यागार पिकानं खुलली होती……

### प्रकरण बारावे

## ब्रॅटचिन्को व पुरवठाअधिकारी

आमच्या शेतीकामाला काहीशी चमत्कारिक व खेदजनक सुरुवात झाली. कालिनासाहेबांनी एक गाय कुठल्याशा खात्यातून मिळविली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ती गाय जन्मजात दूध न देणारीच असावी. नंतर दुसरा चमत्कार म्हणजे आमचा काहीही संबंध नसताना शेतकी खात्याकडून, पुराणवस्तुसंग्रहालयात ठेवण्यास योग्य अशी एक काळी, ढेरपोटी व जात्याच आळशी घोडी मिळाली. तीही मोठी लहरी होती. त्यामुळे एक बैलगाडी व एक बग्गी आमच्या आवारात दिसू लागली. ती बग्गी त्या वेळी आम्हाला अतिशय सुंदर व उपयुक्त वाटत असे. त्या बग्गीला जोडायला साजेसे घोडे मिळण्याचा चमत्कार मात्र काही केल्या घडून येईना.

गुडने घोड्याच्या तबेल्याचे काम सोडून दिले व तो मोचीकाम करू लागला. त्याच्याऐवजी ब्रॅटचिन्कोने तबेल्याच्या कामाचा ताबा घेतला. ब्रॅटचिन्को जसा अति उत्साही तसाच त्याचा स्वाभिमान अति हळवाही होता. सहीसच्या खुर्चीत बसून तो लांब तंगड्यांचा 'रेड' व जाडजूड पायांचा 'बॅंडीट' यांची गाडी हाकीत असे. ब्रॅटचिन्कोनेच हे नाव त्या घोडीला दिले होते. हा बॅंडीट चालताना अडखळे व सपशेल रस्त्यात बैठक मारी. ही गाडी व घोडाजोडी कित्येकदा आमची फजिती करीत. जवळच्या गावात गाडी घेऊन गेले की, लोक व रस्त्यावरील खेळणारी पोरे आमच्या घोड्यांची टर उडवीत. ब्रॅटचिन्को या साऱ्या टवाळीमुळे चिडून जाई व गॉर्की कॉलनीची बदनामी करण्यात आणखी भर घाली.

ब्रॅटचिन्कोला मारामारीची फार हौस. त्यामुळे तो स्वतःच खोड्या काढून किंवा काही विचित्र भाष्य करून अगर कसला तरी आवाज काढून दुसऱ्यांना सतावी व मारामारी ओढवून घेई.

तो तसा काही अनाथ मुलगा नव्हता. त्याचे वडील शहरातल्या बेकरीत काम करीत होते. खरे तर तो आपल्या आई-बापांचा एकुलता एक मुलगा होता; पण त्याला घरचे सुख खपत होते असे दिसते. घराचा उपयोग फक्त झोपण्यासाठीच तो करीत असे. बाकी सर्व वेळ मोहल्ल्यातल्या उनाड मुलांबरोबर खोड्या काढण्यात घालवी. दोन-तीन वेळा केलेल्या मूर्ख साहसामुळे स्वारी जेलची हवाही खाऊन आली. शेवटी आमच्या कॉलनीत त्यांची रवानगी झाली होती. तो उंचापुरा व दिसायला देखणाच म्हटला पाहिजे; परंतु वयाने फक्त पंधरा वर्षांचा होता. तो कसावसा लिहायला व वाचायला शिकला. साहसी गोष्टींचे पुस्तक त्याने उत्तम प्रकारे आत्मसात केले होते. अभ्यास करणे त्याला जमले नाहीच. सुरुवाती-सुरुवातीला तो मध्येच नाहीसा होई व दोन-तीन दिवसांनी पुन्हा दिसे. कॉलनीचा नियम मोडल्याबद्दल त्याला जराही खंत वाटत नसे. माझ्याशी कडकपणे वागा, नाही तर मी डाकू बनेन असं तो स्वतःच मला सांगे.

त्याने कॉलनीत कधीही चोरी केली नाही. प्रामाणिकपणाने तो राहिला; परंतु शिस्त पाळणे हे त्याच्या डोक्यात कधीही शिरले नाही. कॉलनीचे नियम पाळणे आवश्यक आहे, असे त्याला कधीच

वाटले नाही. ते न पाळण्याला तत्कालिन परिस्थितीच कारणीभूत असल्याचे तो सांगून टाकीत असे; परंतु त्याला माझा धाक मात्र वाटत असे. तरीसुद्धा कानउघाडणी केलेली कधीच ऐकून घेत नसे. अशा वेळी तो फार चतुर भाषण करी. आपले अनेक शत्रू आपल्याला कसे सतावतात, उदा० तेच आपली बदनामी करतात, आपली व्यवस्था चांगली नाही यासाठी तेच कारणीभूत आहेत, असे उलट मला ऐकवी आणि शेवटी गैरहजर असलेल्या शत्रूंवर चाबूक उडवीत काहीच झाले नाही अशा थाटात माझ्या पुढून निघून जाई. सर्व शिक्षकांबरोबर अतिशय उर्मटपणे वागे. तो त्याचा उर्मटपणाही कौतुकास्पद होता. त्याच्यावर कुणी फारसे रागावत नसे. कारण त्याच्या वागण्यात माणुसकीची झलक असे. तसेच कोणाशीही तो स्वार्थासाठी भांडत नसे.

कॉलनीमध्ये ब्रॅटचिन्कोचे वागणे घोड्याभोवती व तबेल्याभोवती जडलेले होते. हे जबरदस्त आकर्षण कशामुळे होते तेच समजत नसे. एकंदरीत तो बुद्धीने बाकी मुलांच्यापेक्षा हुशार होता. तो स्वच्छ शहरी रशियन भाषेत बोले. क्वचित कधी तरी युक्रेनियन वाक्प्रचार त्याच्या तोंडून निघत. तो स्वतः नीटनेटका राही. खूप वाचन करी. त्या वाचनावर चर्चा करणे त्याला आवडत असे; परंतु घोड्यांच्या व तबेल्यांच्या कामाच्या आड पुस्तकवेड येत नसे. घोड्यांना खरारा करणे, त्यांना स्वच्छ ठेवणे, तबेल्याची स्वच्छता राखणे ही सारी कामे तो स्वतः जातीने करीत असे. तो कधीच दमलेला दिसला नाही. कुठल्याही ऋतूत–उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा असो–तो कामासाठी खेपा घालण्यात कुचराई करीत नसे; परंतु तो कायम अर्धपोटी असे. कारण तो वेळेवर जेवायला-खायला जात नसे. त्याचा वाटा राखून ठेवायला विसरले तरी तो त्याबद्दल तक्रार करीत नसे.

ब्रॅटचिन्कोच्या घोड्याच्या तैनातीत मधूनमधून कालिनासाहेब, लोहार किंवा भांडाराचे मॉनिटर किंवा बाहेर जाऊ इच्छिणारी मुले यांच्यातल्या बाचाबाचीमुळे खंड पडत असे. ही बाचाबाची बहुधा घोड्यांना इतर मुलांनी खूप फिरविले किंवा घोड्यांच्या मानेला व पायांना जखमा वगैरे झाल्या तर त्यावरून उठत असे. पुष्कळदा कॉलनीच्या बाहेर जाणे, त्याच्या व घोड्यांच्या गैरहजेरीमुळे अडून पडत असे. त्यांचे नाहीसे होणे अचानक होई व अर्धेअधिक कॉलनीतले लोक त्यांना शोधायला बाहेर पडत. ब्रॅटचिन्को व त्याचे घोडे शेजारच्या ट्रेपके कॉलनीत किंवा जवळच्या कुरणात मजेत बसलेले आढळून येत.

ब्रॅटचिन्को घोड्यांच्या भोवती सतत पिंगा घाली. त्याच्याभोवती दोन-तीन छोट्या मुलांचा एक घोळका नेहमी पिंगा घालीत असे. ही मुले घोड्यांना हाताशी ठेवीत व तबेला आणि घोडे दोघेही अतिशय स्वच्छ व नीटनेटके ठेवीत. जमीन स्वच्छ केलेली असे. गाड्या ओळीत ठेवलेल्या असत. घोड्यांचा खरारा योग्य रीतीने केलेला असे. मेलेली कबुतरे घोड्यांच्या डोक्यावर व्यवस्थित टांगून ठेवलेली असत. जोखड जाग्यावर ठेवलेले असे. घोड्यांची आयाळ नीट विंचरलेली असे.

जूनमधल्या एका संध्याकाळी काही मुले माझ्याकडे धावत आली व सांगू लागली, 'कोझीयर फार आजारी आहे. तो अगदी मरायला टेकला आहे!'

'मरायला टेकलाय?'

'हो खरंच. त्याचं सारं अंग तापलंय व श्वासोच्छ्वास घेणं कठीण झालंय!'

एकतेरीनाने पण या बातमीला दुजोरा दिला व ताबडतोब डॉक्टरला आणण्याची आवश्यकता आहे, असे म्हणाली. मी ब्रॅटचिन्कोला बोलावणे पाठवले; परंतु कोणाचाही हुकूम अंगावर घ्यायचा नाही अशा आविर्भावाने जणू काही त्याने प्रवेश केला.

'ब्रॅटचिन्को, ताबडतोब घोडे जोड व शहरात जा!' मी त्याला फर्मावले. त्याने माझे बोलणे न ऐकता एकदम 'मी जाणार नाही!' असे उलट बजावले. 'कारण घोडे अतिशय दमलेले आहेत व मी त्यांना आता त्रास देणार नाही!'

'तुला काही समजतं का? आपल्याला डॉक्टरना आणण्यासाठी जायचं आहे.'

'कोण आजारी आहे त्याची मला फिकीर नाही. माझा रेड पण आजारी आहे व त्याच्यासाठी मात्र कोणी डॉक्टर आणायची गोष्टही काढीत नाहीत.'

माझा तोल एकदम गेला. मी ओरडून सांगितलं, 'तबेल्याचा ताबा ताबडतोब आंप्रेश्कोला दे! तुझ्याबरोबर काम करणे अशक्य आहे!'

'आंप्रेश्कोला खुशाल ताबा घेऊ दे. आंप्रेश्को कसं चालवतो ते मीही पाहीन! आन्तोनसाहेब, कोणीही काही तरी सांगते आणि त्यावर तुम्ही विश्वास ठेवता; परंतु आपल्या घोड्यांच्याबद्दल तुम्हाला जराही दया-माया नाही. मी घोड्यांना तुमच्या ताब्यात देणार नाही!'

'माझं तुला ऐकलं पाहिजे! तू आजपासून घोड्यांचा रईस नाहीस आणि ताबा आंप्रेश्कोला देऊन टाक!'

'ठीक आहे. ताबा देऊन टाकतो. मला काय करायचं? मी कॉलनीत पण रहाणार नाही!'

'तुला काय हवं ते कर. तुला कोणीही अडवणार नाही!'

ब्रॅटचिन्कोने पाणावलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे पहात आपले खिसे चाचपून त्यातून किल्ल्यांचा जुडगा बाहेर काढला व माझ्या टेबलावर टाकला. आंप्रेश्को–ब्रॅटचिन्कोचा सहाय्यक–आपल्या रडत असलेल्या सवंगड्याकडे आश्चर्याने पहात राहिला. ब्रॅटचिन्कोने मात्र त्याच्याकडे उपहासाने पाहिले. त्याच्या मनात काही तरी बोलायचे होते; पण शब्द फुटत नव्हते. नाक व डोळे सदऱ्याच्या बाहीला पुसून काहीही न बोलता तो खोलीबाहेर चालता झाला. शहरात जाणाऱ्या कॉलनीच्या मुलांनी त्याला रस्त्याने रडत जाताना पाहिले. त्यांनी त्याला गाडीत बोलावले असताना त्याने नकार दिला.

दोन दिवसांनंतर आंप्रेश्को घाईघाईने माझ्या कचेरीत आला. तो रडत होता व त्याच्या तोंडावर बरेच ओरखडे दिसत होते. मी त्याला काही विचारण्यापूर्वीच लिडीया पेट्रोव्हना अत्यंत विमनस्क मनःस्थितीत खोलीत शिरली व म्हणाली,

'आन्तोन सेमियानोविच, ताबडतोब तबेल्यात जा! ब्रॅटचिन्को परत आलाय व तबेल्यात हल्लागुल्ला करतोय!'

वाटेवर आम्हाला फेडेरेन्को भेटला. तो रागारागाने ओरडत होता.

'काय झालं?' असे मी त्याला विचारले.

तो म्हणाला, 'याला इथं यायचा काय अधिकार आहे? त्यानं

मला फावडयानं तोंडावर मारलं ! '

'कोणी ? ब्रॅटचिन्कोनं ? ' मी विचारले.

'होय. ब्रॅटचिन्कोनंच !'

मी तबेल्यात पाहिले तर ब्रॅटचिन्को व दुसरी दोन-तीन मुले जोरजोराने साफसफाई करीत होती. ब्रॅटचिन्कोने मला सलाम केला; पण आप्रेस्कोला माझ्यामागे उभा असलेला पाहून तो माझे अस्तित्व विसरला. त्याच्यावर ब्रॅटचिन्को तुटून पडला !

'तू इथून चालता हो नाही तर मी तुला मारीन ! पहा माझ्या रेडची काय अवस्था आहे ती. फार चांगला ड्रायव्हर आहेस तू !'

एका हातात कंदील घेऊन ब्रॅटचिन्को मला घेऊन रेडजवळ गेला. खरोखरच रेडच्या पायावर जखम झाली होती व सूजही आली होती. ब्रॅटचिन्कोने त्यावर नुकतीच मलमपट्टी केलेली दिसत होती. तो म्हणाला, 'मी आताच औषध लावलेले आहे.'

'पण तुला तबेल्यात यायला कोणी परवानगी दिली व वर आणखी मारामारी करायला पण परवानगी मिळाली ?'

'मी काय उगाच्या उगाच मारलं का ? त्यानं माझ्या तबेल्याच्या कामात नाक खुपसू नये. नाही तर पुन्हा मी त्याला चांगला बदडीन!'

इतक्यात बरीचशी मुले तबेल्याच्या दाराशी जमून हसत होती. ब्रॅटचिन्कोवर रागवायला माझे मन घेईना. आपण व आपले घोडे जराही चुकत नाहीत असे त्याला मनापासून वाटत होते.

मी त्याला सांगितले, 'हे पहा, ब्रॅटचिन्को, मुलांना मारल्याबद्दल मी तुला संध्याकाळपर्यंत माझ्या खोलीत बसण्याची शिक्षा देत आहे.'

'मला तुमची शिक्षा वगैरे ऐकायला वेळ नाही !'

'मुकाट्यानं सांगितलेले कर !' मी ओरडून सांगितले.

'ठीक आहे. मी कुठल्याही एका खोलीत बसून रहातो.'

ती संध्याकाळ त्याने माझ्या खोलीत पुस्तक वाचीत काढली. १९२२ च्या हिवाळ्यात ब्रॅटचिन्कोने व मी खूप त्रास काढला. कालिनासाहेबांनी त्या खडकाळ जमिनीत लावलेल्या ओकच्या पेरणीचे फारसे उत्पन्न मिळाले नाही. कारण त्याला खतही घातले नव्हते. त्यामुळे दाणे तर फारसे नाहीच मिळाले; पण गवत-काडी-सुद्धा मिळाली नाही. अजूनपर्यंत आम्हाला आमची स्वतःची अशी जमीन नव्हती. जानेवारीमध्ये आम्हाला वैरणीचा तुटवडा पडला. सुरुवातीला आम्ही शहरातून किंवा शेजाऱ्यांकडून आणून भागवीत होतो; परंतु तेही मिळेनासे झाले. शहरातल्या कचेरीतले उंबरठे आम्ही झिजवले; पण काहीच उपयोग झाला नाही.

'आता मात्र खरी कसोटीची वेळ आहे.' ब्रॅटचिन्को डोळ्यात पाणी आणून सांगत होता, 'गेले दोन दिवस घोड्यांना दाणा-वैरण मिळाली नाही !' मी गप्प बसलो होतो. ब्रॅटचिन्को तोंडाने बडबडत सारा वेळ तबेला साफ करीत बसे. कारण त्याला दुसरे काहीच काम नव्हते. घोडे बिचारे जमिनीवर हात-पाय पसरून बसले होते. ब्रॅट-चिन्कोनं ते माझ्या नजरेला आणले. पण करणार काय ?

दुसऱ्या दिवशी कालिनासाहेब शहरातून परत आले. ते चिडलेल्या मनःस्थितीतच होते.

'काय करायचं ? हे लोक काही आपल्याला द्यायला तयार नाहीत !'

ब्रॅटचिन्को दारात गुपचुप उभा होता. कालिना आपले हात जोराने हालवून त्याच्याकडे पहात म्हणाला, 'हां, आपण चोरी करायची काय ? बिचारी मुकी जनावरं !'

ब्रॅटचिन्कोने दरवाजा एकदम उघडला. तो धावतच बाहेर पडला. एका तासानंतर मला सांगण्यात आले की त्याने कॉलनी सोडली !

'तो गेला तरी कुठं ? ' मी विचारले.

'मला तरी काय ठाऊक ? त्यानं कोणालाही सांगितलेलं नाही.'

दुसऱ्या दिवशी ब्रॅटचिन्को परत आला. एकटाच नव्हे तर एका खेडुताबरोबर गाडीभर गवत घेऊन आला. त्या खेडुताच्या अंगावर चांगल्यापैकी गरम कोट व फरची टोपी होती. ती गाडी सावकाश कॉलनीच्या आवारात शिरली. त्याची गाडी चांगल्यापैकी होती व घोडे तर अगदी उमदे दिसत होते. त्याने कालिनासाहेब इथले अधिकारी असावेत असे जाणले व तो म्हणाला,

'या मुलाने मला रस्त्यात सांगितलं की तुम्ही वस्तूच्या रूपानं कर घेता व म्हणून मी गाडीभर गवत घेऊन आलो आहे.'

'कुठल्या मुलानं ही माहिती दिली ?'

'अहो, तो तर आता माझ्याबरोबर आला !'

बिचारा ब्रॅटचिन्को तबेल्याच्या दारातून मला खुणेने काही सांगा-यचा प्रयत्न करीत होता.

कालिनासाहेब गालातल्या गालात हसले. मला एका बाजूला नेऊन म्हणाले, 'काय करू या ? घेऊ या का हे ? आताची वेळ तरी घेऊ या. पुढचं पुढं पाहू.'

मी सर्व काही समजलो. त्या खेडुताला विचारले, 'याचं काय वजन असावं ?'

'हे एकूण २० मण आहे !' त्याने सांगितले.

ब्रॅटचिन्को पुढे गेला व त्या खेडुताला म्हणाला,

'रस्त्यानं येताना १७ मण असावं असं तू म्हणालास आणि आता २० मण कसे झाले ? काही नाही. ते १७ मणच आहेत !'

'बरं ते खाली उतरव. मग माझ्या ऑफिसात येऊन पावती घेऊन जा !'

ऑफिस म्हणजे खरं तर काय ? कसेबसे ते बनवले होते. मी पावती लिहून दिली. पावती लिहिताना मन कचरत होते. ओनोप्री वॅटस् नागरिक याने गवताच्या रूपाने कर दिला, अशी पावती लिहून दिली.

वॅटस्ने मला सलाम केला व माझे आभार मानले आणि पावती घेऊन तो निघून गेला.

ब्रॅटचिन्को अतिशय आनंदात होता व आपल्या सहकाऱ्याबरोबर तबेल्यात लुडबूड करीत होता. कालिनासाहेब मात्र स्वतःशीच हसत हात चोळीत उभे होते.

'लक्षात ठेव. आपल्याला या भानगडीचा नक्कीच त्रास होणार आहे !'

'होऊ दे. बिचाऱ्या घोड्यांना काय उपाशी ठेवायचं ? तीही शेवटी राष्ट्रीय संपत्तीच आहे ना ?' तो खेडूत एवढा आनंदित कशानं झाला होता कोणास ठाऊक ! का होऊ नये ? त्याचा शहरात जाऊन रांगेत उभे राहून वेळ मोडायचा त्रास वाचला नाही का ? आणि आपण काय मोजून घेतलंय ? तो सतरा म्हणाला, आपण सतरा म्हणालो. एकंदरीत त्याचा फायदाच झाला. कदाचित ते

पंधरा मणच असतील.

दोन दिवसांनी गवताने भरलेली आणखी एक गाडी आमच्या आवारात उभी राहिली.

'मी पण कराची रक्कम वस्तू रूपानं द्यायला आलो आहे.'

'तुझं नाव काय बाबा?'

'मी पण एक वॅटस्‌च आहे. स्टीफनवॅटस्!'

'जरा थांब हं,' असं त्याला सांगून कालिनासाहेबांशी विचार-विनिमय करण्यासाठी आत गेलो. दारातच मला ब्रॅटचिन्को भेटला. मी त्याला उद्देशून म्हणालो, 'चांगलं केलंस बाबा. वस्तूरूपानं कर भरायची लोकांची चांगली सोय करून ठेवलीस.'

तो म्हणाला, 'आन्तोनसाहेब, घेऊन टाका ते! खात्याच्या प्रमुखाची आपण नक्कीच समजूत घालू शकू.'

त्या घेणे किंवा न घेणे या दोन्ही गोष्टी धोकादायकच होत्या. कारण एका वॅटस्‌कडून घेतले तर दुसऱ्या वॅटस्‌कडून का घेतले नाही, असा प्रश्न उपस्थित झाला असताच. म्हणून मी त्याला गाडी खाली करून देण्यास सांगितले व त्याला पावती दिली. अशा तऱ्हेने आम्ही दोन-तीन गाड्या दाणागोटा व गवतकाडी कर म्हणून मिळविली.

मनातल्या मनात मी चांगलाच घाबरलो. ब्रॅटचिन्को मात्र मधून मधून माझ्याकडे मिष्किलपणाने पाहून हसत असे; पण अलीकडे मात्र तो कोणाशीही भांडत नसे. कोणीही केव्हाही सांगितले तरी तो गाडी जोडून शहरात जाण्यास तयार होई आणि सारा वेळभर तबेल्यात खपत असे.

शेवटी एक दिवस व्हायचे तेच झाले. पुरवठाखात्याच्या जिल्हा-धिकाऱ्याकडून मला एक चिठ्ठी आली. ती अशी :

'वस्तूच्या रूपाने आपण करवसुली केलीत. ही वसुली कुठल्या अधिकारात आपण केलीत त्याचा ताबडतोब खुलासा करा!'

मी याच्याबद्दल कालिनासाहेबांकडेसुद्धा काहीही बोललो नाही. त्याला उत्तरही पाठवले नाही. माझ्याजवळ उत्तर तरी काय होते?

एप्रिल महिन्यात एक दिवस दोन घोड्यांची एक गाडी कॉल-नीच्या आवारात येऊन थडकली. ब्रॅटचिन्को घाबऱ्याघुबऱ्या माझ्या ऑफिसमध्ये आला.

'ते आले आहेत!' त्याने सांगितले.

'ते कोण?' मी त्याला विचारले.

'बहुधा आपण घेतलेल्या गवताची चौकशी करण्यासाठी ते आले असावेत. ते चांगलेच रागावलेले दिसतात!'

ब्रॅटचिन्को तिथेच शेगडीच्या मागे गुपचूप लपून बसला. पुरवठा-खात्याचा जिल्हाधिकारी माझ्या ऑफिसात येऊन थडकला. त्याने अंगात चामड्याचे जाकीट घातले होते व त्याच्या हातात पिस्तुल होते.

'तुम्हीच का या कॉलनीचे डायरेक्टर?' त्यांनी विचारले.

त्यावर मी 'होय' असे सांगितले.

'माझे पत्र तुम्हाला मिळाले की नाही? त्याला उत्तर का पाठविले नाहीत? त्याचा अर्थ काय समजायचा? मी काय स्वतः इथं येऊन विचारलं पाहिजे? तुम्हाला परवानगी कोणी दिली?'

मी शांतपणे उत्तर दिले, 'होय साहेब, ते गवत आम्ही कराच्या




रूपानं घेतलं. आम्ही कुणाचीही परवानगी घेतलेली नाही.'

अधिकारी ताडकन् उभा राहून ओरडला, 'काय, म्हणताय काय तुम्ही? बिगरपरवाना तुम्ही ते घेतलंत याचा परिणाम काय होईल माहीत आहे काय? तुम्हाला अटक करण्यात येईल!'

'होय मला ते माहीत आहे. तुम्हाला काय हवं ते करा. मी कोणत्याही तऱ्हेनं मला वाचवायचा प्रयत्न करणार नाही; पण कृपा करून आरडाओरडा करू नका!'

तो माझ्या त्या छोट्याशा ऑफिसमध्ये येरझारा घालीत राहिला. तो तोंडाने बडबडत होता, 'काय कटकट आहे!'

एवढा वेळ कोपऱ्यात बसलेला ब्रॅटचिन्को पुढे झाला व त्या अधिकाऱ्याकडे रागारागाने पाहत बोलू लागला,

'आमच्या जागी कोणीही असतं तरी तेच केलं असतं. घोड्यांना काय उपाशी मरू द्यायचं होतं? तुमच्या या काळ्या कुळकुळीत घोड्यांना चार दिवस खायला न देता नुसतं वर्तमानपत्र वाचायला दिलं असतं तर ते तुम्हाला या कॉलनीत आता घेऊन येऊ शकले असते का?'

जिल्हाधिकारी आश्चर्याने त्याच्याकडे बघत म्हणाला, 'तू कोण रे मध्ये बोलणार? तुझं इथं काय काम आहे?'

मी त्याला सांगितले, 'हा आमचा मुख्य सईस आहे. त्यामुळेच याला घोड्याच्या खाण्याची चिंता पडली होती.'

अधिकारीसाहेब परत येरझारा घालू लागले. ब्रॅटचिन्कोच्यासमोर मध्येच उभे राहून म्हणाले, 'तुम्ही निदान तुमच्या रजिस्टरात नोंद तरी करून ठेवली आहे का? नाही तर आणखी एक कटकट!'

ब्रॅटचिन्को घाईघाईने माझ्याजवळ येऊन म्हणाला, 'आन्तोन, आपण सारी नोंद करून ठेवली आहे नाही का?'

मी व जिल्हाधिकारी हसू लागलो हसत हसत मी त्याला सांगितले, 'होय, आम्ही त्याची नोंद केली आहे.'

'ही एवढी हुशार मुलं तुम्हाला कोठं मिळाली?' अधिकाऱ्याने मला विचारले.

'मिळाली नाहीत; पण मी त्यांना तयार केली आहेत.'

ब्रॅटचिन्को अधिकाऱ्याच्या जवळ जाऊन त्याच्या डोळ्याला डोळा भिडवून म्हणाला, 'काय साहेब, तुमच्या घोड्याला दाणा-वैरण घालू का?'

'अवश्य घाल, अवश्य घाल!' तो म्हणाला. □

## प्रकरण तेरावे

# असादची

१९२२ चा हिवाळा व वसंत ऋतू यामध्ये गॉर्की कॉलनीत अनेक वादळे उठून गेली. ही वादळे इतकी एकापाठोपाठ आली की, त्या सगळ्यांचा माझ्या स्मृतीत एकची दुर्दैवी गुंता होऊन राहिलाय.

तरीही ते आमचे नैतिक व भौतिक वाढीचे दिवस मानले पाहिजेत. तसे पाहिले तर संकटे व प्रगती या दोन्ही परस्परविरोधी गोष्टी आमच्या बाबतीत त्या वेळी खऱ्या झाल्या. मला आता सांगतानासुद्धा त्याचा त्रास वाटतो; परंतु ती वस्तुस्थिती होती. तरीही कॉलनीत उगवणारा प्रत्येक दिवस हा अतिशय चांगला दिवस म्हटला पाहिजे. भरपूर काम, एकमेकांबद्दल विश्वास, आस्था व त्याचबरोबर हास्यविनोद आणि उत्साहाचे वातावरण भरपूर प्रमाणात दिसे. असा एकही आठवडा गेला नाही की ज्या वेळी आमच्यावर काही तरी संकट ओढवले नाही व आम्ही एखाद्या अजाणाबारखे होत असू. असे अनेक दाखले देता येतील की, ज्यामुळे आमचा धीर खचला व जगाकडे पहाण्याचा दृष्टिकोनही बदलला.

अनपेक्षितपणे आमच्या कॉलनीत ज्यूविरोधी वातावरण निर्माण झाले. आतापर्यंत आमच्याकडे एकही ज्यू नव्हता; परंतु त्याच वर्षी एक ज्यू मुलगा आमच्याकडे भरती झाला. त्यानंतर अनेक जणांची भरती झाली. त्यांच्यापैकी एकजण गुप्तचर खात्यात काम केलेला होता आणि तो आमच्या पहिल्या विद्यार्थ्यांच्या रोषाचा विषय बनला.

प्रथमप्रथम खरे गुन्हेगार कोण हे मला समजत नसे; परंतु नंतर भरती झालेले काहीजण पक्के ज्यूविरोधक होते. त्यांना त्यांच्या दांडगाईला मोकळा वाव मिळायला ते कारणीभूत होते. जुन्या लोकांना ज्यूविरोधक हे एक मस्ती करायला नवीन साधन मिळाले. आमच्या पहिल्या ज्यू मुलाचे नाव अस्त्रोमुकोव. त्याला केव्हाही, कुठेही, कोणीही धरून मारीत असत.

सतत मार देणे, चिडवणे, चांगल्या वस्तू काढून घेणे, जेवण काढून टाकणे, निरनिराळ्या घाणेरड्या नावांनी पुकारणे वगैरे मार्गांनी या बिचाऱ्या मुलाचा छळ केला जात असे. या दुर्दैवी लोकांच्यात आस्त्रोमुकोव, श्वेनँदर, ग्लैसर, फ्रेदिक वगैरे लोकांचा समावेश होता. या सगळ्यांना विरोध करता करता आमची पुरेवाट होत असे. या मुलांच्या ज्यूविरोधी सर्व कारवाया अत्यंत गुपचूपपणे चालत असत. बिचारी ज्यू मुले अतिशय घाबरून रहात व कधीही तक्रार करीत नसत. त्यामुळे त्यांना होणारा त्रास आम्हाला निरनिराळ्या खुणांवरून किंवा त्यांच्या उतरलेल्या चेहऱ्यांवरून ओळखावा लागे. कधी कधी छोट्या मुलांच्या गप्पा-गोष्टींतून आम्हाला या साऱ्याचा सुगावा लागे.

शिक्षकलोकांच्या नजरेतून हा ज्यूविरोध निसटला नाही व याच्यामागे असलेल्या मुलांची नावेही आमच्या लक्षात येऊ लागली. त्यामध्ये बुरुन, मिट्यागिन, वोल्कोव, प्रिखोदको हे होतेच; पण मुख्य पुढारीपण असादची व तारानेटस् यांच्याकडे होते.

अत्यंत हुषार, चपळ व काम पार पाडण्यात तत्परता यामुळे तारानेटस् हा मोठ्या मुलांच्यातला गळ्यातला ताईत होता. परंतु नवीन आलेल्या काही मोठ्या मुलांच्यामुळे त्याच्या कर्तृत्वाला जरा खंड पडला होता; परंतु ज्यू मुलांना त्रास देण्यात त्याला एक नवीन काम मिळाले. असादची हा साधारणपणे सोळा वर्षांचा अत्यंत दणकट प्रकृतीचा असून त्याला नीती-अनीतीची क्षिती नव्हती. त्याला आपल्या भूतकाळाचा फार अभिमान होता. त्याचा भूतकाळ मोठा गौरवशाली होता म्हणून नव्हे; परंतु तो त्याचा भूतकाळ होता व

त्यांच्या आयुष्याशी कोणाचाही संबंध नव्हता.

असादची तसा व्यवस्थित. आपला कुठलाही दिवस आनंदात उपभोगायचा अशी त्याची वृत्ती होती. ही वृत्ती पण जरा विचित्रच. जवळच्या पिरोगोवका गावाला वारंवार भेट देणे हा एक त्याचा आनंदविषय होता. पिरोगोवका गावाची ख्याती होती तिथल्या सुंदर मुलींच्याबद्दल व हातभट्टीच्या दारूबद्दल. या गावात साधारण मध्यम शेतकरी व लहान व्यापारी यांची जास्त वस्ती होती. असादचीला हेच एक आनंदाचे साधन होते. त्याचा दुसरा सहाध्यायी म्हणजे एक उनाड व भटक्या मुलगा—गलातेन्को.

असादचीने आपल्या केसांची रचना फार मजेदारपणे केली होती. त्यामुळे त्याला आजूबाजूच्या वातावरणाचा त्रास होत नसे. पिरोगोवका गावातल्या मुलींना वश करायचे ते एक साधन होते. मी त्याच्या कारभारात जेव्हा जेव्हा ढवळाढवळ करी, त्या त्या वेळी असादची केसांच्या झुलपांतून माझ्याकडे तिरस्काराने पाहत असे. पिरोगोवका गावाला भेट देण्यासाठी मी त्याला मनाई केली होती व त्याने आपला जास्तीत जास्त वेळ कॉलनीतच खर्च करावा अशी सक्ती केली होती.

असादची ज्यू मुलांना त्रास देण्याचा पुढाकार घेई; परंतु त्याला ज्यूविरोधी असे म्हणता आले नसते. कारण बिचाऱ्या ज्यू मुलांना कुठल्याही तऱ्हेने प्रतिकार करता येत नव्हता. म्हणून असादचीला कॉलनीमधला हिरो बनायची संधी मिळाली.

आम्हाला विचारपूर्वक ह्या ज्यूविरोधकांचा मुकाबला करण्याची क्रिया करायची होती. कारण अशा तऱ्हेच्या कुठल्याही कारवाईचा उलट परिणाम होणे इष्ट नव्हते. कारण असादचीसारखे लोक हातघाईवर यायलाही कमी पडले नसते. म्हणून अत्यंत सावधगिरीने, कुठल्याही प्रकारचा सुगावा लागू न देता एकाच घावात या सगळ्या गोष्टींचा मुळापासून शेवट करावयाचा होता !

मी असादची व तारानेटस् यांना सर्वांपासून अलग पाडावयाचे ठरविले. काटाबानोव, मिटचागिन, प्रिखोदको व बुरुन हे सर्व माझ्या जवळपास येत होते. मी त्यांच्या भरंवशावरच विसंबून होतो; परंतु ज्यू मुलांना त्रास देणार नाही, अशी मी फक्त त्यांच्याकडून हमी घेतली.

'परंतु आम्ही सबंध कॉलनीपासून ज्यू मुलांचं संरक्षण कसं करू शकणार ? ' असा त्यांनी सवाल केला.

'तसं नव्हे रे, मी कुणाबद्दल बोलतो ते तुम्हाला चांगलं माहीत आहे ना ?'

'समजा, मी तुमच्या शब्दाला जागलो तरी अस्त्रोमुकोव्हला माझ्या पाठीशी बांधून फिरू शकत नाही. बाकीची कॉलनीतली मुलं त्याला पकडून मारतीलच ! ' काराबानोव म्हणाला.

मिटचागिन स्पष्टपणे बोलला, 'आपण बुवा असले काही करणार नाही; परंतु मी त्यांना काही स्वतःहून त्रास देणार नाही ! मला त्यांच्याशी काय करायचंय ? '

झादारोव्हला मात्र माझ्या मनाची कळकळ या सगळ्यांच्यापेक्षा जास्त जाणवली. तरीही असादचीसारख्या मुलाबरोबर उघड वैर धरायला तो तयार होईना.

'काही तरी केलंच पाहिजे; पण काय करावं ते मलाही सुचत नाही. ते सर्वजण जसं तुमच्यापासून लपवून ठेवतात तसंच माझ्यापासूनही लपवून ठेवतात. फक्त ते माझ्यासमोर त्यांच्या अन्नाला हात लावीत नाहीत. एवढंच ! ' झादारोव्ह म्हणाला.

परंतु दिवसेंदिवस ज्यू मुलांची अवस्था कठोर होऊ लागली. रोजरोज ज्यू मुलांच्या अंगावर कुठेकुठे जखमा दिसू लागल्या. विचारले असताना ते कुठल्याही गोष्टीचा सुगावा लागू देत नव्हते. असादची अरेरावीने कॉलनीत मिरवत होता. माझ्याकडे आणि शिक्षक लोकांकडे त्याच्या केसांच्या झुलपातून दिमाखाने बघत होता.

शेवटी एक दिवस जणू काही माजलेल्या बैलाला त्याच्या शिंगांना धरून पकडावे तद्वतच मी असादचीला धडा शिकवावयाचे ठरविले. मी त्याला माझ्या ऑफिसमध्ये बोलावून घेतले व जाब विचारला. परंतु त्याने असे दाखविले की, जणू काही आपण त्या फंदातले नव्हेतच ! आपण फक्त रीत म्हणून विरोध दाखवितो.

'तू त्यांना रोज बडवून काढतोस असं मला कळतंय !'

'तसं काही नाही !' तो निर्विकारपणे बोलला.

'तुला कॉलनीतून हाकलून देईन !' मी त्याला अशी धमकीही देऊन पाहिली.

'बेशक काढून टाका !' तो म्हणाला.

त्याला पक्के माहीत होते की, कॉलनीतून त्याला हाकलून देणे हे काही इतके सोपे नव्हते. अनेक अर्ज शिक्षणखात्याकडे पाठवावे लागले असते, अनेक प्रकारच्या चौकशा झाल्या असत्या. खुद्द असादचीला बोलावून वारंवार अनेक प्रश्न विचारण्यात आले असते.

असादचीमध्ये सध्या काही मला फारसा रस नव्हता. कारण असादचीकडे कॉलनीतले सर्व लोक त्याने केलेल्या अत्याचारामुळे कौतुकाने बघत होते. अशा वेळी त्याला कॉलनीतून काढून टाकणे हे त्याचा गौरव करण्यासारखेच ठरले असते. असादचीने कधीही कोणाचे ऐकले नाही, कोणाची भीती बाळगली नाही, तर शिस्तीने ज्यू मुलांना मारहाण केली होती, तीही विनाकारण ! म्हणून त्याला काढून टाकले, असा बोलबाला होऊन फुकट त्याला मोठेपणा मिळाला असता. शिवाय असादची काही एकटाच नव्हता. तारानेटससुद्धा असादचीहून जरा कमी ताकदवान असला तरी छळण्याचे प्रकार शोधून काढण्यात असादचीपेक्षा काकणभर जास्तच हुशार होता. त्याने ज्यू मुलांना प्रत्यक्ष कधी मारले नाही. उलट सगळ्यांच्या समोर त्यांच्यावर प्रेम करण्याचा आव तो उत्तम प्रकारे आणी; परंतु रात्रीच्या वेळी ज्यू मुलांच्या पायांना कागद लावून त्याला हळूच आग लावून आपण खुशाल झोपेचे सोंग घेई किंवा एखाद्या मुलाचे एकाच बाजूचे केस मुळासकट उपटून टाकीत असे. यासाठी फ्रेदरेन्कोसारख्या मठ्ठ मुलांचा उपयोग करून घेत असे. अशा तऱ्हेने अर्धवट केस कापलेला तो मुलगा राहिलेले सारे केस कापून टाकण्याची विनंती करीत असे.

या सर्व दुर्दैवी प्रकारांची सुरुवात अनपेक्षितपणे कॉलनीत चालू होती. अर्थात ती कुठल्याही प्रकारे कॉलनीला फारशी हितावह नव्हती.

एका संध्याकाळी माझ्या ऑफिसचा दरवाजा उघडून इव्हानोविच हे शिक्षक अनुक्रमे अस्त्रोमुकोव्ह व श्वेनायदर या मुलांना घेऊन आत आले. त्यांच्या तोंडांतून रक्त येत होते; पण डोळ्यांतून अश्रू मात्र येत नव्हते. ते बिचारे मार खायला इतके सरावलेले होते.

'असादचीनं मारलं काय ?' मी विचारले.

शिक्षकांनी खालीलप्रमाणे माहिती सांगितली.

'जेवताना श्वेनायदर हा वाढण्याच्या कामावर होता. प्रत्येक वेळी असादचीनं त्याला उगीचच बशा बदलायला लावल्या. एका वेळी बशी आणताना श्वेनायदरचं बोट सूपच्या बशीत बुडलं होतं. असादची रागारागानं आपल्या जागेवरनं उठला. शिक्षकांच्या समोर आणि कॉलनीतल्या मुलांच्या समोर त्यानं श्वेनायदरला थोबाडात मारण्यास सुरुवात केली. श्वेनायदरनं मुकाट्यानं मार खाल्ला असला तरी ड्युटीवर असलेल्या शिक्षकांना ते पटण्यासारखं नव्हतं. त्यांनी असादचीला जेवणघर सोडून जाण्यास सांगितलं व तडक माझ्या ऑफिसात जाऊन मला भेटण्याचा हुकूम दिला!'

'मी डायरेक्टरसाहेबांना जाऊन भेटतोच!'

'आणि याच वेळी जणू काही एक चमत्कार घडला. आस्त्रामुकोव्ह आपल्या जागेवरून उठला व त्याने असादचीच्या अंगावर झेप घेतली. 'मी तुला माझ्या मुलांना उगाचच्या उगाच मारू देणार नाही!' त्याने असादचीला सांगितले; परंतु शेवटी असादचीने अस्त्रामुकोव्हला बेदम मारले आणि बाहेर आल्यावर श्वेनायदरसुद्धा घाबराघुबरा उभा होता. त्याच्याही तोंडावर ठोसा लगावला. तो इतक्या जोराने लगावला की, श्वेनायदरचा एक दात तुटून पडला. असादचीने माझ्या ऑफिसात जायचे नाकारले.'

माझ्या ऑफिसात श्वेनायदर व अस्त्रोमुकोव्ह तोंडातून येणारे रक्त सदऱ्याच्या बाहीने पुसत होते; परंतु नवलाची गोष्ट म्हणजे त्यांच्या डोळ्यांतून जराही पाणी येत नव्हते. सर्व काही संपले असा आविर्भाव त्यांच्या तोंडावर दिसला. माझी स्वतःची पण खात्री झाली की, आता काही तरी केलेच पाहिजे, नाही तर या ज्यू मुलांना इथून निघून जावे लागेल किंवा त्यांना हुतात्मा व्हावे लागेल. मला एकाच गोष्टीचे सर्वांत वाईट वाटले की, सर्व मुले– झादारोव्हसुद्धा– या सगळ्या प्रकाराकडे तटस्थपणे पहात होती. त्यामुळे कॉलनीच्या स्थापनेच्या सुरुवातीच्या दिवसांत जसे मला एकाकी वाटत होते, तसेच आताही वाटू लागले. फरक एवढाच होता की, त्या सुरुवातीच्या दिवसांत तो एकाकीपणा स्वाभाविक होता व मी सहानुभूती किंवा पाठिंबा यांची अपेक्षा केली नव्हती. आता मात्र मी प्रत्येक गोष्टीत माझ्या मुलांच्या पाठिंब्याची व सहकार्याची सवय लावून घेतली होती. एव्हाना माझ्या ऑफिसात बरेचजण जमले होते. मी त्यांना हुकूम केला, 'असादचीला बोलवा!'

मला वाटले होते, असादची येणार नाही. म्हणून मी मनाशी निश्चय केलेला होता की, जरूर पडल्यास पिस्तुलाचा उपयोग करून त्याला आणायचेच.

परंतु असादची तरातरा ऑफिसात आला. त्याचे जाकीट त्याच्या खांद्यावर लोंबत होते. दोन्ही हात विजारीच्या खिशात घातलेले होते. त्याच्याबरोबर तारानेटस् पण आला. तारानेटस्च्या चेहऱ्यावर असा काही भाव होता की, ही काय सारी गंमत चालली आहे ती आपणही पाहून घेऊ.

असादचीने माझ्याकडे पाहून विचारले, 'मला कशाला बोलावलंत ?'

मी श्वेनायदर व अस्त्रोमुकोव्ह यांच्याकडे बोट दाखवून त्याला विचारले, 'याचा अर्थ काय ?'

'हात्तिच्या, एवढंच ? मला वाटलं, तुम्ही मला खरोखरच काही तरी नवीन दाखवणार.' तो म्हणाला.

एकाएकी शिक्षणतंत्राची वाट लागली. क्षणभर मी सारे विसरलो. माझ्या टेबलाजवळ असलेली मोजण्याची चौकट मी असादचीच्या दिशेने भिरकावली. माझा नेम चुकला व ती भिंतीवर आपटून खाली जमिनीवर पडली.

मी रागाने बेभान झालो होतो. दुसरी काही तरी वस्तू असादचीवर फेकून मारण्यासाठी मी शोधत होतो; पण काहीच सापडले नाही. जवळची खुर्ची घेऊन मी असादचीच्या अंगावर धावून गेलो. तो घाबरून दाराकडे धावू लागला; परंतु त्याचा कोट त्याच्या पायात अडकला व तो जमिनीवर पडला.

इतक्यात माझे डोके ठिकाणावर आले. कोणी तरी माझ्या खांद्याला स्पर्श केला. मी वळून पाहिले, तर झादारोव माझ्याकडे बघून गालातल्या गालात हसत होता. तो म्हणाला, 'त्या बदमाषाची लायकी नाही.'

असादची जमिनीवर धापा टाकीत बसला होता. तारानेटस् भीतीने पांढराफटक पडला होता. त्याचे ओठ भीतीने थरथरत होते व तो कसाबसा खिडकीच्या वर बसला होता. मी त्याच्याकडे बघून विचारले, 'या पोरांना मारण्यात तूही भागीदार होतास का ?'

'मी खरोखर सांगतो की, असं पुन्हा कधीही करणार नाही.'

'इथून ताबडतोब चालता हो.' मी त्याला फर्मावले व तो तिथून


आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा
वेगळा शोध

प्रभावी, परखड आणि प्रामाणिक

**जनांचा प्रवाहो चालिला**

लेखक : विनय हर्डीकर

किंमत : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

हळूच निसटला.

शेवटी असादची उठून उभा राहिला. एका हातात त्याने जाकीट पकडले होते व दुसरा हात तोंडावरून फिरवून भीतीची सारी चिन्हे त्याने काढून टाकली. त्याच्या डोळ्यांतून एक अश्रू बाहेर पडला. त्याने गंभीरपणे माझ्याकडे पाहिले.

'आजपासून तू चार दिवस नुसती भाजी व भाकरी यावर मोचीखात्यात बसून काढायचं.'

दुसऱ्या दिवशी त्याने माझी क्षमायाचना केली व आपण परत असे कधीही करणार नाही, असे विनवू लागला.

'तुझी शिक्षा पूर्ण झाल्याशिवाय आपण कसलाच विचार करणार नाही.'

शिक्षेच्या शेवटच्या दिवशी त्याने क्षमायाचना केली नाही; परंतु तो म्हणाला, 'माझे कागद मला द्या. मी इथून जातो.'

'तुला जायचंय तर खुशाल जा. तुझे कागद वगैरे काही एक मिळणार नाही.'

'ठीक आहे,' असे म्हणून तो निघून गेला. ¤

## प्रकरण चवदावे

# शाईच्या दौती—चांगल्या संबंधाचं प्रतीक !

असादची कुठे गेला याची कोणालाच कल्पना नव्हती. कोणी म्हणत, तो ताश्कंदला गेला. तिथे थोडक्या पैशात हौसमौज करायची सोय होती. दुसरे काही म्हणत की, असादचीचा मामा आमच्या जवळच्या शहरात रहात होता. त्याच्याकडे तो गेला असावा. काहीजण म्हणत, तो आपल्या जुन्या मित्रांच्याकडे गेला असावा.

मध्यंतरी झालेल्या या प्रकरणामुळे माझे मानसिक स्थैर्य पार बिघडले होते. त्यातच मुले असादचीबद्दल प्रश्न विचारून डोके उठवीत. मी त्यांना विचारीत असे,

'असादची तुमचा कोण ? तुम्हाला एवढी काळजी का ?'

'आम्हाला त्याची मुळीच काळजी वाटत नाही.' काराबानोव एक दिवस म्हणाला, 'तो इथं असला तर बरं होईल. निदान ते तुमच्या दृष्टीनं तरी बरं झालं असतं.'

'तुझ्या बोलण्याचा अर्थ मला समजला नाही.'

काराबानोवनं माझ्याकडे मांत्रिकाच्या विचित्र अशा नजरेने पाहिले, 'मला वाटतं तुम्हाला कुठं तरी मनात खोलवर खुपतंय !'

मी म्हटले, 'तुझं ते आत्माबित्मा सर्व खोटं आहे. तुला काय वाटतं, मी माझा आत्मा तुला अर्पण करावा ?'

काराबानोव तिथून मुकाट्यानं निघून गेला !

नंतरच्या काळात कॉलनीत पुन्हा खेळीमेळीचे वातावरण सुरू झाले. माझ्या खोलीच्या खिडकीखाली मुलांचे घोळके जमून थट्टामस्करी, विनोद करीत असत जणू काही तेवढीच जागा सर्वांना जमण्यास योग्य अशी असावी. परंतु त्यांच्यामध्ये तणातणी नव्हती; पण एके दिवशी एकातेरीना माझ्याकडे येऊन समजुतीच्या सुरात म्हणाली, 'आन्तोन, कशाला उगाच डोक्याला त्रास करून घेता ? ते सर्वच विसरून जाऊ या !'

'मी कुठं त्रास करून घेतोय ? मी केव्हाच विसरून गेलो; पण कॉलनीतलं वातावरण कसं आहे ते मला सांगा !'

'मी खरं सांगू का ? माझं मलाच समजत नाही !' ती म्हणाली, 'तसं सर्व काही ठीक आहे असं म्हणायला हरकत नाही. आपली ज्यू मुलं मजेत आहेत. एवढंच की, जे झालं त्यामुळं ती थोडी हादरली आहेत; परंतु ती कामं वगैरे व्यवस्थित करतात. तुम्हाला कल्पना येणार नाही, पण आपली मोठी मुलं फारच चांगल्या तऱ्हेनं या ज्यूंबरोबर वागतात. आपला मिट्यागिन तर एखादी नर्स आजाऱ्याबरोबर वागेल अशा थाटात वागत असतो. एक दिवस तर त्यानं ग्लेसरला आंघोळ घातली. त्याचे केस कापले आणि त्याच्या सदऱ्याची बटनंसुद्धा शिवून दिली !'

तसे पाहिले तर वरवर खरोखरच ठीक चालले होते; परंतु शिक्षणतंत्रशास्त्राचा आत्मा कुठं होता ? तो या सगळ्या भानगडीत बलबलून गेला होता. मला खरोखरीच एका गोष्टीची खंत वाटे. मला या शिक्षणतंत्राचं खरेखुरे गुपित कधी कळणार ? एकदा वाटे, ते अगदी माझ्या हाताजवळ आहे. मला फक्त हात पसरून ते गोळा करायचंय. एवढे खरे, काही मुलांच्या बाबतीत सुधारणा झाल्यासारखी वाटत होती; परंतु एकाएकी सारे कोसळल्यासारखे वाटत असे. पुन्हा सारी नव्याने सुरुवात करावी लागणार नाही ना, अशी शंका वारंवार मनात येई.

मला शिक्षणतंत्र खालच्या पातळीवर का न्यावं लागतं याचा राग येई. शिवाय माझ्याही तंत्रात कमतरता असावी असे वाटून मी खूप विचार करी व एकंदर शिक्षणतंत्रावरच राग काढीत असे.

हे शिक्षणतंत्र किती हजारो वर्षांपासून चालू आहे, असा माझ्या मनात विचार आला. कोणती कोणती नावे माझ्या डोळ्यांसमोर आली—पेस्टॉलॉजी, रूसो, नार्टोप, ब्लॉन्सकाय ! किती किती ग्रंथरचना केली असेल ? हजारो मण कागद खर्ची पडले असतील ! केवढी नावे गाजली असतील, पण सर्व व्यर्थ ! शेवटी या सगळ्याचा अर्थ असा की, एका ठराविक तंत्राने सगळ्या गुंड हृदयांचे परिवर्तन कसे करता येईल, हे निश्चितपणे कोणी सांगू शकत नाही. एवढे खरे की, एकच काही तंत्र नाही, एकच काही तर्कशास्त्र नाही तर इकडून तिकडून जमा करून मग स्वतःच्या अनुभवातूनच ते प्राप्त होते.

पण अगदी खरोखर मी मनापासून असादचीबद्दल विचार केला नाही. मी त्याला आठवायचा कधीही प्रयत्न केला नाही. मी त्याला माझ्या मनातून कधीच काढून टाकला होता. थोडक्यात म्हणजे तो सौदा तोट्यात पडला, असे समजून मी चालला होतो. त्याच्या त्या चमत्कारिक जाण्यामुळे मला काही विशेष वाटले नाही.

पण तो लवकरच परत आला !

एक नवीनच संकट आमच्यावर कोसळले. मला चटका बसून केस ताठ कसे होतात याचा अनुभव लवकरच आला.

एका हिवाळयाच्या रात्रीत असादचीसकट काही पाचसहा मुलं पिरोगोवका गावातल्या मुलांबरोबर काही लफडयात सापडली. त्या गडबडीचे लवकरच हाणामारीत पर्यवसान झाले. आमच्या बाजूने सुऱ्या व काठया आणि विरुद्ध बाजूने चक्क पिस्तुलांचा उपयोग केला गेला. त्या मारामारीचा शेवट आमची बाजू विजयी होण्यात झाला ती गावातली मुले हाकलून दिल्यानंतर रस्त्याकडे गेली व तिथून पसार झाली. त्यांनी ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये आसरा घेतला. त्याच दिवशी तीन वाजता ग्रामपंचायतीच्या ऑफिसवर पुन्हा हल्ला चढला आणि त्यांना तिथून पळवून लावले. दारे, खिडक्या साफ मोडून टाकली. एवढयावरच न थांबता त्या गावच्या मुलांचा पाठलाग चालूच राहिला ती मुले ग्रामपंचायतीच्या ऑफिसमधून आपापल्या घरी पळाली. गावची मुले या सगळया प्रकारानंतर निसटली व गॉर्की कॉलनीची मुले विजयी होऊन कॉलनीत परत आली.

ग्रामपंचायतीच्या जागेची सर्व नासधूस झाली. दारे–खिडक्या सपशेल मोडून टाकल्या गेल्या आणि आतल्या फर्निचरची विल्हेवाट लावण्यात आली तिथे बसून काम करणे दुसऱ्या दिवशी अशक्य झाले. सारे कागद फाडून शाईच्या दौतीसुद्धा फोडून तोडन टाकण्यात आल्या होत्या

दुसऱ्या दिवशी हे सगळे गुंड जणू काही झालेच नाही, अशा थाटात काम करू लागले; परंतु दुपारी पिरोगोवका गावाचा सरपंच आदल्या रात्रीची कहाणी सांगण्यासाठी माझ्याकडे आला.

मी त्याच्याकडे आश्चर्याने पाहत राहिलो. तो बिचारा अगदी हड-कुळा, ठेंगणा–ठुसका माणूस, तो माझ्याशी बोलत होता त्याचेही मला आश्चर्य वाटले. खरे तर त्याने पोलिसांना बोलावून मी व आमच्या कॉलनीतले गुंड यांना पोलिसांच्या ताब्यात द्यायला पाहिजे होते.

परंतु तो सरपंच रागावण्याऐवजी सारी हकीकत मला कळवळून सांगत होता. पंचायतीच्या ऑफिसची मोडलेली दारे, खिडक्या तसेच फर्निचर दुरुस्त करून द्यावे अशी त्याने विनंती केली. सर्वांत वरकडी म्हणजे त्याने आमच्याकडे दोन दौती काही दिवसांकरिता मागितल्या.

या सगळया प्रकारामुळे मी तर आश्चर्यचकित झालो. एवढा सौम्य प्रस्ताव त्याने का मांडला असावा याचे मला आश्चर्य वाटले. मी किंवा तो सरपंच आम्हा दोघांनाही झालेल्या प्रकाराच्या भयानक-तेची जाणीव तेवढीशी झालेली नव्हती व म्हणून आम्ही खुशाल बोलत बसलो होतो.

'ती सारी दुरुस्ती आम्ही अवश्य करून देऊ,' असे मी त्याला आश्वासन दिले व चटकन् दोन दौती काढून त्याच्या हातात दिल्या.

सरपंचाने त्या दोन्ही दौती अलगदपणे आपल्या जवळ धरल्या. खरे तर त्या अगदीच सामान्य होत्या.

'आम्ही आपले सामान अवश्य दुरुस्त करून देऊ' मी पुन्हा एकदा त्यांना बजावले, 'मी आताच माणूस पाठवून देतो. फक्त खिडक्यांची काचेची तावदानं बसवायचं काम जरा उशीरा करावं लागेल. कारण काचा आणण्यासाठी आपल्याला शहरात जावं लागेल'

सरपंचाने माझ्याकडे कृतज्ञतापूर्वक पाहिले. तो म्हणाला, 'मग सारंच काम तुम्ही काचा मिळाल्यावर करायला हरकत नाही.'

मी म्हटले, 'ठीक आहे. उद्या करून टाकू.'

पण हा अजूनही तिथून पाय काढीत नव्हता त्याचे मला आश्चर्य वाटले. शेवटी मी त्याला विचारले, 'तुम्ही सरळ घरीच जाणार का?'

त्याने एकदा इकडे तिकडे पाहून खिशातून हातरुमाल काढला व उगीचच आपल्या मिशांवरून फिरविला.

माझ्या जरा जवळ सरकून तो म्हणाला, 'घरीच जाणार; पण त्याचं असं आहे की, तुमची पोरं ही सगळी तरुण आहेत. त्यात माझा मुलगाही त्यांच्याचसारखा तरुण आहे. ती सारीच तरुण आहेत आणि त्यांना थोडीशी गंमत हवी असते; पण देवाच्या कृपेने काही अनुचित प्रकार घडला नाही. त्यांना जोडीदारीण हवी असते. आपण लहान असताना असंच नव्हतो का करीत?'

'आपण काय म्हणताय त्याचा मला बोध होत नाही. जरा नीट स्पष्ट सांगाल का?'

'काही नाही हो. साधी बंदूक.'

'बंदूक? कसली बंदूक? काय म्हणता काय तुम्ही?'

'काही नाही हो. ते आपली गंमत करीत होते. तुमच्या मुलांनी माझी एक घेतली आणि कोणाची तरी एक आणखी आणली. ती बहुधा हरवली आणि काय व्हायचं ते झालं. कुठून त्यांना ते मिळालं ते त्यांचं त्यांनाच माहीत; पण ती चांगलीच चढली होती एवढ मात्र खरं.'

'पण कुणाला जास्त चढली होती?' मी विचारले.

'जाऊ द्या हो. कोण आणि काय. मी कुठं तिथं होतो? पण म्हणतात तुमच्याच मुलांना जरा जास्त चढली होती.'

'आणि तुमच्यांचं काय झालं होतं?'

सरपंच जरा घुटमळले. 'अहो, मघाशीच सांगितलं ना. मी तरी कुठं होतो तिथं? त्यातून काल रविवार होता. मी काय हे सांगण्या-साठी आलो नाही. ते सारे तरुण आहेत. असं थोडं-बहुत चालायचंच; पण कुणी मारलं गेलं नाही, किंवा कुणाला दुखापत झाली नाही. आता तुमच्या मुलांना काय झालं असलं तर मला ठाऊक नाही.'

'मी माझ्या मुलांकडे याबद्दल अजून काहीच बोललो नाही.'

'मलाही ऐकून माहीत आहे; पण म्हणतात, बंदुकीचे आवाज ऐकू आले. मला वाटतं, तुमची मुलं त्या मानानं जरा जास्त चपळ आहेत. आमची तशी जरा सुस्तच आहेत. आलं ना तुमच्या लक्षात?'

तो माणूस मनापासून हसला. त्याचे डोळे खरोखर प्रेमळ व स्नेह-भरे दिसले. अशा म्हाताऱ्या माणसाला दादा म्हणतात. त्याच्याकडे पाहून मलाही हसू आले; परंतु मनातल्या मनात मात्र मी पुरा गडबडून गेलो होतो.

'मग तुमचं काय म्हणणं की, तसं काही फारसं घडलं नाही? त्यांनी मारामारी केली; पण ते आपसात मिटवून टाकतील असंच ना?'

'बरोबर. कसं बोललात? त्यांनी आपसात मिटवलंच पाहिजे. आमच्या तरुणपणी आम्ही एखाद्या पोरीवरून मारामारी करीत असू. माझ्या एका भावाला एकदा मरेमरेतो मारला होता. तुम्ही एकदा तुमच्या मुलांशी बोला म्हणजे पुन्हा असं कधी घडणार नाही.'

'काल कोणकोण पिरोगोवकाला गेले होते त्यांनी माझ्यासमोर

उभे रहा!' मी हुकूम सोडला. एक मुलगा घाईघाईने इकडून तिकडे जात होता. त्याला ओरडून परत एकदा सांगितले, 'मला माहीत नाही असं कसं म्हणतोस? तुला चांगलंच ठाऊक आहे. ताबडतोब सगळयांना इकडे बोलाव!'

'बरं, बरं! बुरुनला मी पाठवून देतो!' असे घाईघाईने तो म्हणाला व बुरुन तिथे हजर पण झाला.

'असादची कॉलनीत आहे का?' मी विचारले.

'होय, आहे! तो आपल्या लोहारखात्यात काम करतोय.'

'तू त्याला इकडे पाठवून दे आणि सर्व मुलांना सांग की, पिरोगोवका गावाला गेलेल्या सर्वांनी येथे या!'

'आपण काल गेलो होतो असं काहीजण म्हणतात खरे!' बुरुन म्हणाला.

'तू असादचीला ताबडतोब बोलाव. पिरोगोवकाचा सरपंच माझ्या ऑफिसात आहे. म्हणून सर्वांनी ताबडतोब जमावं!'

माझ्या ऑफिसात रात्री पिरोगोवकाला गेलेले सगळे वीर जमले. असादची, प्रिखोदकोव, चोवोट, अँप्रेश्को, गोलोझ, गलातेन्को, सोरोका इ. इ. काही नावे मी आता विसरलो. असादची अगदी गंभीर होता. आम्हा दोघांमध्ये पूर्वी काही घडले होते असा जराही भाव त्याच्या चेहऱ्यावर नव्हता. बाहेरच्या पाहुण्यासमोर जुने काही उकरून काढण्याची माझी पण इच्छा नव्हती.

'तुम्ही काल रात्री पिरोगोवकाला गेला होता, खरं ना? सारेजण चिक्कार दारू प्यालात. तसंच पंचायतीच्या ऑफिसात शिरून दंगामस्ती केलीत. तुम्हाला अडवायला आलेल्या लोकांना मारपीट केलीत हे सारं खरं आहे का?'

असादचीने सुरुवात केली, 'तुम्ही म्हणता तसंच काही सारं घडलं नाही. हे सारेजण काल पिरोगोवकाला गेले हे खरं आहे. मी गेले दोन-तीन दिवस तिथं होतो हे पण सांगतो; पण आम्ही दारू प्यायलो होतो हे खोटं आहे. त्यांच्या पानासला आणि आमच्या सोरोकाला जराशी चढली होती; परंतु बाकी सारेजण मात्र अगदी कोरडे ठणठणीत होते आणि खरं तर आम्ही काहीही सुरुवात केली नाही. आम्ही तिथं नुसत्या फेऱ्या मारीत होतो आणि एकाएकी खारचेन्को नावाचा एक मुलगा माझ्यासमोर उभा राहून ओरडला, 'हात वर करा!' आणि त्याने आपली बंदूक माझ्या छातीवर रोखली. तेव्हा मात्र मी त्याच्या तोंडावर एक ठोसा मारला. अशा तऱ्हेने त्या सगळयाला सुरुवात झाली. त्यामागचं खरं कारण असं आहे की, तिथल्या मुलींना आम्ही जास्त आवडतो आणि म्हणून ते आमच्यावर चिडले होते!

'काय? एवढंच कारण?'

'होय. तसं तर काहीच झालं नव्हतं. त्यांनी बंदुका काढल्या नसत्या तर काहीच झालं नसतं; पण पानास आणि खारचेन्को या दोघांनीही गोळया झाडल्या म्हणून आम्ही त्यांचा पाठलाग केला. त्यांना मारण्याची आमची इच्छा नव्हती व त्यांच्या बंदुका फक्त काढून घ्यावयाच्या होत्या; पण त्यांनी पंचायतीच्या ऑफिसात घुसून ते बंद करून घेतलं. प्रिखोदको कसा आहे हे तुम्ही ओळखताच!'

'बरं, ठीक आहे; पण त्या बंदुका कुठं आहेत? किती बंदुका तुम्ही आणल्यात?'

'दोन आणल्या आहेत!'

'त्या ताबडतोब इकडं घेऊन या!' बंदुका आणून दिल्यावर मी मुलांना त्यांच्या त्यांच्या खात्यात पाठवून दिले. सरपंचसाहेब लगेच त्या बंदुकांभोवती घोटाळू लागले. त्या घेऊन जाण्याची इच्छा त्यांनी प्रदर्शित केली.

मी अर्थातच त्यांना बजावलं की, 'तुमचा मुलगा किंवा तो खारचेन्को यांना बंदुका बाळगण्याचा अधिकार नाही. तुम्हाला त्या परतही मिळणार नाहीत.'

'ठीक आहे, ठीक आहे!' तो म्हणाला, 'कसं का होईना, तुम्ही ठेवून घ्या. चोराचिलटांपासून तुम्हाला उपद्रव झाला तर त्या उपयोगी येतील. मी तरी त्या घेऊन काय करणार आहे? पोरं ती पोरं. आपण याचा फारसा बभ्रा करायचा नाही!'

'मग तुमचं म्हणणं काय? मी वरच्या अधिकाऱ्यांना कळवू नको?'

'कशाला हो? शेवटी आपण शेजारी शेजारी आहोत! अशी प्रत्येक बारीकसारीक गोष्ट आपण कळवीत राहिलो तर जगणं अशक्य होईल.' असे बोलून तो हसत हसत निघून गेला.

या गोष्टीचे खरे तर शिक्षणतंत्राच्या तत्त्वाप्रमाणे मी मोठे भांडवल करायला पाहिजे होते. मी व मुले यांनी अशा प्रकाराने शेवट झाला त्यामुळे सुटकेचा नि:श्वास टाकला. मी कोणालाही शिक्षा केली नाही. फक्त पिरोगोवकाला माझ्या परवानगीशिवाय जाता येणार नाही, असे त्यांच्याकडून वचन घेतले व त्या गावच्या पोरांबरोबर आम्ही दोस्तीच करू, असे आश्वासन घेतले.

(क्रमशः)


# टॉलस्टॉय – एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# बलुतं

## एक वैश्विक आत्मशोध



आजचा काळ हा आत्मपरीक्षणाचा काळ आहे. प्रत्येक गोष्टीविषयी शंका घ्यायला जागा आहे. कित्येक गोष्टींचा संशय येतोय. गोंधळ आणि गुंतवळ या दोन शब्दांतच आशय बांधला जातोय. एकूण दिशाहीन दुष्टचक्र समोर दिसतंय. पहिलं स्वातंत्र्य मिळून तीस वर्ष लोटली आहेत. दुसरंही मिळालंय म्हणे ! तरी पण अवस्था तीच आणि व्यवस्थाही तीच आहे ! म्हणूनच पुन्हा एकदा नव्याने मागे वळून पाहण्याची आवश्यकता आणि अपरिहार्यता जाणवतेय. साहित्यातही त्याचे पडसाद उमटत आहेत. लेखक, कवी आज आपल्या मर्यादांमध्ये आपल्याच भूतकाळाकडे बघतोय. आपल्या मागील अनुभवांच्या काळाचं भान ठेवून नव्या संदर्भात शोध घेत आहे, त्याची प्रामाणिकपणे तपासणी करतोय. वर्ग, जाती-जमाती ह्यांची बंधनं खिळखिळी करून मोकळेपणाने प्रचलित समाजव्यवस्थेतील विसंगती वाचकांसमोर मांडतो आहे. 'जनांचा प्रवाहो चालिला' व 'रामनगरी' ही ह्याच काळाची अपत्यं आहेत; पण वरील दोन्ही पुस्तकांमध्ये काळाची अपरिहार्य गरज ओळखली असली तरी अनेक मर्यादा आहेत.

मात्र 'ग्रंथाली' या अभिनव प्रकाशनसंस्थेतर्फे प्रकाशित केल्या गेलेल्या श्री. दया पवार त्यांच्या 'बलुतं' ह्या पुस्तकानं वरील पुस्तकांमधील मर्यादा टाळून मराठी साहित्याला नवी दिशा देण्याचं पाऊल टाकलं आहे.

'बलुतं' हे आत्मचरित्र आहे गात्रगाड्याखाली रगडलेल्या अस्पृश्यांच्या दु खाचे. इच्छा-अनिच्छेचा, भविष्याचा जेथे प्रश्नच उद्भवत नाही अशा सामान्य, पीडितलोकांचं. 'बलुतं'मध्ये दया पवार, दगडू पवारच्या रूपानं आपला पुसता न येणारा भूतकाळ, त्याला रक्तबंबाळ होईस्तोवर खरवडून काढत आहेत आणि त्याच्या रक्ताळलेल्या जखमांमध्ये दिसतोय दगडूच्या आयुष्यातील चाळीस वर्षांचा भीषण, भेदक भूतकाळ ! ह्या भूतकाळाची निर्मिती केलीय विलक्षण गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेने की जिथे जातीच्या अजस्र भिंती आहेत, धर्माची अनेक बंधनं आहेत. खोलवर रुजलेल्या अंधश्रद्धा आणि रूढी आहेत. मेंदू पोखरून टाकणारे दारिद्र्य आहे आणि त्याहीपलीकडे दुःख, अन्याय, अत्याचार वर्षानुवर्षे सहन करीत जगणारी माणसं आहेत. त्यांच्यातील अनेक गुंतागुंतीचे संबंध आहेत, त्यातून निर्माण झालेल्या विकृती आहेत आणि या सर्व गोष्टींना अज्ञानामुळे मिळणारी मूकसंमती आहे.

दगडू पवार महाराच्या घरी जन्मलेलं पोरगं; त्याचं बालपण कधी खेड्यात तर कधी शहरात गेलं आहे आणि त्याची मानसिकता दुभगलेली आहे. शिक्षण घेण्याची त्याची सतत इच्छा आहे आणि वाचनाची आवड आहे. गावात, तालुक्यात मिळेल तसं शिक्षण घेतानाच पुस्तकी जगात तो वावरतोय आणि त्यामुळंच तो जास्तच संवेदनाशील बनत चाललाय. पर्यायानं अस्वस्थ ! स्वतःबद्दल, स्वतःच्या जातीबद्दल आणि समाजव्यवस्थेबद्दल अंतमुख झाला आहे.

आणि त्यामुळंच जातीचो इंगळी त्याला पदोपदी डसते आहे. मग तो मुंबईतल्या 'कावाखाना' या बकाल वस्तीत असू दे; नाही तर अकोला तालुक्यातील धामण गावामध्ये असू दे. देवळात प्रवेश करण्यास, विहिरीवर पाणी भरण्यास मनाई, सवर्णमराठ्याबरोबर अमुक खेळ खेळण्यास अथवा पंगतीला बसण्यास मनाई, एवढंच नाही तर न्हावी जमातीला महारांचे केस कापण्यास परवानगी नाही, तर बाजाराच्या ठिकाणी हॉटेलात वेगळ्या कपात मिळणारा चहा—अशी आसपास त्याला सगळीकडे जातीयतेच्या नावाखाली मिळणारी अपमानास्पद वागणूक, तर दुसरीकडे आपल्याच जातिबांधवांना करावी लागणारी घृणास्पद कामे ! चोवीस तास बांधले गेलेल्यांना यात्रा वाजवणे, नवरा वेशीवर ओवाळणे, मेलेली जनावरे ओढणे, कोणी मयत झाल्यास हाळी देणे, गावच्या अंमलदाराच्या घोड्यापुढे धावणे अशी कामे. आपल्याला 'बलुतं' मिळालंय म्हणजे जसा काही हक्कच मिळालाय, अशा आविर्भावात मोठ्या अभिमानाने ही कामं करणाऱ्या महाराबद्दल त्याला घृणा वाटत होती. त्यांचे मेलेल्या ढोरांचे मांस खाणे तर दगडूला फारच मानसिक त्रास देत होते.

एकीकडे जातीयतेच्या बंधनात अडकलेला महार, तर दुसरीकडे समाजव्यवस्थेने दिलेल्या घृणास्पद कामाशी इमान राखणारा महार आणि करणी करणे, लग्नातला डामडौल अशा अंधश्रद्धा व परंपरागत रूढींमुळे पिचलेला, कोसळलेला महार समाज दगडूचे भावविश्व विस्कटून टाकत होता. ह्या विस्कटलेल्या भावविश्वात ज्योत पेटविलो बाबासाहेबांच्या विचाराने आणि दादासाहेबांच्या भाषणाने आणि म्हणूनच सामान्य पीडितांच्या चळवळीसाठी तो काम करू लागला. गावापासून मुंबईपर्यंत जमेल तसे, जमेल त्या पद्धतीने जातीयतेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न त्याने सुरू केला; पण मुळातच दगडूचे व्यक्तिमत्त्व उत्कट पण गंभीर, संवेदनशील पण संयत आणि त्यामुळे

चळवळीतील विसंगती त्याला जाणवू लागल्या. मतांसाठी राजकारण सुरू झाले आणि सत्तेसाठी चळवळीचा वापर केला गेला. दगडू मुंबईला आला, लग्न केलं, नोकरी लागली आणि आहे त्या परिस्थितीत जगत गेला–जगतो आहे, रोज नव्या भयानक वास्तवाची भर घालत.

ह्या भयानक वास्तवात दगडूच्या आयुष्यात अनेक कोसळलेली, दुभंगलेली सोशिक माणसं आली. आज त्यातली कित्येक मातीआड लोटली गेली आहेत; पण दगडूच्या आयुष्यात त्या सर्वांना महत्त्व आहे. त्यात दगडूला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपणारी आई, व्यसनामुळे बरबाद झालेला पण दगडूवर अफाट प्रेम करणारा दादा आणि तात्या, मुलगा नसल्यामुळे मायेचा ओलावा देणारी विठाबाई, तर सवंग राजकारणाला बळी पडलेला कलावंत सदाशिव, सट्टाबेटिंग खेळणारा चंदर, नकला करणारा आंबू असे मित्र आहेत, तर दादासाहेबांसारखे सामाजिक कार्यकर्ते आहेत. सई–सलमासारख्या विरंगुळा देणाऱ्या स्त्रिया आहेत. एक ना हजारो माणसांनी दगडूवर खोल परिणाम केलाय आणि म्हणूनच तो म्हणतो, 'ह्यांना वेगळं काढून माझं व्यक्तिमत्त्व उभंच राहात नाही. पाण्यावर तेलाचा तवंग असावा ना, तसे हे माझ्या जीवनावर पसरलेले...हे माझ्या पुस्तकी जगापेक्षा बाहेरच्या जगातील मार्गदर्शक होते. ह्यांच्या जगावेगळ्या विद्यापीठातच मी बरंच काही शिकलो.'

खरोखरच दगडू पवारला ह्या माणसांनी बरंच काही शिकवलं आणि दगडू पवारही ह्या माणसांपासून बरंच काही शिकला. ह्या माणसांच्या गुंतागुंतीच्या संबंधांतून अनेक ताण-तणाव निर्माण झाले. त्यातून माणसाच्या अनेक प्रवृत्तींचे प्रदर्शन घडले. जनावरासारखं जगणाऱ्या या माणसांमध्ये मायेचा ओलावा होता, आत्मीयता होती, प्रेम होतं, त्याबरोबरच लोभ, लाचारी, वासना, मुकाटपणे अपमान गिळण्याची सोशिकता (विशेषतः स्त्रियांमध्ये) आणि या सर्व सरमिसळीतून तयार झालेल्या शारीरिक-मानसिक विकृती! कित्येक माणसांबद्दल त्याला अजूनही गूढच राहिलं. तरी पण त्याला हे माहीत होतं की, या गुण-दोषांना खतपाणी प्रचलित समाजव्यवस्थाच घालत होती.

आणि हे सर्व भयाण, भीषण वास्तव, आश्चर्य वाटायला लावणारं, गुदमरून टाकणारं, थरकाप उडविणारं वास्तव दगडूला मन हलकं करण्यासाठी सांगायचं होतं. इतके दिवस बाळगलेलं हे 'बलुतं' तात्पुरतं का होईना, पण पाठीवरून उतरवायचं होतं आणि म्हणूनच सांगताना त्याला भीती वाटत होती, तरी पण त्यानं सांगितलं 'स्वतःलाच, कुणाला सांगू नये म्हणून!

दगडू पवारच्या 'मी 'पासून सुरू होणारा हा शोध, हे आत्मनिवेदन, हा भूतकाळ सर्वसामान्य जनतेच्या 'आम्ही 'पर्यंत विस्तारत जातो. तेव्हा हे समाजचित्र कोणाही सुजाण वाचकास अपराधी वाटावयास लावणारं ठरतं.

**–सतीश जकातदार**

**बलुतं**
लेखक : दया पवार
ग्रंथाली (अभिनव वाचक चळवळ)
पृष्ठे : १९४
किंमत : अठरा रुपये

---

## जमीनसुधारणा

पृष्ठ ७ वरून

हवी होती; पण आज जवळजवळ वीस वर्षांनंतर त्यापैकी फक्त ११ लाख म्हणजे निम्म्यापेक्षाही कमी कुळे जमिनीची मालक बनली आहेत. महाराष्ट्रात कूळ कायदा ऑगस्ट १९५६ मध्ये अंमलात आला; पण त्यापूर्वी एक वर्ष आधी विधानसभेत त्यावर चर्चा सुरू झालेली होती. त्यामुळे जमीनमालकांना कायदा होणार याची कल्पना आल्याने त्यांनी कायद्यात दिलेल्या मुदतीपूर्वीच कुळांना जमिनीवरून हुसकावून लावले होते. जमिनीचे मालक बनण्यासाठी तिच्या खरेदीची अधिकाऱ्यांनी ठरविलेली किंमत कुळांना १२ ते १५ वार्षिक हप्त्यात द्यावी लागणार होती. यातला एक हप्ता चुकला तरी जमिनीची मालकी पुनः मालकाकडे जाईल, अशी कायद्यात तरतूद होती. अनेक कुळांना हप्ते नियमित भरणे शक्य झाले नाही. त्यांच्या जमिनी पुन्हा जमीनमालकांकडे गेल्या. पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील कायद्यानुसार कूळ जेवढी जमीन कसते त्या सर्व जमिनीची मालकी कायद्याने त्यांच्याकडे यावयाची होती; पण मराठवाड्यात जुन्या हैदराबाद राज्याचा कायदा होता. त्यानुसार कूळ कसत असलेल्या जमिनीपैकी फक्त एकतृतियांश जमिनीची मालकी त्याला मिळावयाची होती. मराठवाड्याच्या कायद्यात बदल करायला हवा होता; पण तो करण्यात आला नाही.

पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार महाराष्ट्रात अधिकारावर येऊन सहा महिने होऊन गेले. जमीनसुधारणांच्या अंमलबजावणीचे दृष्टीने ते भरीव काही करणार आहे का, असा भूमिहीनांचा प्रश्न आहे. □

# 'युवदर्शन' एकांकिकांची अंतिम फेरी

## दर्जा तोच, उत्साह अमाप !

महाविद्यालयामधील नवोदित कलाकारांना वाव देण्यासाठी उन्मेष, आय्. एन्. टी. या संस्था आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा गेली काही वर्षे घेत आहेत. गेल्या वर्षीपासून दूरदर्शनच्या युवदर्शन विभागातर्फेही एक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा घेण्यात येते.

या वर्षी या एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी वेगळ्या प्रकारे घेण्यात आली. परीक्षकांचे गट तयार करून त्यांना वेगवेगळ्या विभागातील महाविद्यालयांमधे पाठविण्यात आले. प्रत्येक महाविद्यालयाने आपली एकांकिका रंगभूषा, वेषभूषा, प्रकाशयोजना इ. गोष्टींचा वापर न करता सादर केली. प्राथमिक स्पर्धेत सादर केल्या गेलेल्या एकूण ३८ एकांकिकांमधून ८ एकांकिका अंतिम फेरीत सादर केल्या गेल्या. २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी अंतिम फेरी रवींद्र नाट्यमंदिर येथे घेण्यात आली.

दूरदर्शन केंद्राचे संचालक श्री. अमृतराव शिंदे यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून स्पर्धेला सुरवात झाली. सर्वांत प्रथम महर्षी दयानंद कॉलेजने 'स्ट्रेंजर' ही एकांकिका सादर केली. गेल्या वर्षीची पारितोषिकविजेती एकांकिका 'मन पिंजऱ्याचे'चे दिग्दर्शक उदय म्हैसकर यांनी लिहिलेल्या या एकांकिकेचे दिग्दर्शन केले होते प्रमोद पवार यांनी. एका बेटावरील लोकांचा अभ्यास करण्यासाठी एक गोरा त्या बेटावर येतो आणि एका रानटी टोळीत सापडतो. एक म्हातारा 'अंकल' त्याची सुटका करतो. पूर्णपणे निरक्षर असलेल्या या म्हाताऱ्याला त्याच्या वडिलांनी खूप पुस्तकं वाचून दाखवलेली असतात. म्हातारा ती पुस्तकं 'स्ट्रेंजर' कडून वाचून घेऊन ते सुख पुन्हा लुटू लागतो. 'स्ट्रेंजर'चं परत जाणं सतत पुढं ढकलून म्हातारा परत परत तो आनंद मिळवू लागतो. शेवटी त्याला कंटाळून आत्तापर्यंतचे तीन जण ज्या पद्धतीने गेले त्याच पद्धतीने चौथाही स्ट्रेंजर जातो. स्वतःचा क्रूस तो स्वतःच्या खांद्यावर वाहून नेतो. प्रमोद पवार याने ही एकांकिका अतिशय चांगल्या पद्धतीने सादर केली. म्हाताऱ्याची झोपडी आणि यापूर्वीचे तिघेजण गेले तो मार्ग दाखवणारे तीन क्रॉस अतिशय प्रभावीपणे उभे केले होते. त्याने स्वतःच म्हाताऱ्या 'अंकल'ची भूमिका केली. म्हाताऱ्यांची भूमिका सादर करण्यात प्रमोदचा हातखंडा असल्याने त्याबद्दल जास्त न लिहिणेच उत्तम. विजय जोशीने 'स्ट्रेंजर' उत्तम उभा केला. डिकन्सची पुस्तकं प्रथम पाहिल्यावर झालेला आनंद, परत परत तीच पुस्तकं वाचून आलेला कंटाळा, आपल्याला परत कधी जायला मिळणार, या प्रश्नातून निर्माण झालेलं औत्सुक्य इ. वेगवेगळे मूडस् त्याने उत्तम प्रकारे दाखवले.

गेल्या काही वर्षांत महाविद्यालयीन रंगमंचावर प्रदीप राणे हे नाव सातत्याने ऐकू येते. त्याची 'बुधवार वजा सॉलोमन' ही एकांकिका लाला लजपतराय कॉलेजने सादर केली. पॅरॅलिसिस झाल्याने क्लार्कचा लिफ्टमन झालेल्या तरुणाची ही गोष्ट. ऑफिसमधील आपल्या जुन्या प्रेयसीला लिफ्टमधून खाली आणताना लिफ्ट मधेच बंद पडते. लिफ्ट बंद पडून परत चालू होईपर्यंत त्या दोघांच्याही मनात जे काही चालते ते म्हणजे ही एकांकिका. दोन्ही पात्रं सतत भूत आणि वर्तमान या दोन काळांत वावरतात. आपलं प्रेम, तेव्हाच्या घटना, तेव्हा मारलेल्या गप्पा इ. संदर्भ आठवतानाच कुठे तरी परत वास्तवतेच भान येते. वर्तमानकाळ व भूतकाळ यामध्ये सतत हेलकावणारी ही एकांकिका म्हणजे दिग्दर्शकाला एक आव्हान होतं; परंतु यात दिग्दर्शक कुठेच विशेषत्वाने दिसला नाही. वेळ घालवण्यासाठी लिफ्टमननं 'पेपरमिंट न चावता विरघळायला पाच मिनिटं लागतात' यासारखी प्रत्येक गोष्टीला लागणारा वेळ मोजण्याची किंवा आपल्या या प्रेयसीच्या जुन्या संभाषणातील गाडयांच्या वेळांचे संदर्भ सतत आठवण्याची कल्पना फारच सुरेख; परंतु ही सुरेख कल्पना जशी ठसायला पाहिजे तशी दिग्दर्शक ठसवू शकला नाही. कलाकारांनी मात्र ही एकांकिका उत्कृष्टरीत्या पेलली. विशेष उल्लेख केला पाहिजे तो मुनीरा वीराणीचा. कोणतेही वेगळे बेअरिंग न स्वीकारता केवळ डायलॉग्ज डिलिव्हरीने तिने काळातील फरक स्पष्ट केला.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयानं सादर केलेल्या 'सिंह आला पण—' या फार्सविषयी जास्त न लिहिलेलंच बरं. एक चांगला विषय लेखक, दिग्दर्शक, नट या सर्वांनी मिळून वाया घालवला. लग्नाला लागणाऱ्या पैशापैशासाठी मित्राच्या सहाय्याने प्रेयसीला पळवून नेण्याचे नाटक करून तिच्या वडिलांकडे खंडणी मागितली जाते; परंतु वडिलांना नाटक कळून सर्वच बेत फसतो. फार्सला आवश्यक असणारी गती मूळ लिखाणातच जाणवली नाही. लेखक—दिग्दर्शक दोन्हीही भूमिका उदय लिबूकर यांनी बजावल्याने त्यांना दिग्दर्शक म्हणून गती येण्यासाठी आवश्यक ते लेखकाकडून बदल करून घेता आले नाहीत आणि मूळ लेखनात नसलेली गती प्रत्यक्ष सादर करतानाही आणता आली नाही. या एकांकिकेची निवड अंतिम फेरीत का झाली, या प्रश्नाचे उत्तर देताना एक परीक्षक म्हणाले, 'दिग्दर्शकाने स्क्रिप्टवर वर्क केल्याचे जाणवत होते; प्रत्येक मूडवर व्यवस्थित विचार केल्याचे दिसत होते; परंतु अंतिम फेरीत निवड झाल्यावर मिळालेल्या वीस दिवसांचा उपयोग केला नाही.' मला स्वतःला हे उत्तर पटले नाही. स्क्रिप्टवर थोडे जरी वर्क केले असते तर हा फार्स इतका शाळकरी वाटला नसता. महाविद्यालयीन रंगमंचावर उणीव भासते ती फार्स व कॉमेडीची. ही उणीव ही एकांकिका भरून काढील असे तिच्या नावावरून व एकांकिकेच्या आरंभावरून वाटले होते; परंतु निराशा झाली. अर्थात हाच आरंभ मानून महाविद्यालयीन रंगमंचावर फार्स व कॉमेडी मोठ्या संख्येने येण्यास हरकत नाही.

यानंतर रूपारेल महाविद्यालयाने उत्पल दत्त यांच्या दोन अंकी नाटकावर आधारित 'शतकावली' ही एकांकिका सादर केली. मूळ नाटक वाचलेले नसल्याने रूपांतर कसे झाले आहे हे मी सांगू शकत नाही; परंतु एक स्वतंत्र संहिता म्हणून विचार केल्यास ही एकांकिका खूपच सरस झाली आहे. समाजात वाढलेली अनैतिकता, हिंसाचार, नष्ट झालेली माणुसकी, याचं प्रत्ययकारी चित्रण 'शतकावली'मध्ये आढळते. समाजात जे जे वाईट घडते त्याला जबाबदार असल्याचा आरोप शतकावर केला जातो. त्या शतकाची स्मृती नष्ट झाली असावी असे सर्व आरोप साभिनय सादर केले जातात आणि त्यातूनच दर्शन घडत आजच्या समाजातील व्यभिचाराचे, अनैतिकतेचे आणि इतर अनेक वास्तव गोष्टींचे. या सर्वांतून मार्ग दाखवू शकेल एक लहान मूल, असा एक आशावाद शेवटी प्रकटतो. दिग्दर्शक भालचंद्र झा याने ही एकांकिका उत्कृष्टरीत्या सादरही केली. यात विशेष उल्लेख करायला हवा तो अनुराधा तोवरचा. सामान्य स्त्री, धंदेवाईक वेश्या, अगतिक झालेली भिकारीण, मातृत्व धारण करणारी आई इ. विविध भूमिका तिने केल्या. पटापट बेअरिंग बदलून ती नवीन भूमिकेत शिरत होती व प्रत्येक नवी भूमिका तितक्याच तन्मयतेने साकार करीत होती. संजय मोने (शतक) व अजित भुरे (प्रमोद) हे दोन कलाकार हीही या एकांकिकेची जमेची बाजू.

पहिल्या दिवशीची शेवटची एकांकिका सादर केली रुईया महाविद्यालयाने. चंद्रकांत देशपांडे लिखित 'नातं'चे दिग्दर्शन केले होते प्रकाश बुद्धिसागरने. स्वतःच्या पत्नीवर बलात्कार व तोही स्वतःच्या डोळ्यांदेखत झाल्यावर पती-पत्नीमध्ये जो एक संघर्ष निर्माण होतो त्यावर आधारलेली ही एकांकिका. यापुढे सतत आयुष्यभर हा अपमान आपल्याला डाचत रहाणार, या जाणीवेने पुरुष कुठल्या मर्यादेपर्यंत विचार करू शकतो आणि हे सर्व होऊनही स्त्री किती हतबल ठरते याचे सुरेख चित्रण 'नातं'मध्ये केले आहे. पती–पत्नी या दोनच व्यक्तिरेखा या एकांकिकेतील संघर्ष पूर्ण ताणून धरतात. त्यांच्यातील तुटणारे नाते ते दोघेच परत सावरून धरतात; परंतु यामध्ये मुलीच्या (पत्नीच्या) बापाची व्यक्तिरेखा उगाचच आणल्यासारखी वाटते. कदाचित पतीला खूप काही अपमानास्पद बोलणारी स्त्री बापासमोर मात्र त्या घटनेसंबंधी काहीच बोलत नाही, असे लेखकाला दाखवायचे असेल; परंतु त्यामुळे विशेष काही साध्य झाले असे वाटत नाही. प्रकाश बुद्धिसागरने ही एकांकिका बसवलीही सुरेख. विशेषतः त्याने करून घेतलेला विरामांचा (pauses) उपयोग. दोन वाक्यांमध्ये असलेले दीर्घ विराम विद्यार्थ्यांनी शांततेने ऐकून सहन केले यातच या दिग्दर्शकाचे आणि कलाकारांचे यश आहे. विजया शिरसाट आणि पद्माकर ओझे यांनी पती–पत्नी सुरेख उभे केले. त्यांच्या नात्यात निर्माण होणारे तणावाचे सुस्पष्ट चित्र दोघांनीही उभे केले. एकच दोष जाणवला आणि तो म्हणजे आवाजाचा. विजया शिरसाट काही वेळा किंचाळल्यासारखी बोलत होती तर पद्माकरचा आवाज फारच कोवळा वाटला; परंतु आपल्या अभिनयाने हा 'मायनस पॉइंट' त्याने भरून काढला !

दुसऱ्या दिवशी स्पर्धांना सुरुवात झाली ती सिद्धार्थ कॉलेजच्या 'न्याय'ने. अनिल बांदिवडेकर लिखित एकांकिकेचे दिग्दर्शन केले होते सतीश पुळेकरने. गावामध्ये अस्पृश्यांवर होणारे अत्याचार हा या एकांकिकेचा विषय. ही एकांकिका पाहिल्यावर आठवण झाली ती यंदाच्या राज्य नाट्य स्पर्धेतील पारितोषिकविजेत्या लोककथा ७८ या नाटकाची. या एकांकिकेबाबत बोलायचेच झाले तर लेखक, दिग्दर्शक, कलाकार सर्वांनी आपापली कामगिरी चोख बजावली एवढेच.

शेवटच्या दोन एकांकिका पुणे विभागातून निवडल्या गेल्या होत्या. पुणे विद्यापीठ जिमखान्याची 'अथपासून इतिपर्यंत' (दिग्द. उदय आगाशे) आणि बी. एम. सी. सी. ची 'ओंडका' (दिग्द. मिलिंद डोंगरे). दोन्ही एकांकिकेचा लेखक आहे प्रभाकर वाडेकर. दोन्ही एकांकिका पाहिल्यावर दुर्बोधता हा त्याच्या लेखनाचा विशेष असल्याचे जाणवले. खरे तर 'अथपासून'बद्दल काहीही बोलणे धोकादायक आहे. त्यातील तीन कलाकार रेल्वे स्टेशनवर जमून जी काही चर्चा करतात त्यातले फारच थोडे शब्द प्रेक्षकांपर्यंत पोचले. दुसरी एकांकिका 'ओंडका.' रस्त्यात एक ओंडका पडलेला असतो.सर्वजण ठेचकाळतात; परंतु एका आंधळ्याला मात्र रस्त्यात ओंडका पडला असल्याचे जाणवते. त्यानंतर ओंडक्याविषयी चर्चा सुरू होते. कुणाला त्यात स्त्रीचा भास होतो, तर कुणाला मुलाचा. नंतर अजून एक शोध लागतो–आपण जे करू ते ओंडका करून घेतो. नंतर त्याच्या उपयोगाचा शोध घेतला जातो. शेवटी एकाला त्याचा उपयोग समजतो; पण त्या वेळी ओंडका प्रत्यक्षात अस्तित्वातच नसल्याचे लक्षात येते. एखाद्या अस्तित्वातच नसलेल्या गोष्टीविषयी लोक बोलतात, चर्चा करतात, तिचा उपयोग शोधायचा प्रयत्न करतात. एकांकिका पाहिल्यावर 'जो कधीच येणार नसतो. तरीही ज्याची वाट पाहिली जाते' त्या 'वेटिंग फॉर गोदो'ची आठवण होते. इथे ओंडका हे परमेश्वराचे प्रतीक असल्याचे जाणवते. प्रत्यक्षात लेखकाला यातून काय सांगायचेय आणि 'वेटिंग फॉर गोदो'शी या एकांकिकेचा संबंध काय ? हे लेखकच सांगू शकेल.

मिलिंद डोंगरेने कलाकारांकडून चांगल्याप्रकारे वर्क करून घेतले आहे–विशेषतः ओंडक्याचे मायमिंग. याचे श्रेय दिग्दर्शक, कलाकार दोघांनाही जाते.

प्रकाशयोजना, ध्वनी या दोन तांत्रिक गोष्टींबद्दल विशेष लिहिण्यासारखे काही नाही. प्रत्येकाने याबाबतीतली आपली कामगिरी व्यवस्थित बजावली. क्वचित एखाद्या ठिकाणी विचित्र रंगसंगतीचा वापर तर दिव्यांची उगाचच झालेली उघडझाप (हा कदाचित तांत्रिक दोषही असेल) एवढा भाग वगळला तर बाकी सर्व व्यवस्थित.

स्पर्धा संपल्यानंतर लगेचच बक्षीससमारंभ. प्रा. सरोजिनी वैद्य यांच्या भाषणाने निराशाच केली. एकंदर स्पर्धेविषयी न बोलता पहिल्या तीन एकांकिका आणि पारितोषिकविजेत्यांचा अभिनय यावरच त्या बोलल्या. शेवटच्या दोन एकांकिकांवर 'या लेखकाचा जीवनाविषयीचा एक दृष्टिकोन तो अतिशय वेगळ्या प्रकारे, तात्त्विक चर्चेतून आपल्यापुढे मांडतो, जीवनाविषयी काही तरी वेगळेच तो सुचवू पहातोय, यापेक्षा दीर्घ कॉमेंट केली असती तर पुढील वर्षी अशा एकांकिका पाहायला एक वेगळा दृष्टिकोन विद्यार्थ्यांना मिळाला असता आणि बोअर होऊन उठून न जाता त्यांनी अशा एकांकिका समजावून घेऊन पाहिल्या असत्या.

अध्यक्षीय भाषणात प्रा. भालवा केळकरांनी दोनच सूचना केल्या आणि भाषण आटोपते घेतले. त्यातली एक म्हणजे यश डोक्यात जाऊ न देण्याची आणि दुसरी म्हणजे दूरदर्शन हे माध्यम समजावून घेण्याची. आणि हो तिसरी महत्त्वाची सूचना ते स्वतः करीत असलेल्या प्रयोगाबद्दल. अतिशय सामान्य संहिता निवडून दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ यांनी ती किमान बघायला बरी वाटेल इतपत सादर करण्याचे आव्हान स्वीकारायचे. हाच प्रयोग करून पहाण्याचे आवाहन त्यांनी केले.

तर अशा रीतीने या स्पर्धा पार पडल्या. दर्जाचा विचार केला तर तो मागील वर्षीएवढाच आहे, त्यात फारसा फरक पडलेला नाही; परंतु जास्तीत जास्त विद्यार्थी या उपक्रमात उत्साहाने सामील होत आहेत, एवढं मात्र खरे.

—मिलिंद कोकजे

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# मालकीण मालकीण दार उघड

**दगडापेक्षा खूपच मऊ असलेली वीट !**


शहरातली जागाटंचाईची करुणगंभीर समस्या ही विनोदी लेखकांना नेहमीच फार्सास्पद थीम वाटत आलेली आहे. जागा मिळविण्यासाठी एखादी थाप मारणं, मग ती टिकविण्यासाठी एकाहून एक वरचढ थापा मारीत रहाणं आणि शेवटी कुठं तरी त्या उघडकीला येऊन थापाड्या व्यक्तीची सुखद फटफजिती हा फार्म्युला तर आता इतका वापरला गेला आहे की, त्याच वळणा-वाकणांनी जाणारं एखादं नाटक आपल्याला अजूनही पाहवेल, हे एरवी सांगूनही खरं वाटलं नसतं. त्यातून सध्याच्या फार्साविरुद्ध मनात निर्माण झालेली नैसर्गिक संरक्षण-यंत्रणा ! पण प्रा. अनिल सोनार यांच्या 'मालकीण मालकीण दार उघड' या (त्यांच्या पहिल्याच) फार्सनं ही किमया करून दाखवली खरी.

अनिल सोनार यांचा नायक गोविंद धांदरफळे ह्या जागेसाठी मारावी लागणारी ठराविक थापच मारण्यात यत्किंचित कसूर करीत नाही. अशा नाटकातली अशी थाप ही विवाहविषयकच असली पाहिजे हे जाणून तो आपण अविवाहित असतानाही लग्न झाल्याची थाप आपल्या चाळीच्या खाष्ट मालकिणीला आणि रड्या मालकाला मारतो. (या विजोड मालकजोडप्याचा लग्नाळू मुलगा मनीष हा कवी असल्याचं दाखवलं आहे हे लक्षात घेतलं की, लेखकाची मराठी फार्समधल्या विनोदनिर्मितीच्या तंत्र-मंत्रांवर किती हुकमी पकड आहे, याचं दर्शन घडतं.) साहजिक ही थाप नसल्याचं सिद्ध करून दाखवण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडते आणि मग लग्नातील सप्तपदी-इतकेच स्थान फार्समध्ये भाड्याच्या बायकोला आहे, हे अचूक जाणून हा पठ्ठ्या एका दुय्यम सिनेनटीलाच 'करारी' बायको म्हणून घेऊन येतो. मग तिचे नखरे वगैरे. आता एवढी सिच्युएशन जमून आल्यानंतर नायकाच्या एखाद्या भानगडीने तिथे पदन्यास करू नये (किंवा टपकू नये !) म्हणजे काय ? ह्याही उपक्रम अभिनंदनीय यशासह पार पडतो. मग एकीकडे नायक-नायिका (प्रमाण एकास दोन), दुसरीकडे मालक-कुटुंब आणि तिसरीकडे शेजारी, नायकाचा बॉस, डॉक्टर अशी चिल्लरखुर्दा पात्रं यांची बऱ्यापैकी घालमेल सुरू होते. ती कमी पडेल म्हणून दहा हजार रुपयांच्या पळवापळवीचे एक लचांड उपटते. भाड्याची बायको म्हणून आलेली सिनेनटी कायमच्या भाडेकरूच्या शोधात असल्याने आसपासच्या पुरुषांना झुलवते, फिरवते वगैरे. दरम्यान नायक गोविंद व त्याची पहिली भानगड नलू यांच्यात मतभेद–गैरसमज–दुरावा. त्यातच नलू आणि कवी मनीष यांची जुनी बाल-पणची दोस्ती निघते आणि प्रेमाचा एक त्रिकोणच काय अख्खा युक्लिडच रंगभूमीवर साकार होण्याची वेळ येते. असो. अशा प्रकारच्या कुठल्याही घोटाळाप्रधान फार्सचा व्हायचा तोच शेवट 'मालकिणी'चाही होतो.

तर असा हा कथाकल्पनेच्या व कथानक-विकासाच्या दृष्टिकोनातून अगदी चाकोरी-बद्ध असलेला फार्स सुसह्य आणि मधूनमधून मनोरंजकही होतो, तो मुख्यत: दोन कारणां-मुळे. एक : आत्माराम भेंडे व रमेश भाटकर यांचा सहज अभिनय. आत्माराम भेंडे यांच्या फार्समधल्या दर्दीपणाविषयी काही नव्यानं लिहायला नको. तथापि त्यांची या फार्स-मधली भूमिका त्यांच्या अलीकडच्या काही फार्समधल्या भूमिकांपेक्षा मला अधिक सरस, संयमित व परिणामकारी वाटली. याच फार्सचं त्यांचं दिग्दर्शनही त्यांच्या अली-कडच्या तद्विषयक कामगिरीपेक्षा मला अधिक सहजसाध्य व सुघटित वाटलं, हे नमूद केलंच पाहिजे. रमेश भाटकर यांना मी रंगभूमीवर प्रथमच पाहिलं आणि त्यांची कामगिरीही यशस्वी या सदरात जमा केली पाहिजे. फार्सच्या रसानुकूल अभिव्यक्ती सादर करूनही (आणि भरकटण्यास वाव असूनही) ते कुठं वाहवत गेले नाहीत अथवा फिल्मी स्टाइल्स वा तत्सम कृत्रिम ढंग आणण्याचा प्रयत्नही केला नाही, हे अभि-नंदनीय आहे. त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा त्यांनी याद्वारे खूपच उंचावलेल्या आहेत.

नाटकाला उठाव आणि रंगत आणणारी दुसरी गोष्ट म्हणजे त्यातला विडंबनात्मक विनोदाचा प्रवाह. या स्वरूपाचा विनोद आपल्याकडे नाटकात फारच विरळ; पण इतरत्रही अभावानेच भेटतो. अलीकडच्या काही वर्षांत रंगभूमीवर आलेल्या (नट-सम्राट, रायगड, गोष्ट जन्मांतरीची, महापूर, राजसंन्यास यांसारख्या व अन्य) काही नाटकांची झकास टिंगल या नाटकात उडव-लेली आहे या कल्पनेचा नेमका जनक कोण, याची कल्पना नाही; परंतु जे स्टेजवर पाहिलं–ऐकलं त्यावरून लेखक व दिग्दर्शक या दोघांनाही याचं श्रेय दिलं पाहिजे असं मला वाटतं. फार्समधल्या विनोदाला शाब्दिक व शारीरिक आचरटपणाची जी मर्यादा अलीकडे पडत चालली आहे, तीमुळे झालेली कोंडी फोडायला असे प्रयत्न निश्चित उपयुक्त ठरतील.

या फार्सच्या अन्य वैशिष्ट्यांत नेपथ्य आणि किशोर प्रधान यांची बॉसची छोटी भूमिका यांचाही उल्लेख केला पाहिजे. जयदेव हट्टंगडी (भूमिका : मनीष) आणि नीलम (सिनेनटी) यांनीही आपला वाटा उचलण्याचा प्रयत्न केला. मनोरमा वागळे यांची आखाडमालकिणीची भूमिका हा मात्र निव्वळ अत्याचार होता. या बाईंची याच छापाची आणखी किती अतिरेकी आणि आक्रस्ताळी कामं आम्हाला पाहायला मिळणार आहेत ? जुन्या लेखकांचं सोडा; पण नव्यानं फार्स लिहिणाऱ्या लेखकांनी तरी असल्या पात्रांद्वारे विनोदाचा जुलूम करण्याची परंपरा का मोडू नये ?



चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# सफेद हाथी

**बालमित्रांनो, या ऐरावताला एकदा तरी भेटाच !**

एक छोटासा मुलगा आणि त्याची प्रेमळ, सालस ताई. दोघांचे आई-वडील वारलेले; त्यामुळे दोघेजण मामा-मामींकडे राहतात. मामा-मामी खूप दुष्ट आणि दोघांचा मनसोक्त छळ करणारे. त्या मुलाची मैत्रीण एक बोलणारी मैना, मित्र एक पांढरा हत्ती—ऐरावत. ऐरावत जंगलचा राजा असतो. हिरवे गर्द रानात एके ठिकाणी पुरलेला मोहरांचा हंडा—त्याची राखण करणारे विषारी नाग—

हे सगळे कसे एखाद्या अँडरसनच्या परीकथेतील वाटते ना ? किंवा एखाद्या बालचित्रपटाचा हिस्सा ? अगदी बरोबर! नुकताच तपन सिन्हा यांचा 'सफेद हाथी' हा चित्रपट पुण्यात प्रदर्शित झाला. खास मुलांसाठी बनविलेला हा चित्रपट. त्यातच या सगळ्या गोष्टी आहेत.

आजपर्यंत पौराणिक चित्रपटांचा एक मोठा गठ्ठा बाजूला टाकल्यास खास मुलांसाठी बनविलेले असे चित्रपट मोजायचे म्हटले तर परमेश्वराने आपल्या हातांना खूपच जास्त बोटे दिली असल्याचे लक्षात येते. मुलांवर (उदा.—किताब) काढलेले चित्रपट हे बहुधा बालमानसशास्त्र आणि मनोविश्लेषण अशा त्यांच्या संदर्भात येणाऱ्या जाडया जाडया शब्दांमुळे मोठ्यांच्याच राखीव कुरणात जाऊन पडतात. इतर चित्रपटांमधूनही लहान मुलांभोवती गुंफलेले प्रसंग एक तर अतिशय उथळ असतात किंवा त्या लहान खांद्यावरील म्हाताऱ्या डोक्याचे दर्शन घडविणारे असतात. मुलांत मूल होऊन त्यांना वास्तवापल्याडच्या अद्भुतात, स्वप्नील कल्पनेत स्वैर विहार करायला लावणाऱ्या चित्रपटांची नावे डोळ्यांसमोर आणायची म्हटल्यास अलीकडचा फक्त रवी नगाईचचा 'रानी और लालपरी' डोळ्यांपुढे येतो. सई परांजप्यांचा 'जादू का शंख'ला टिंबकटू नगरीत अमुक तमुक पारितोषिक मिळाल्याच्या बातम्या आम्हाला फक्त वर्तमानपत्रात वाचायला मिळतात; पण हे चित्रपट मात्र समुद्रापलीकडून परतायला नाराज असावेत.

आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त जणू चित्रसृष्टीकडूनच मिळालेल्या भेटीप्रमाणे दिग्दर्शक तपन सिन्हांचा 'सफेद हाथी' मात्र प्रदर्शित झाला. तोही करमुक्त सवलतीच्या दरात. (थोर तुझे उपकार, माय-बाप सरकार !)

करडे डोंगर, हिरवी राने, त्यांच्यामधून खळाळते झरे, सूर्योदय—सूर्यास्ताचे उधळते रंग या साऱ्यांच्याच मागे धावणारा एक दिग्दर्शक. तो एकदा शीवू नावाच्या गुराखी पोराला भेटतो. त्याची कहाणी ऐकतो आणि नंतर शीवूच्या केंद्राभोवती त्याच्या मनात उठलेले कथातरंगच आपल्यासमोर चित्रपटाच्या रूपात उमटत जातात.

'सफेद हाथी'ची कथा म्हटले तर साहसकथाही आहे कथा स्वतः तपन सिन्हांचीच आहे आणि कथेमधील राजाच्या संदर्भात येणारे काही तुकडे सोडले (उदाहरणार्थ — राजाच्या मागे लागलेल्या कायदेशीर कटकटी, त्यामुळे त्याला आलेला राजवाड्याचा, आपल्या जहागिरीचा वीट); तर संपूर्ण कथा ही खास मुलांसाठीच तयार करण्यात आली आहे. त्यात त्यांच्यासारखाच एक छोटा मुलगा — शीवू आणि त्याची ताई —रानी आहे. त्या दोघांचा छळ झाला की मुले हळहळतात. शीवूला त्याचे रानसवंगडी भेटले की मुलांनाही बरे वाटते. ऐरावत आणि मैनेने शीवूला वाघाच्या, चित्त्याच्या तावडीतून सोडवले की मुलांचा जीव भांड्यात पडतो. ऐरावताला पकडल्यानंतर ती पुन्हा चिंतेत पडतात आणि ऐरावताच्या फौजेने त्याची सुटका केल्यानंतर तर पोरं अक्षरशः नाचायचे बाकी ठेवतात. दुष्ट मामा-मामींची कारस्थाने पाहून ती चिडतात, त्यांना शिक्षा झाली की 'भली खोड मोडली' म्हणून खूष होतात. ही पोरांची नाडी बरोबर ओळखूनच अगदी मुखात शेवटासकट या सगळ्या गोष्टी तपन सिन्हांनी कथेत दिल्या आहेतच. शिवाय कथेतच एका दिग्दर्शकाचे हे सगळे कल्पनाचित्र असल्याचे मांडून सर्व गोष्टींमध्ये स्थल-काल-व्यक्तिनिरपेक्ष मुबलक स्वातंत्र्यही घेऊन ठेवले आहे. त्यामुळे शीवूची मैत्रीण बोलकी मैना त्याला 'Good morning' म्हणून उठवते, वाघ मागे लागल्यास 'झाडावर चढ!' असे सल्ले देते आणि ऐरावताची सुटका करण्यासाठी सगळ्या पशूंना साद घालून सैन्यही गोळा करते. रानातील सर्व प्राणीही ऐरावताच्या आज्ञेत असतात. जंगलचा राजा ऐरावत हरवलेली साडी आणून देण्यापासून ते शीवूचा प्राण वाचवण्यापर्यंत सर्व मदत आपल्या छोट्या दोस्ताला — शीवूला करतो.

कथेतच मुलांना हवे ते बरेच मिळाल्याने दिग्दर्शक तपन सिन्हांची कामगिरी खूपच सोपी झाली. फक्त क्रमवार कथा उलगडणे एवढीच गोष्ट उरली; पण त्यातही एक स्वप्नदृश्य टाकून एक डिस्ने—लँडसारखे सिन्हा—वन उभे केले आहे. त्या वनातील प्राणीही भलतेच मजेदार—हरीण, बेडूक, सिंह, हत्ती, अस्वल हे सगळे गळ्यात गळे घालून गाणे म्हणतात, रडतात. अस्वलकाका तर सतत 'महुआ' पिऊन झिंगलेले, आणखी एक तपन सिन्हांनी घेतलेली काळजी म्हणजे त्यांचा शीवू हा उगाच कुणी मा. छबू किंवा मा. पिंटो वाटत नाही किंवा टारझन अन् राजकुमार ठकसेन वगैरेही वाटत नाही. अत्यंत साधा असा हा गुराख्याचा पोर, साधा गुराख्याचा पोरच वाटतो. तीच गोष्ट त्याची बहीण रानीच्या बाबतीत. या अतिशय आपल्यातील वाटणाऱ्या बहीण-भावाच्या जोडीमुळेच झटकन त्यांच्या जागी स्वतःची कल्पना करून मुले बाकी कल्पनारम्यतेत रममाण होतात.

आपल्या बाल-प्रेक्षकाला केंद्रस्थानी ठेवल्याचे जागोजाग दिसून येते. मुलांच्या स्मरणशक्तीला बेसुमार ताण न देण्यासाठी संपूर्ण चित्रपटातील दृश्ये मोजक्याच आठ ते दहा जागांमध्ये घडतात. प्रतीके आणि चिन्हे असल्या कलात्मक भानगडीही पोरांच्या डोळ्यांसमोर येत नाहीत.

चित्रपटातील दोन प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे शीवू आणि रानी. शीवूचे काम केले आहे आश्विनीने. (नावावरून हे 'introduced child artist' मुलगी असावे, त्याने / तिने चित्रपटात मात्र मुलाचे काम केले आहे.) शीवूचे एकसुरी बोलणे वगळता काम

झकास ! रानी झाली आहे गायत्री शर्मा. मामा-मामीचा छळ निमूट सोसणारी, भावावर अतिशय प्रेम करणारी, मायाळू, सालस पण अगतिक रानी तिने सुरेख उभी केली. मामा-मामीच्या भूमिकेत साधू मेहेर आणि त्याच्याबरोबरीला अभिनेत्रीही पोरांचे शिव्याशाप ( =खरीखुरी दाद ) घेतात.

पण संपूर्ण चित्रपटात कामाच्या बाबतीत अतिशय टाळ्या-शिट्ट्या घेऊन जातात, अतिशय भाव खाऊन जातात ते सगळे प्राणी–मुख्यत: बोलकी मैना आणि दूधपांढरा ऐरावत. या प्राण्यांच्या कामाबद्दल चित्रपटाच्या प्राणी-शिक्षकाचे खास अभिनंदन करावे लागेल. मुख्य म्हणजे चित्रपटात हे सर्व प्राणी अभिनय करतात–सर्कस करीत नाहीत.

चित्रपटाचे गीतकार व संगीतकार आहेत रवींद्र जैन. तपन सिन्हांप्रमाणे त्यांना मात्र चित्रपटाच्या 'बाल'पणाची नस पकडता आली नाही. सर्व गाण्यांमध्ये त्यांच्या संगीतात नेहमीच आढळणारा गोडवा असला; तरी कधीमधीच आढळणाऱ्या नाविन्याचा मात्र अभाव होता.

चित्रपटाचे छायाचित्रकार बिमल मुकर्जी. जादू, चमत्कार इत्यादी गोष्टी चित्रपटात नसल्यामुळे trick-scenes हा प्रकार अजिबातच बाद झाला; पण तरीही बऱ्याच, विशेषत: प्राण्यांच्या प्रसंगांमध्ये बिमल मुकर्जींची करामत प्रत्ययाला आली. शिवाय कर्नाटक, ओरिसा व तामिळनाडू यांच्या सीमेवरील जंगलांचे सौंदर्यही त्यांनी बऱ्याच प्रमाणात प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर सादर केले.

सर्वच लहान मुलांनी एकदा तरी अवश्य भेटून यावे, असाच हा 'सफेद हाथी' आहे. ❋

---

# हमारे तुम्हारे

छद्म–खट्टा-मीठा

---

आधीच 'खट्टा–मीठा' म्हणजे Pseudo (छद्म) 'Yours, Mine and Ours' होता. 'हमारे तुम्हारे' छद्म 'खट्टा–मीठा' म्हटल्यानंतर हा छद्मीपणा त्याच्यात किती प्रमाणात वाढला असेल, याची कल्पना येईल.

कथेत फरक इतकाच की, 'खट्टा–मीठा'त Yours आणि Mine होते; तर 'हमारे तुम्हारे'त राखी व संजीवकुमारची संयुक्त आणि संजीवकुमारची वैयक्तिक कामगिरी अनुक्रमे आधी आणि नंतर झाल्यामुळे Yours/Mine आणि Ours आहेत.

संजीवकुमार आणि राखीने अत्यंत प्रामाणिकपणे केलेले काम आणि राहुलदेव बर्मनचे संगीत या चित्रपटाच्या जमेच्या बाजू वगळता बाकी चित्रपटात काय नाही म्हणून विचारता ? चोरलेली आणि चोरून मग चुथडा केलेली आणि चुथडा करून मग श्रीमती श्याम मेहरा यांच्या नावावर खपलेली कथा या चित्रपटाला आहे. मूळच्या विनोदी व अत्यंत हलक्याफुलक्या कथेला निरनिराळ्या प्रसंगांमधून झालेली कौटुंबिक, भावनिक, राष्ट्रीय (गोवा–पोर्तुगीज वि. भारत), सामाजिक, आणखी कोणते 'इक' आणि 'ईय' राहिले असतील तर ते सगळे अशा संघर्षांची गळवेही चित्रपटात आहेत.

चित्रपटातील अभिनयाची बाजूही अशीच सजली आहे. तथाकथित सडकसख्याहरी आणि गटारगुलाबकावळी अशा जोडीचे काम करण्यासाठी प्रेमकिशन नामक मोठा ठोकळा आणि एक, जिचे नाव कळू शकले नाही अशी ठोकळी चित्रपटात वावरतात. विनोदखुर्दामर्दन करण्यासाठी मेहमूद, असरानी इत्यादींची नेमणूक करण्यात आली आहे. संभावित गुंड बनून आणि वर उल्लेखलेल्या ठोकळ्यावर काही असंभावित गुंड पाठवून चित्रपटाची स्टंट बाजूही अमजदखानने भक्कम केली आहे. शिवाय पावणेतीन तास गुंडगिरी करून शेवटच्या पावणेतीन सेकंदांच्या हृदयपरिवर्तनानंतर संजीवकुमारला मिठी मारण्याचे कसबही अमजदने दाखविले आहे. एकूणच सगळ्यांनी अभिनयाची एक अभिनव दरी दृष्टिपथात आणली आहे.

चित्रपटाचा तथाकथित विनोदीपणा वाढविण्यासाठी अब्रार अलवींनीही गुप्ता–त्याची बायको गुप्ती, 'गू' असल्या गदळ कोट्या किंवा क्लृप्त्या वापरल्या आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शक उमेश मेहरा. विदुषकी चाळ्यांपासून ते भगवान की भक्तीपर्यंत आबाल-वृद्धांना रुचेल आणि पचेल असा सर्व मसाला भरण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

चित्रपटातील संगीताचा विशेषत: 'तू मेरी मेहबूबा है' (अमितकुमार), 'जादू डार गयो रे' (किशोरकुमार), 'अच्छा चलो जी माफ कर दो' आणि 'कुछ तुम करो' ही दोन द्वंद्वगीते ह्या चार गाण्यांचा उल्लेख करायलाच हवा.

एकूणच एखादी चांगली किंवा बरी गोष्ट हातात सापडली की, पार तिचे वाटोळे किंवा तळपट करीपर्यंत तिला सोडायचे नाही असा अट्टाहास अगदी करायलाच पाहिजे का ? ☐

---


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

–डॉ. वा. ना. कुबेर

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

प्राण्यांवर परिणाम निरीक्षिले असता हे सिद्ध झाले आहे. टाटा इन्स्टिटयूटमधल्या आकडेवारीप्रमाणे दर दहा लक्ष लोकांमधे दोन माणसांना कॅन्सर होतो. यातील धूम्रपान न करणारे लोक वगळले असता हे प्रमाण दर दहा लक्षांस पंचेचाळीस एवढे वाढते. याही गटात फक्त अतिधूम्रपान करणारे (Heavy Smokers) लोक घेतले तर कॅन्सररुग्णांचे प्रमाण दर दहा लक्षाला सत्तर एवढे वाढलेले आढळते. टाटा इन्स्टिटयूटमधल्या आकडेवारीला मर्यादा आहेत. कॅन्सरचे सर्वच रुग्ण टाटा हॉस्पिटलमधे येतात असे नाही. त्यामुळे सर्व कॅन्सर–रुग्णांची नोंद होऊ शकत नाही. येथे येणारे रुग्ण प्रामुख्याने महाराष्ट्रातील असतात. भारताच्या अन्य भागांतून येथे येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण त्या मानाने खूप कमी असते.

ब्राँकायटिस, हृदयविकार किंवा कोणत्याही फुप्फुसाच्या आजाराचा उद्भव झाल्यानंतर जरी धूम्रपानाचे प्रमाण कमी केले, सोडले तर आजाराचे प्रमाण कमी होत गेल्याचे आढळते. फुप्फुसाच्या विकारांच्या बाबतीत हा सुधारणेचा परिणाम दिसायला आठ ते दहा वर्षे लागू शकतात. तुलनेने हृदयविकाराच्या बाबतीत फार लवकर सुधारणा होऊ शकते.

धूम्रपानात विडीचे धूम्रपान सर्वांत अधिक अपायकारक असते. सिगारेट त्याहून कमी अपायकारक असते. पाइप आणखी कमी अपायकारक असतो असे सांगितले गेले. काही लोक असा दावा करतात की आम्ही वरच्यावर धूम्रपान करतो. (Puff) अधिक खोल श्वास घेऊन (inhle) करीत नाही. त्याचा फारसा दुष्परिणाम होत नाही. डॉक्टर दाते यांनी inhale न करता केवळ puff करणे ही गोष्ट फार कठीण असल्याचे सांगितले, तर डॉक्टर कोठारी यांनी काही लोक अगदी नैसर्गिकपणे केवळ puff करू शकतात, असे मत व्यक्त केले. धूम्रपानाची सुरुवात होण्याचे एक मानसिक कारण डॉक्टर कोठारी यांनी सांगितले आईचे दूध पिणाऱ्या मुलाला ते सुटले की असुरक्षित वाटते. काही तरी आधार म्हणून ती अंगठा चोखू लागतात. तसे वयात येणाऱ्या मुलांना अनामिक असुरक्षितता वाटू लागते आणि धूम्रमान जवळ केले जाते.

चर्चा करणाऱ्या पॅनेलमधील लोक स्वतः धूम्रपान कितपत करतात असा प्रश्न उपस्थित श्रोत्यांमधून विचारला गेला. यावर पॅनेलच्या डॉक्टरांनी उत्तरे दिली. ती अशी–

**डॉक्टर देसाई** : मी वर्षातून दोन ते तीन सिगरेट ओढतो.

**डॉक्टर दाते** : मी दिवसाला तीस ते चाळीस सिगरेटस् ओढणाऱ्यांपैकी होतो. दुष्परिणामांची खात्री झाल्यावर मी धूम्रपान पूर्णपणे सोडले हल्ली मी अजिबात धूम्रपान करीत नाही.

**डॉक्टर कोठारी** : मी खूप पूर्वी U. S. A. मधे असताना थोडंफार धूम्रपान केलं आहे नंतर मुळीच नाही.

**डॉक्टर गोएल** : मी सुद्धा पूर्वी परदेशात थोडंफार धूम्रपान केलं.

**डॉक्टर आनंद** : मी दिवसास दहा सिगरेटस् ओढत होतो. नंतर पूर्णपणे बंद केले.

**शेरीफ श्री. बात्रा** : मी पूर्वी धूम्रपान केलं नाही. आताही करीत नाही. कॉलेजात असताना फक्त एकदाच सिगरेट ओढायचा प्रयत्न केला.

धूम्रपान अतिशय हानिकारक आहे आणि ते थांबविण्यासाठी काही निश्चित योजना आखल्या पाहिजेत, असे या सर्व डॉक्टरांनी ठासून सांगितले. या योजना कोणत्या असाव्यात यावरही विचार झाला. तंबाखूच्या उत्पादनावर किंवा धूम्रपानावर कायदेशीर बंदीची मागणी करावी का, असा एक विचार मांडला गेला; परंतु कायद्याच्या बंदीचा परिणाम फारसा काय जवळजवळ अजिबात होत नाही, याबद्दल सर्वांचे एकमत झाले. यासंबंधी शासन काय करू शकेल, अशी विचारणा शेरीफ श्री. बात्रा यांना केली गेली. श्री. बात्रा यांनी सांगितले की, धूम्रपान हे हानिकारक असले तरी जगातल्या कोणत्याही शासनाने ते थांबविण्याचे प्रामाणिक प्रयत्न केलेले नाहीत. कारण शासनाला त्यातून कराच्या रूपाने जबरदस्त उत्पन्न मिळते. जे सर्वत्र आहे तेच आपल्याही देशात आहे. खरोखरच सर्व लोकांनी धूम्रपान सोडले तर शासनापुढे एक समस्या निर्माण होईल. धूम्रपानविरोधासाठी विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण हाच मार्ग अवलंबिला पाहिजे. धूम्रपानाचे व्यसन सुटू शकते आणि त्याचे सुपरिणाम कसे कसे होतात हे डॉक्टरांनी वारंवार समाजाला सांगितले पाहिजे, हा विचार समाजात रुजविला पाहिजे, असे मत डॉ. दाते यांनी मांडले. डॉ. देसाई यांनी व्यसन मुळात लागूच नये याची काळजी घेण्यावर भर दिला. धूम्रपानाचे दुष्परिणाम दाखविणारे चित्रपट विद्यार्थ्यांना शाळेतून दाखविण्यात यावेत, असे त्यांनी सांगितले. सार्वजनिक ठिकाणी अॅश ट्रे ठेवू नयेत, अशी युक्तीही त्यांनी सुचविली.

विषयाला थोडे सोडून एक प्रश्न आला होता. काही स्त्रिया धूम्रपान करतात याविषयी पुरुषांना काय वाटते? शेरीफ श्री. बात्रा यांनी उत्तर दिले की, 'हल्ली आधुनिक समाजात स्त्रिया धूम्रपान करताना दिसतात. त्या स्वतःला पुढारलेल्या समजतात. सार्वजनिक ठिकाणी त्यांचे कौतुकही होते; पण मला असे वाटते की, धूम्रपान करणाऱ्या स्त्रियांना मनातून कोणी श्रेष्ठ समजत नाही. उलट मनात त्यांच्याबद्दल हीन भावच असतो. यावर डॉ. आनंद हसून बोलले, 'Kissing a smoker–woman is like kissing an ash–tray असं म्हटलं जात नाही का?' हा प्रश्न मुख्य चर्चेशी सुसंगत नसल्यामुळे एवढ्यावरच मिटविला गेला, हे योग्यच झाले; परंतु त्यातही भारतीय पुरुषांचा कर्मठपणा, स्त्रियांविषयीची संकुचित दृष्टी, दुटप्पी धोरण यांचे ओझरते दर्शन झाले. निदान समाजातील जबाबदार पदे भूषविणारे पुरुष दुटप्पी, संकुचित दृष्टीचे नसावेत अशी अपेक्षा आहे. Kissing a smoker–man is kissing an ash–tray असे स्त्रियांनाही म्हणता येईल असो.

विषयापासून दूरचा असा आणखी एक प्रश्न आला होता. तंबाखूचे पीक ज्या जमिनीत काढण्यात येते ती जमीन इतर पिकाला पूर्णपणे निरुपयोगी ठरते काय? हा प्रश्न पूर्णपणे शेतीच्या कक्षेत येत असल्यामुळे अनुत्तरित राहिला.

मुंबईच्या लोकसंख्येच्या मानाने या कार्यक्रमाला फार कमी श्रोते उपस्थित आहेत. धूम्रपानाच्या समस्येचे गांभीर्य लोकांना अजून जाणवले नाही, हेच यावरून दिसते. जे उपस्थित आहेत त्यांनी धूम्रपानाच्या दुष्परिणामांचा आपल्या भोवताली हिरीरीने प्रसार करावा, असे सांगून डॉ. आनंद यांनी चर्चेचा समारोप केला. ◻

## □ भेळपुरीचा अमृतमहोत्सव

'भेळपुरी' हा लोकल गाड्यांप्रमाणेच मुंबईच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भेळपुरी मुंबईस जागोजागी मिळते. अगदी पावलोपावली मिळते म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही; पण चर्निरोड चौपाटीच्या भेळपुरीचा खासा मान! गेटवे, नॅशनल पार्क येथे जाऊन माणसे भेळपुरी खाल्ल्याशिवाय परत येऊ शकतात. चौपाटीचे तसे नाही. चौपाटीवर जाऊन भेळ न खाता येणारी माणसे एक तर तऱ्हेवाईक असतात किंवा पेशंटस् असतात. 'ऐरावतं गजेन्द्राणां' तसा भेळपुरीत चौपाटीच्या भेळपुरीचा महिमा! चौपाटीच्या या रेतीत पहिला भेळपुरीवाला कसा, केव्हा, कोठून उगवला हे कोणाला सांगता येणार नाही. आम्ही पाहतो आहोत तेव्हापासून तो इथेच आहे; पण नुकताच दि. २२-२-७९ रोजी संध्याकाळी सहा वाजता या चौपाटीवरच्या भेळवाल्यांनी आपला अमृतमहोत्सव साजरा केला!

स्वतःच्या आजोबांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसाची बातमी एकदम वर्तमानपत्रात वाचावी आणि त्यांना जाऊन भेटण्याची उत्कट इच्छा व्हावी तसे माझे झाले. मनात अनेक विचार घोळत असतानाच मी त्या वाळूत शिरले. नेहमीसारखे 'भेळ, भेळ' करून ते मागे लागले; पण त्यांच्या भेळेच्या ऑफरला न जमानता अमृतोत्सवाविषयी बोलण्याचा मी एकसारखा प्रयत्न करीत होते; पण बोलायला ते राजीच नव्हते. मी हट्टाने पुन्हा पुन्हा प्रश्न विचारीत राहिले. तेव्हा बहुतेकांनी 'कुछ पता नही' असे उत्तर दिले. एकदोघांनी चमत्कारिकपणे पाहून परत भेळ ढवळायला सुरुवात केली. आडवार होता. गर्दी मुळीच नव्हती. म्हणजे बोलायला सवड नव्हती असे नाही. बोलण्याची उत्सुकताच नव्हती. शेवटी अमृतोत्सवाची माहिती देणारा एक निघाला त्याने सांगितले, 'योंही दो दिन पहले पूजा हुआ। एच्. एन्. त्रिवेदी अध्यक्ष थे। एम्. के. पाटील भी थे। सुनिल दत्त, कामिनी कौशल, सत्येन कप्पू, आये थे।' मग त्याने सुनिल दत्त, कामिनी कौशल कसे उभे राहिले, कसे हसले याचे रसभरित वर्णन केले. कामिनी कौशल तिच्या अमेरिकेतल्या मुलांना या चौपाटावरची भेळ पाठवते हे सांगताना त्याचा ऊर भरून आला! या ठिकाणी आलेला पहिला भेळवाला कोणता, लायसेन्स किती साली काढली, ब्रिटिशांच्या काळी लायसेन्स होतो का, पूर्वीच्या भेळेच्या गाड्यांना छप्त्या होत्या त्या का काढल्या हे प्रश्न कितीही सोपे करून विचारले तरी उत्तरे मिळाली नाहीत. शेवटी त्याने मला एक कॅलेंडर दिले. देताना आवर्जून सांगितले, "हमने कामिनी कौशलकोभी यही कॅलेंडर दिया!" जाऊ दे, म्हणत मी दुसऱ्या स्टॉलसकडे वळले. त्यांना बोलतं करण्यासाठी भेळ खात गप्पा सुरू केल्या. मग ते जरा नीट बोलायला लागले. बहुतेक सगळे U. P. मधून आले आहेत. भेळेचे पदार्थ तयार करण्याच्या जागेला ते कारखाना म्हणत होते. कोणचा कारखाना गावदेवीला होता, कोणाचा ग्रँटरोडला तर कोणाचा कारखाना गोलपिठ्याला. दिवसभर ते त्या कारखान्यात राबतात. संध्याकाळी हातगाडीवर सामान घेऊन चौपाटीवर येतात. रात्री बारापर्यंत परत जातात. काहीजण अठरा-वीस वर्षे आपल्या भेळमालकाची नोकरी करीत आहेत तेव्हा आज त्यांना मासिक दीडशे रुपये पगार मिळतो. काही मालक आठवड्याला एक सुटी देतात. काहीजण तीही देत नाहीत. या पंचाहत्तर वर्षांच्या काळात युद्धे झाली, संपली. त्याचा तुमच्या धंद्यावर काय परिणाम झाला? या प्रश्नाला "हाँ यो ही" यापलोकडे उत्तर नव्हते. पूर्वीची एक आण्याची भेळ आता एक रुपया झाली, इतकी किंमत चढताना कधी एकदम फायदा, एकदम तोटा असं झालं का? "हुआ था थोडा" एवढीच प्रतिक्रिया: T.V. आल्यामुळं रविवारचा धंदा कमी झाला, हे दोन-तीन जणांनी ठासून सांगितले. राष्ट्राचा इतिहास घडविणाऱ्या किती तरी सभा चौपाटीच्या वाळूत गाजून गेल्या. लहान-मोठ्या सभा तेथे एकसारख्या होतच असतात. मी विचारले, "गंमत म्हणून कधी कोणत्या सभेला जाऊन बसलात का?" त्यांच्यापैकी कोणीच, कधीही चौपाटीवरच्या कुठल्याही सभेला गेले नव्हते! तुमचा धंदा बुडेल म्हणून तुम्ही जात नाही की सभेची गंमत जाऊन बघावी असं तुम्हांला वाटत नाही?' हा प्रश्न त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. पंचाहत्तर वर्षांची वाटचाल केल्याचा काही आनंद नव्हता. होते एक कमालीचे औदासीन्य. या औदासीन्याचे कारण असावे दारिद्र्यच.

यांनी अमृतमहोत्सव का केला? सामाजिक जाणीव, सामाजिक स्मृति असलेल्या दुनियेतले हे उत्सव ना? यांच्यात ती जाणीव, स्मृति असल्याचे कोठे चिन्ह दिसले नाही. त्यांनी हा उत्सव स्वयंस्फूर्तपणे केला का? अमृतमहोत्सवाचा सूत्रधार कोणी तरी पुढारी किंवा व्यापारी असावा असे त्यांनी सांगितले, यांनी ऐकले. यापलीकडे यांचा त्या अमृतमहोत्सवाशी काही संबंध असल्याच्या खुणाच दिसल्या नाहीत. स्वतःविषयी उदास असणाऱ्या या जीवांना नट-नट्यांचे मात्र अप्रूप होते. गुंगी आणणारे जीवन क्षणभर त्या त्यांना देऊ शकतात म्हणून की काय कोणास ठाऊक! खरोखर शक्ती देणाऱ्या अन्नापेक्षा क्षणभर धुंदी देणाऱ्या मद्याचेच आकर्षण अधिक वाटते त्यातलाच हा प्रकार.

या अमृतोत्सवाने आमचे त्यांच्याकडे लक्ष गेले. नेहमीपेक्षा वेगळ्या अर्थाने लक्ष गेले. त्यांच्या जीवनात डोकावून पहावेसे वाटले. जे भेळवाले चिरपरिचित वाटत होते ते अपरिचित ही वाटू लागले. □

## □ श्री. मुरलीधर नांगरे यांचे चित्रप्रदर्शन

पुण्याचे अभिनव कलामहाविद्यालयातील प्राध्यापक श्री. मुरलीधर नांगरे यांच्या चित्रांचे ( लँडस्केप्स ) प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये दि १-३-७९ ते ७-३-७९ पर्यंत झाले.

या प्रदर्शनात सुमारे तीस लँडस्केप्स होती. लँडस्केप्समधील दृश्ये पुणे, हैद्राबादच्या परिसरातील होती. लँडस्केपसाठी तैलरंगांचा उपयोग केला होता. दृश्यांच्या जाणवलेल्या अर्थाप्रमाणे 'Haunted House', 'Portrait of a tree', 'Festival', 'Yesterday' अशी या चित्रांची नावे होती. माझ्या सामान्य दृष्टीला ही नावे त्या दृश्यांशी तेवढी सुसंगत वाटत नव्हती. मात्र काही सुंदर निसर्गदृश्ये पहायला मिळाल्याचा आनंद हे प्रदर्शन पाहून झाला.

श्री. मुरलीधर नांगरे यांचे जहांगीर आर्ट गॅलरीमधील हे दुसरे चित्रप्रदर्शन होते. पुणे, घोडनदी, हैद्राबाद येथेही त्यांची चित्रप्रदर्शने यापूर्वी भरलेली आहेत श्री. नांगरे यांना The Federation of Art Institutions, Bombay Art Society या संस्थांची पारितोषिके मिळाली आहेत. महाराष्ट्र स्टेट आर्ट एक्झिबिशनमध्ये त्यांना १९७७, १९७८, १९७९ अशा तीनही वर्षी पारितोषिके मिळाली. श्री. मुरलीधर नांगरे A. M. ला महाराष्ट्रात सर्वप्रथम आले होते. त्यांना पंतप्रतिनिधी ( औंध ) स्कॉलरशिपही मिळाली होती. आपल्या चित्रकलेला पूरक विषयाचा अभ्यास करण्यासाठी ते वाङ्मय घेऊन B. A. झाले आणि इतिहास घेऊन M. A. उत्तीर्ण झाले. या विषयांच्या अभ्यासाचा आपल्या कलेवर निश्चित चांगला परिणाम झाला आहे, असे त्यांना वाटते. आपल्या कलेच्या प्रगतीत श्री. डी. के.. डेंगळे यांचे ऋण ते मानतात. □